**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**नियम 289 अन्वये दिलेल्या सूचनेबाबत**

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी नियम 289 अन्वये एक सूचना दिलेली आहे. खामगाव येथे काल रात्री 10.00 ते 10.30 वाजताच्या दरम्यान शिवसेनेचे तालुका उपप्रमुख आणि नगरसेवक श्री. मुन्ना पुरवार आणि दुसरे नगरसेवक श्री. संदीप वर्मा या शिवसेनेच्या दोन नगरसेवकांवर काँग्रेसच्या काही लोकांनी हल्ला केला. त्यावेळी काँग्रेसच्या आमदाराचे तीन भाऊ हजर होते तसेच काँग्रेसच्या आमदाराचे वडील हजर होते. अशा पध्दतीने त्यांना जखमी करण्यात आले. खामगाव येथे ही घटना का घडली ? आमदाराने अवैधरीत्या दोन ठिकाणाहून कनेक्शन घेतले आणि त्यांच्या कार्यालयात 24 तास वीजपुरवठा चालू आहे अशी तक्रार शिवसेनेच्या नगरसेवकांनी वीज बोर्डाकडे केली. त्यामुळे शिवसेनेच्या नगरसेवकाच्या भावाला मारले आणि रात्री 10.00 वाजता 40-50 गुंडांना घेऊन त्यांच्यावर हल्ला केला. तसेच प्रचंड प्रमाणामध्ये दगडफेक झाली. यामध्ये दोन पोलीस जखमी झाले. म्हणून नियम 289 अन्वये मी सूचना दिलेली आहे. या सभागृहाचे कामकाज थांबवून या विषयावर चर्चा व्हावी अशा प्रकारची मी मागणी करतो. या ठिकाणी अशा प्रकारचे हल्ले होत आहेत. राहाता येथे डॉ. पिप्राळा यांच्यावर हल्ला झाला. शिवसैनिकाचे घर जाळले. श्री. विखे-पाटील यांच्या समर्थकांनी दहशत माजवली. महाराष्ट्रभर आमदार आणि त्यांचे समर्थक, मंत्री आणि त्यांचे समर्थक अशा प्रकारे दहशत माजविण्याचा प्रयत्न करीत आहेत. महाराष्ट्राला बिहारचे स्वरुप देण्याचा प्रयत्न चाललेला आहे. महाराष्ट्राची कायदा व सुव्यवस्था धोक्यात आलेली आहे. त्यामुळे या सर्व परिस्थितीवर या सभागृहात चर्चा झाली पाहिजे. यावर शासनाकडून निवेदन झाले पाहिजे अशा प्रकारची माझी सूचना आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, दुर्दैवाने रोज असा दिवस उजाडतो की, आम्हाला नाईलाजाने नियम 289 अन्वये या ठिकाणी प्रस्ताव द्यावा लागतो आणि प्रश्नोत्तराचा तास रद्द करुन या विषयावर चर्चा करावी असे सांगण्यात प्रसंग येतो. या दोन्ही गोष्टी या सदनाला

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM

श्री. मधुकर सरपोतदार .......

किंवा या महाराष्ट्राला भूषणावह नाहीत. सुदैवाने आज माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत आणि त्यांच्या उपस्थितीत या विषयाला वाचा फुटत आहे. मी माननीय मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, या दोन्ही गोष्टी आज ना उद्या आपल्या आसनाला धक्का पोहोचविणाऱ्या आहेत. या दृष्टीकोनातून या प्रश्नाकडे पाहिले पाहिजे. हा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न आहे. हा जो प्रकार घडला त्याबाबत माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी सांगितले आहे. त्या ठिकाणचे शिवसेनेचे तालुका उपप्रमुख यांच्यावर हल्ला होणे, आमदार स्वत: 50-50 गुंडांना घेऊन जाणे, त्यांच्याबरोबर आणखी काही सहकारी जाणे असा प्रकार झालेला आहे. त्यांच्या कार्यालयात 24 तास सतत वीज पुरवली जाते याबद्दल तक्रार केली. त्या तक्रारीबद्दल राग येऊन अशा प्रकारचे हल्ले होत असतील तर कोणत्याही वाईट गोष्टीबद्दल तक्रार करणे हा सुध्दा महाराष्ट्रामध्ये गुन्हा ठरणार काय हा फार मोठा प्रश्न या निमित्ताने उभा राहतो.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. बरवड 12:05

(श्री. मधुकर सरपोतदार...)

सभापती महोदय, आम्हाला जे सांगावयाचे आहे त्या पाठिमागच्या उद्देशाची आपणाला कल्पना आहे. आमदार सानंदा यांच्याबाबत त्या ठिकाणी खूप चर्चा झालेली आहे. आमदार सानंदा यांच्या विरुध्द अनेक तक्रारी आहेत. त्यांच्या विरुध्द नॉन कॉग्नीझेबल ऑफेन्सेस भरपूर आहेत. असे असताना आमदार सानंदा यांना कोण संरक्षण देतो हे मला माहीत नाही. पण कोणी तरी संरक्षण देतो म्हणूनच हे आमदार मोकळे आहेत. हा प्रश्न आम्ही या ठिकाणी अनेक वेळा उपस्थित केलेला आहे. सभापती महोदय, या सार्वभौम सदनाच्या पीठासीन अधिका-यांच्या बाबतीत सुध्दा तक्रारी केल्या जातात, त्यांच्यावर हेत्वाराप केले जातात आणि तो विषय सुध्दा या सभागृहामध्ये मांडल्यानंतर त्याचा काहीही उपयोग झाला नाही. हे कोण मोठे सानंदा महाशय आहेत ? ते कोणावरही हल्ले करातात आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करतात. श्री. विखे-पाटील आणि त्यांचे चिरंजीव या दोघांनाही शिवसेनेने मंत्रिपदे दिली. त्यांनी मंत्रिपदे उपभोगल्यानंतर आणि पक्ष बदलल्यानंतर आता गुंडगिरी सुरु केलेली आहे. त्यांच्याकडून राहाता येथील माणसांवर हल्ले होत आहेत. हे सदन चालू असताना त्या ठिकाणी शिवसेनेच्या पदाधिका-यांवर हल्ले करुन त्यांची घरे जाळण्याचे भयानक आणि अमानुष प्रकार घडलेले आहेत. या प्रकारांची माननीय मुख्यमंत्र्यांनी नोंद घेतली पाहिजे. माननीय मुख्यमंत्र्यांनी मुख्यमंत्री पदाला न्याय देण्याची भूमिका दाखविली पाहिजे. माननीय मुख्यमंत्र्यांमध्ये ती क्षमता आहे, परंतु ते ती का दाखवत नाही हे मला कळत नाही. सभापती महोदय, मला या निमित्ताने हे निदर्शनास आणावयाचे आहे की, गुंडगिरी करणारे मंत्री आहेत, आमदार आहेत. त्यांना नीट ठिकाणावर आणण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी धाडसाने कारवाई करण्याची आवश्यकता आहे. परिणाम असा होतो की, ज्यांच्यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न महाराष्ट्रामध्ये निर्माण होतो त्या संदर्भातील तपासणी हा प्रश्नोत्तराचा तास रद्द करुन करावी यासाठी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. हा प्रस्ताव जेव्हा चर्चेला येईल त्यावेळी या सर्व घटनांवर आम्ही प्रकाश टाकू.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय,...

..2..

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी राहाता येथील घटनेबाबत दिनांक 5 एप्रिल रोजी नियम 93 अन्वये सूचना दिली होती. सदर सूचनेबाबत माननीय मंत्री महोदयांनी निवेदन करावे असे निदेश मी दिलेले आहेत. ते निवेदन उद्या होईल. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पाडुंरंग फुंडकर आणि सन्मानीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी उपस्थित केलेला विषय हा खामगाव तालुक्यापुरताच मर्यादित आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी हा विषय नियम 289 अन्वये कसा घेता येतो याबाबत प्रतिपादन केलेले आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 289 अन्वये दिलेल्या सूचनेतील विषय हा आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविलेल्या कोणत्याही विषयाची संबंधित नसल्यामुळे मी या सूचनेला परवानगी नाकारीत असलो तरी या सूचनेचे महत्व लक्षात घेऊन मी माननीय गृहमंत्र्यांना सांगेन की, यासंदर्भात त्यांनी आज दिवसभरात या सदनामध्ये निवेदन करावे.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**मुंबईतील महापालिका शाळांच्या इमारतीत भरणाऱ्या रात्र शाळांना थकबाकी आणि भाडे पूर्ण माफ करण्याबाबत**

**(१) * २४५२७ श्री.कपिल पाटील , श्री. जयंत पाटील , श्री. संजय दत्त , प्रा. शरद पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील महानगरपालिका शाळांच्या इमारतीमध्ये भरणाऱ्या रात्र शाळांचे भाडे आणि मागिल थकबाकी माफ करावी अशी मागणी छात्र भारती विद्यार्थी संघटना, शिक्षक भारती आणि रात्र शाळा मुख्याध्यापक संघाने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेने याबाबत काय कार्यवाही केली आहे,

(३) रात्र शाळांना विनामुल्य किंवा नाममात्र भाडे आकारण्यास शासनाने निर्देश दिले आहेत काय, त्याबाबत काय कार्यवाही झाली आहे ?

**श्री. राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) मुंबई महानगरपालिकेकडे असे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) याबाबतचा प्रस्ताव मुंबई महानगरपालिकेच्या विचाराधीन आहे.

(३) नाही.

श्री. कपिल पाटील : गेल्या 5 वर्षामध्ये महानगरपालिकेने रात्र शाळांच्या भाड्यामध्ये प्रचंड वाढ केली होती. या संदर्भात आम्ही स्वत: माननीय मुख्यमंत्र्यांची भेट घेतली होती. त्यावेळी त्यांनी महानगरपालिकेला भाडे वसूल करु नये असे आदेश दिले होते. त्यानंतर महानगरपालिकेने सगळे भाडे आणि थकबाकी द्या असा तगादा लावलेला आहे. या रात्रशाळांमध्ये कष्टकरी, गरीब कुटुंबातील मुले शिक्षण घेतात, ही गरीब मुले कोणत्याही प्रकारची फी देऊ शकत नाही. तसेच या रात्रशाळांना कोणत्याही प्रकारचे अनुदान दिले जात नाही. त्यामुळे हे भाडे आणि थकबाकी शासन महानगरपालिकांना संपूर्णपणे माफ करावयास लावील काय ?

श्री. राजेश टोपे : सन 2000मध्ये महानगरपालिकेने जनरल बॉडीचा ठराव घेऊन जे रेट 1989मध्ये ठरविण्यात आले होते ते वाढविण्यास मंजुरी दिली. माननीय मुख्यमंत्र्यांकडे यासंदर्भात निवेदने आल्यानंतर त्यांनी ताबडतोबीने भाडेवाढीला स्थगिती दिली. त्यानंतर वाढीव दराने भाडे घेण्यात आलेले नाही.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24527.......... श्री.राजेश टोपे.........

सभापती महोदय, महानगरपालिकेने परिमंडळ-6 चे अधिकारी श्री.भानुदास बोराळे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे. त्या समितीच्या आतापर्यंत 4-5 बैठका झाल्या आहेत. भाडे काय असावे? ते माफ करावे का? या संदर्भात समितीच्या माध्यमातून निर्णय होणार आहे. शासनाची भूमिका सहानुभूतीची व पॉझिटिव्ह आहे. ही वस्तुस्थिती आहे की, रात्रशाळा काही अनुदानित व काही विनाअनुदानित आहेत. त्यांना वेतनेतर अनुदान वेळेवर मिळत नसल्यामुळे सुध्दा भाडे भरणे अवघड होते. म्हणून भाडे माफ करण्याच्या किंवा दरवाढीच्या संदर्भातील निर्णय श्री.भानुदास बोराळे यांची समिती घेणार आहे. त्या समितीच्या अहवालामध्ये निश्चितपणे सहानुभूतीपूर्वक निर्णय घेण्यात येईल.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, रात्रशाळेत जाणारे विद्यार्थी हे अत्यंत गरीब कुटुंबातील असतात. आमचे वडील देखील रात्रशाळेत शिकूनच पुढे आमदार झाले. त्यामुळे या प्रश्नासंबंधी सहानुभूतीपूर्वक विचार करण्याची आवश्यकता आहे. शालेय शिक्षणाचा कोणताही कार्यक्रम या शाळांना ॲप्लीकेबल होत नाही. पोषण आहार असेल, वेतनेतर अनुदान असेल, या सर्व बाबतीत रात्रशाळांना सापत्नभावाची वागणूक दिली जाते. त्यामुळे या शाळांबाबत सर्वसमावेशक असे धोरण बनविण्याची सरकारची तयारी आहे का?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी रात्रशाळांबाबत धोरणात्मक निर्णय होण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. मी सुरुवातीलाच सांगितल्याप्रमाणे मागील थकबाकी असेल किंवा पुढच्या काळात किती भाडेवाढ असावी या संदर्भात शासनाची हीच भूमिका आहे की, 1989 मधील जे भाडे आहे तेच कदाचित लागू करता येईल का? या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी स्टे दिला आहे. त्या अनुषंगाने अगदीच भाडे माफ करावे किंवा मागील थकबाकी 36 लाख रुपये 100 टक्के माफ करावी अशा प्रकारचा धोरणात्मक निर्णय घेता येणार नाही. महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असते. महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या बाबीसंदर्भात शासनाने डायरेक्टिव्हज देणे हा त्यांच्यावर हक्कावर गदा आणणारा विषय असू शकतो. त्या दृष्टीकोनातून धोरणात्मक बाबी आहेत त्या करण्याच्या सूचना शासनाच्या वतीने महानगरपालिकेला देण्यात येतील.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24527..........

श्री.मधुकर सरपोतदार : सन्माननीय सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना धन्यवाद देतो. त्यांनी रात्रशाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने महत्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. मी सुध्दा रात्रशाळेमध्ये सुरुवातीला शिकलो आहे. त्यामुळे रात्रशाळांचे महत्व काय आहे हे मी चांगले ओळखून आहे. महाराष्ट्रातील एकूण सुशिक्षितांची संख्या केरळ राज्याएवढी उच्च नाही. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाचा शिक्षणाचा भाग म्हणून रात्रशाळांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न असला पाहिजे. मुंबई शहरामध्ये या रात्रशाळांच्या ज्या जागा आहेत त्याठिकाणी अन्य काही व्यवसाय चालत नाही. त्या ठिकाणी असलेल्या शाळांना प्रोत्साहन देऊन कोणतेही भाडे न आकारता तेथे जास्तीत जास्त गरीब, गरजू, कष्टकरी विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी कशा प्राप्त होतील, त्या शाळांवर आर्थिक बोजा कसा येणार नाही, आला तर त्यातून त्यांची सुटका कशी करता येईल यादृष्टीने सकारात्मक विचार करुन या सगळ्या रात्रशाळांच्या भाड्याची थकबाकी असेल तर ती महाराष्ट्र शासनाने भरावी. महानगरपालिकेच्या स्वायत्ततेवर गदा आणावी अशी आमची मागणी नाही. त्यांची स्वायत्तता अबाधित राखावी. परंतु भूखंडाबाबत त्यांच्या स्वायत्ततेवर गदा आणली जाते. रात्रशाळांच्या प्रश्नाबाबत गदा येऊ नये यादृष्टीने सहानुभूतीपूर्वक विचार केला पाहिजे. सन्माननीय मुख्यमंत्री आज सकाळीच सदनात उपस्थित राहिले आहेत. इतर दिवशी प्रश्नोत्तराच्या तासाला त्यांची उपस्थिती जाणवत नाही. कदाचित त्यांना विधानसभेत उपस्थित रहावे लागत असावे. नगरविकास खात्याची जबाबदारी त्यांच्याकडेच आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 24527** .........

श्री. मधुकर सरपोतदार .....

या दृष्टिकोनातून सहानुभूतीपूर्वक विचार करुन भाडे वाढ किंवा थकबाकी माफ करुन रात्रशाळांना प्रोत्साहन मिळण्याच्या संदर्भात शासन काही निर्णय घेणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, रात्रशाळांना भाढेवाढ करण्याचा विषय नाही. परंतु थकबाकीच्या संदर्भात कमिटी नक्कीच विचार करील. शनिवार आणि रविवार हा दिवस रात्रशाळेसाठी उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात जी मागणी होती ती मागणी मान्य करण्यास काही हरकत नाही. रात्रशाळेच्या संदर्भात राज्यशासनाचे सहनुभूतीचे धोरण असून रात्रशाळेमध्ये मोठी भाडेवाढ होणार नाही यासंदर्भात मी सभागृहाला ग्वाही देतो.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मला माननीय मंत्री महोदयांना विचारावयाचे आहे की, रात्रशाळेची भाडे आणि थकबाकीची एकूण रक्कम किती आहे? रात्रशाळेची भाडे वाढ आणि थकबाकीची रक्कम महानगर पालिका देऊ शकत नसेल तर ही रक्कम राज्यशासन देणार आहे काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, महानगर पालिकांना ज्या गोष्टी देय असतात अशा सर्व गोष्टी राज्य शासन देत असते. राज्यशासन रोड ग्रँट तसेच वेगवेगळा निधी महानगर पालिकांना उपलब्ध करुन देत असते. महानगर पालिकांना निधी देण्याची राज्य शासनाची बांधिलकी आहे. सन 2000 ते 2007 या कालावधीत रात्रशाळेची थकबाकी ही 36 लक्ष रुपये असून ही रक्कम रात्रशाळा एकाचवेळेस भरु शकत नसेल तर ही रक्कम टप्प्या टप्प्याने देण्याच्या संदर्भात शासन सहानुभुतीने विचार करेल एवढेच मी या अनुषंगाने सांगू इच्छितो. रात्रशाळांवर ताण येणार नाही या गोष्टीची शासन निश्चितपणे काळजी घेईल.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, रात्रशाळेमध्ये गरीब, दलित तसेच मागासवर्गीय मुले मोठया प्रमाणात शिक्षण घेत असतात. इतर भागाच्या तुलनेत मुंबईमध्ये रात्रशाळेत मोठया प्रमाणात मुले शिक्षण घेत असतात. खरे म्हणजे रात्रशाळा ही मुंबईचे कल्चर आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. मुंबईमध्ये रात्रशाळांची फार मोठी गरज आहे. मुंबईमध्ये रात्रशाळांची संख्या मोठया प्रमाणात आहे. आज मोठया मुश्कीलीने रात्र शाळा सुरु आहेत. त्यामुळे या रात्रशाळांना

.....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 24527** .........

श्रीमती सुधा जोशी.....

प्रायोरिटीने मदत करण्याची आवश्यकता आहे. रात्रशाळेची थकबाकी माफ करण्याचा प्रस्ताव केव्हा देण्यात आला होता? उत्तरात म्हटले आहे की, हा प्रस्ताव मुंबई महानगर पालिकेच्या संदर्भात विचाराधीन आहे. त्यामुळे या प्रस्तावावर विचार कधी पूर्ण होणार आहे? सध्या रात्रशाळांना कोणत्या सुविधा दिल्या जातात तसेच रात्र शाळांना अजून कोणत्या सुविधा देण्याची शासनाची इच्छा आहे?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, उत्तरामध्येच सर्व काही स्पष्ट माहिती देण्यात आलेली आहे. रात्रशाळेला दरवाढ होणार नाही हे मी अगोदर सुध्दा सांगितलेले आहे. सभागृहाच्या दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन रात्रशाळेची दरवाढ होणार नाही याची मी पुन्हा ग्वाही देतो. रात्रशाळेची जी काही थकबाकी राहिलेली आहे ती थकबाकी रात्रशाळेला एकदम भरणे शक्य नसल्यामुळे ती थकबाकी रात्रशाळेने इन्स्टॉलमेंटने परत फेड करावी अशा पध्दतीच्या सूचना शासनाच्या वतीने देण्यात येतील.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितले आहे की, रात्रशाळांनी थकबाकीचे हप्ते पाडून भरले तरी चालेल. रात्रशाळा भाडे भरु शकत नसल्यामुळे रात्रशाळेची थकबाकी माफ भरावी असे आदेश माननीय मुख्यमंत्र्यांनी दिले होते. रात्रशाळेची थकबाकी राज्य शासनाच्या दृष्टीने खूप मोठी आहे असे नाही. त्यामुळे राज्यशासनाने रात्रशाळेची पूर्ण थकबाकी माफ करणे आवश्यक आहे. इतर व्यावसायिक संस्थांना ज्या प्रमाणे भाडे आकारले जाते तशाच प्रकारचे भाडे रात्रशाळेकडून पालिका आकारीत आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24527...........

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील हे आमदार होण्यापूर्वी सुध्दा या प्रश्नाच्या बाबतीत नेहमीच आग्रही राहिलेले आहेत. रात्रशाळांची भाडे आकारणी महानगरपालिकेने केलेली आहे. रात्रशाळांचे प्रश्न सोडविण्यासाठी एक समिती नेमण्यात आलेली आहे. त्या समितीपुढे रात्रशाळांचे भाडे माफ करावे किंवा कसे हा विषय आहे. त्या समितीने सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांच्याबरोबर चर्चा करुन त्यांचे समाधान होईल असा तोडगा काढावा अशा सूचना देण्यात येतील. त्या उपरही प्रश्न शिल्लक राहिला तर राज्य सरकार त्यामध्ये हस्तक्षेप करुन रात्रशाळांच्या हितासाठी जे करणे आवश्यक आहे ते करण्याची भूमिका घेईल.

--------------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पनवेल (जि. रायगड) येथील तेरणा रुग्णालय बंद असल्याबाबत**

**(२) * २५९९९ श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते : तारांकित प्रश्न क्रमांक २२६९२ ला दिनांक १५ डिसेंबर, २००६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :**

सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेल्या काही वर्षापासूनच्या वाढत्या तोट्यामुळे बंद असलेले पनवेल सेक्टर १२ (जि. रायगड) येथील तेरणा रुग्णालय अद्यापही सुरु झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००४-२००५ मध्ये या रुग्णालयास झालेला तोटा सर्वाधिक म्हणजे २८ लाख ५७ हजार रुपयांचा होता हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या तोट्याची कारणे काय आहेत,

(४) हे रुग्णालय बंद असल्याने ग्रामीण भागातील गरिब रुग्णांना माफक दरात वैद्यकिय सुविधा मिळत नसल्यामुळे व त्यांचे उपचाराअभावी हाल होत असल्यामुळे शासनाने कोणती पर्यायी व्यवस्था केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री.हसन मुश्रीफ, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१), (२) व (३) सदर खाजगी रुग्णालय, तेरणा पब्लिक चॅरीटेबल ट्रस्ट मार्फत चालविण्यात येत होते. धर्मादाय आयुक्तांच्या अहवालानुसार जमेपेक्षा खर्च जास्त झाल्याने सदर रुग्णालयास रुपये २८,५७,५४५/- एवढा तोटा झाला असल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) ग्रामीण भागातील गरिब रुग्णांना माफक दरात वैद्यकीय सुविधा ग्रामीण रुग्णालय पनवेल मार्फत उपलब्ध आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मागील अधिवेशनात दिनांक 15 डिसेंबर 2006 रोजी प्रश्न विचारला होता. त्यावेळी उत्तर देण्यात आले होते की, सन 2002-03 मध्ये 19 लाख 97 हजार 096, सन 2003-04 मध्ये 14 लाख 91 हजार, सन 2004-05 मध्ये 28 लाख 57 हजार इतका तोटा झाला होता. त्यावेळी माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले होते की, " सदर रुग्णालय सुरु करण्याबाबत शासनाने सांगितलेले आहे." परंतु आता जे उत्तर देण्यात आलेले आहे त्यामध्ये सदरहू रुग्णालय सुरु असल्याबाबतचा कोणताही उल्लेख नाही. तसेच रुग्णालय तोट्यात गेल्याची कारणे देण्यात आलेली नाहीत. उत्तरात नमूद करण्यात आले आहे की, ग्रामीण भागातील गरीब रुग्णांना माफक दरात वैद्यकीय सुविधा ग्रामीण रुग्णालय पनवेल मार्फत उपलब्ध आहेत. परंतु त्या परिसरात कोणतेही दुसरे रुग्णालय नाही. त्यामुळे तेथील भागांतील लोकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे. तेव्हा तेरणा रुग्णालय पुन्हा सुरु करण्याबाबत तेरणा चॅरिटेबल ट्रस्टला शासन सूचना देणार का ?

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25999.....

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे रुग्णालय पुन्हा सुरु करण्याबाबत यापूर्वीच शासनाने कळविले आहे. हे रुग्णालय खाजगी आहे. ज्या जागेवर हे रुग्णालय उभे करण्यात आले ती जागा रुग्णालयासाठी आरक्षित होती. मागील तीन-चार वर्षापूर्वी हे रुग्णालय तोटयात गेल्यामुळे बंद होते. हे रुग्णालय बंद असले तरी त्या परिसरात ग्रामीण रुग्णालय उपलब्ध आहे त्यामुळे रुग्णांची गैरसोय होत नाही.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, या रुग्णालयास मागील तीन वर्षे रुपये 63.45 लाख इतका तोटा झालेला आहे, याची चौकशी शासनाने केली आहे काय ? मंत्रिमहोदयांनी सांगितले की, त्या परिसरात ग्रामीण रुग्णालय आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, मी स्वत: त्या ठिकाणी जाऊन आलेलो आहे. तेथील ग्रामीण रुग्णालय योग्य पध्दतीने चालत नाही. तेव्हा या बाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, हे खाजगी रुग्णालय आहे. ते तोट्यात कसे गेले याची चौकशी शासनाने करण्याची आवश्यकता नाही. त्या ठिकाणी ग्रामीण रुग्णालय आणि पनवेल नगरपालिकेचे रुग्णालय आहे. तसेच ग्रामीण रुग्णालयाला शासनाने 2 कोटी रुपयांचा निधी मंजूर केलेला आहे. त्यामुळे तेथील रुग्णाचे हाल होणार नाहीत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय अतिशय बेफिकिरीने उत्तरे देत आहेत. मंत्रिमहोदयांनी त्यांच्या उत्तरात सांगितले की, हे खाजगी रुग्णालय आहे तेव्हा ते तोटयात गेले किंवा कसे याची चौकशी शासनाने करण्याची आवश्यकता नाही. माझे मंत्रिमहोदयांना प्रश्न आहेत की, तेरणा ट्रस्टला रुग्णालय उभे करण्यासाठी राज्य शासनाने भूखंड दिला हे खरे आहे काय, असल्यास कोणत्या अटी व शर्तीवर भूखंड देण्यात आला, त्या रुग्णालयाला मेडिकल कॉलेज ॲटेच आहे का, असल्यास तेथील विद्यार्थी पुढील शिक्षण कुठे पूर्ण करणार आहेत ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, तेरणा ट्रस्टला पनवेल येथील सेक्टर 11 व 12 हा दवाखान्यासाठी राखीव असलेला भूखंड 1 कोटी 28 हजार रुपये किंमतीला दिलेला आहे. या रुग्णालयास तेरणा कॉलेज ॲटॅच आहे म्हणून ते रुग्णालय सुरु व्हावे असा ट्रस्टचा प्रयत्न आहे. हे रुग्णालय लवकरात लवकर सुरु व्हावे असा शासनाचा देखील प्रयत्न आहे.

यानंतर श्री.पुरी....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.अजित... 12:25

ता.प्र.क्र.25999....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आताच माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले की, सेक्टर 12 मधील भूखंडाची जागा तेरणा ट्रस्टने विकत घेतली होती. मग, हे हॉस्पीटल मेडिकल कॉलेजला ॲटेच होते का ? हे हॉस्पीटल बऱ्याच वर्षांपासून बंद पडलेले आहे. त्याठिकाणचे विद्यार्थी आपण कुठल्या हॉस्पीटला ॲटॅच केले ? आज ग्रामीण रुग्णालयाची अशी अवस्था आहे की, त्याठिकाणी डॉक्टर्स्, नर्सेस नाहीत वा औषधांचीही व्यवस्था नाही. त्यामुळे माझा प्रश्न आहे की, आपण तेरणा मेडिकल कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची व्यवस्था दुसऱ्या कुठल्या ट्रस्टमध्ये केली आहे ? हे हॉस्पीटल कुठे ॲटॅच केलेले आहे ? व या ट्रस्टचे संचालक कोण आहेत ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, कुठल्या हॉस्पीटलला हे हॉस्पीटल ॲटॅच केले आहे, याची माहिती सध्या माझ्याकडे उपलब्ध नाही. परंतु डॉ.पद्मसिंह बाजीराव पाटील हे त्याचे विश्वस्त आहेत.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात. )

श्री.दिवाकर रावते : त्याठिकाणचे विद्यार्थी सध्या कुठे शिकत आहेत याची शासनाला माहिती नाही का ? माननीय मंत्री महोदयांना या प्रश्नाची माहिती नाही, त्यामुळे हा प्रश्न राखून ठेवावा, अशी माझी माननीय सभापती महोदयांना विनंती आहे. याठिकाणी माननीय मंत्री महोदय सभागृहाची दिशाभूल करीत आहेत, त्यामुळे त्यांना समज द्यावी.

**सभापती** : याठिकाणी मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या उप प्रश्नांना माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले आहे की, या ट्रस्टचे संस्थापक डॉ.पद्मसिंह बाजीराव पाटील असून हे हॉस्पीटल अनेक वर्षे तोटयात गेल्यामुळे त्यांनी ते बंद केलेले आहे. ते सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाचे सातत्याने प्रयत्न चालू आहेत.

( विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य एकदम बोलतात. )

श्री.हसन मुश्रीफ : त्याठिकाणच्या रुग्णालयातील रुग्णांची गैरसोय होत नाही, हेही मी सांगितलेले आहे.

( विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य एकदम बोलतात. )

**सभापती** : मी हा तारांकित प्रश्न राखून ठेवत आहे.

---------

(..2......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**वोक्हार्ट वोसुलिन इंजेक्शनवर घालण्यात आलेली बंदी**

**(३) * २४५७६ डॉ. दिपक सावंत , श्री. सुरेश जेथलिया , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. अनिल परब , श्री.परशुराम उपरकर :** सन्माननीय **अन्न व औषधे प्रशासनमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील वोक्हार्ट या औषध निर्मिती कंपनीने चुकीचे मिश्रण असणारे इन्सुलिनचे इंजेक्शन बाजारात आणल्याबद्दल दंडात्मक कारवाई म्हणून वोक्हार्ट कंपनीला वोसुलिनच्या दहा बॅचचे स्टॅबिलीटी रिपोर्ट सादर करणाचे आदेश अन्न व औषध प्रशासनाने दिले आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्टॅबिलीटी रिपोर्ट सादर करेपर्यंत कंपनीच्या औरंगाबाद येथील वोसुलीन उत्पादनावर बंदी घालण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वोक्हार्ट सारख्या नामांकित कंपनीच्या चुकीच्या मिश्रणाच्या इन्सुलिन इंजेक्शनच्या रोग्यावरील वापरामुळे रोगी दगावल्याची अथवा त्यांच्या आरोग्यावर अनिष्ट परिणाम झाल्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री.बाबा सिध्दीकी, श्री.मनोहर नाईक यांच्याकरिता** : (१) अन्न व औषध प्रशासनाकडून वोक्हार्ट कंपनीला वोसुलिनच्या पाच बॅचचे स्टॅबिलिटी रिपोर्ट सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, हे खरे आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) या प्रकरणी केलेल्या चौकशीत सदर रुग्णामध्ये हायपोग्लायसेमियाची लक्षणे आढळून आली. सदर पेढीने उत्पादित केलेल्या काही वायल्समध्ये क्लाऊडी सोल्यूशन ऐवजी क्लिअर सोल्यूशन आढळून आल्याने सदर औषध पाठाची उत्पादन अनुमती रद्द करण्यात आली. तसेच खबरदारीचा उपाय म्हणून इतर राज्यातील औषध नियंत्रकांना सदर औषधाची विक्री व वितरण थांबविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, वोसुलिन इन्सुलिनचे इंजेक्शन वोक्हार्ट कंपनी बनवते. त्यातील एका बॅचमध्ये दोष आढळलेला आहे. वोसुलिन इन्सुलिनचे इंजेक्शन डायबेटीज कमी करण्यासाठी वापरण्यात येते. त्यामुळे पेशंटच्या रक्तातील साखरेचे प्रमाण नॉर्मल राहण्याच्या दृष्टीने हे इंजेक्शन काम करते. माझे याठिकाणी असे प्रश्न आहेत की, आपण या वोक्हार्ट कंपनीला हे इन्सुलिन इंजेक्शन तयार करण्यासाठी ज्यावेळी परवानगी दिली होती, त्यावेळी या इंजेक्शनच्या बाबतीत स्टॅबिलीटी रिपोर्ट घेतला होता काय ? तसेच, याबाबतीत आपण किती

..३.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.२४५७६....

डॉ.दीपक सावंत....

साली परवानगी दिली होती ? वास्तविक हे इन्सुलिन क्लाऊडी सोल्यूशन असते, परंतु ते क्लिअर सोल्यूशन आढळले नाही, या मागची कारणे काय ? यामागे कोणते दोष होते ? व त्यामुळे किती रोगी दगावले ?

श्री.बाबा सिध्दीकी : सभापति महोदय, एक भी रोगी की मृत्यु नहीं हुई है. इस इन्सुलिन के स्टेरीलीटी और इनटॉक्सिन टेस्ट को पास किया गया था. इसमें सिर्फ डिस्क्रिप्शन फेल हुआ है. उसकी वजह यह है कि तापमान ८ डिग्री से कम रखना चाहिए था. लेकिन अब हमने पूरा स्टॉक वापस कर दिया है और कंपनी से कहा है कि जब तक उसकी सटॅबिलीटी रिपोर्ट नहीं आ जाती तब तक उसको परमीशन नहीं देगे.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, वोक्हार्टचे इन्सुलिन इंजेक्शन मिल्की नव्हते, म्हणून कारवाई करण्यात आली. अशा ४-५ कंपन्या भारतात आहेत,

नंतर कु.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंतराव पवार ......

आणि औषध निर्मिती उद्योगामध्ये अनेक मल्टीनॅशनल कंपन्या आलेल्या आहेत. युनायटेड कंपनी मध्ये ॲबेट ही एक कंपनी आहे डेन्मार्कमधील नोव्हो कंपनी आहे आणि युनायटेड स्टेटस मधील इनिलि तसेच भारतातील दोन कंपन्या व बॅंगलोर मधील बायोकेम अशा अनेक कंपन्या आहेत. या ज्या मल्टिनॅशनल्स कंपन्या आहेत त्या सर्व कंपन्यांच्या औषधांच्या किंमती कमी आहेत. 129 रुपयांना 10ml. वायल मिळते. इतर कंपन्यांच्या औषधाची किंमत 158 रुपया पर्यंत होती. वोक्हार्ट कंपनीने 129 रुपयांना औषध मार्केटमध्ये आणल्या नंतर मल्टीनॅशनल्स कंपन्यांनी स्वत:ची लॉबी तयार करुन या कंपनीचे प्रॉडक्शन कसे बंद करता येईल या संदर्भात प्रयत्न केले होते हे खरे आहे का ?

(उत्तर नाही)

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा येथे हरकतीचा मुद्दा आहे. कोणत्या कंपनीने कोणत्या किमतीस औषधे विकावे हा मुद्दा वेगळा आहे. सन्माननीय मंत्र्यांचे उत्तर हे अन्न व औषधी द्रव्ये या विभागाच्या अधिकाऱ्यांवर चार्ज आहे की, या मल्टीनॅशनल कंपनीला खुष करण्याकरिता महाराष्ट्र शासनाच्या अधिकाऱ्यांनी स्टॅबिलिटी सॅंपल एका केसमध्ये फेल केले .माझी अशी विनंती आहे की, माननीय मंत्री महोदयांनी जे उत्तर दिले ते वोक्हार्ट कंपनीचे प्रवक्ते ज्याप्रमाणे उत्तर देतात त्याप्रमाणे त्यांनी येथे उत्तर दिलेले आहे. मी आरोप करीत नाही की,ते या कंपनीचे प्रवक्ते आहेत.याबाबतीत त्यांनी जे वक्तव्य केले आहे त्याचा अर्थ असा आहे की, मल्टीनॅशनल्स कंपन्यांनी कट केला . अन्न व औषध खात्याचे जे अधिकारी आहेत ते या कंपनीचे दलाल आहेत का ? त्याामुळे सन्मानीनय मंत्री महोदयांच्या उत्तराप्रमाणे अन्न व औषध विभागाच्या अधिकाऱ्यांवर चार्ज जातो अशा पद्धतीने त्यांचा रोख आहे. तेव्हा असे उत्तर देणे योग्य होणार नाही आपले उत्तर त्यांनी मागे घ्यावे अशी मी आपणास विनंती करतो.

सभापती महोदय, यामध्ये दुसरा भाग असा आहे की, वोक्हार्ट कंपनीचे वोसुलिन इंजेक्शन 129 रुपयांस दुकानात विक्रीसाठी उपलब्ध होते आता त्याची किंमत 158 रुपयांपासून 140 रुपया पर्यंत किंमती कमी केल्या आहेत आता हे इन्सुलिन बंद झाल्यानंतर त्याच्या किमती पुन्हा वाढविल्या गेल्या आहेत. ही वस्तुस्थिती खरी आहे का ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र.24576.........

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी वोक्हार्ट इन्सुलिनच्या अनुषंगाने उत्तर द्यावे.

श्री वसंत पवार: वोक्हार्ट कंपनीच्या वोसुलिन इन्सुलिन या औषधाची जी बॅच बंद करण्यात आली आहे त्यास पुन्हा परवानगी देणार आहात का ?

श्री.बाबा सिध्दीकी :सभापति महोदय, सबसे पहले हमारे सदन के ज्येष्ठ सदस्य श्री. नितीन गडकरी ने पूछा है, उसके बारे में मैं यह कहना चाहता हूं कि यह सायंटिफिकेली प्रूव्ह हुआ है, उसका उत्तर लिखित में दिया है. मैं कोई दिशाभूल नहीं कर रहा हूं. डॉ. पवार ने जो कहा है, उसके बारे में मैं यह बताना चाहूंगा कि क्लाऊडी सोल्यूशन के बजाए क्लिअर सोल्यूशन पाया गया था. इसलिए जब तक स्टॅबिलीटी रिपोर्ट नहीं आ जाती तब तक कोई भी निर्णय लेना उचित नहीं होगा.स्टॅबिलीटी रिपोर्ट देने के बाद ही परवानगी दी जाएगी.

यानंतर श्री रोझेकर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.24576 पुढे सुरु.........**

श्री नितीन गडकरी : सभापति महोदय, मैं यह कह रहा हूं कि 8 डिग्री तापमान होगा तो कोई समस्या पैदा नहीं होगी. मैं यह जानना चाहता हूं कि इसमें किसका दोष है, कंपनी का दोष है, अस्पताल का दोष है या दुकानदार का दोष है ?

श्री बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, 8 डिग्री तापमान से इन्सुलिन निकलता है. तापमान मेन्टेन होना चाहिए. लेकिन यह प्रकिया बहुत लंबी होती है. इसलिए तापमान कहां मेन्टेन नहीं हुआ यह पता नहीं चलेगा. पूरा स्टॉक खराब हुआ होता तो हाहाकार मच जाता. लेकिन यह एक दो वायल में तापमान बढ़ गया होगा.ऐसी हमारी सोच है लेकिन अभी स्पष्ट रुप से पता नहीं चला है. लेकिन जैसा मैंने कहा है कि वायन्स में क्लाऊडी सोल्यूशन के बजाए क्लिअर सोल्यूशन पाया गया था इसलिए इस औषध के उत्पादन पर अनुमति रद्द कर दी गई है.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा शेवटचा प्रश्न असा आहे की, 8 डिग्री टेम्परेचर मेंटेन केले पाहिजे पण ते न केल्यामुळे वायल्समध्ये क्लाऊडी सोल्यूशन ऐवजी क्लिअर सोल्यूशन आढळून येते, असे माननीय मंत्री महोदयांचे म्हणणे आहे. 8 डिग्री टेम्परेचर मेंटेन न केल्यामुळे हायपोग्लासेमिया हा रोग पेशंटला होतो, याविषयी मंत्री महोदयांना माहिती आहे का ? नसल्यास माहिती त्यांनी पटलावर ठेवावी.

श्री.बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

----------------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**शिर्डी (जि. अहमदनगर) येथे येणाऱ्या पालख्यांसाठी बांधावयाचे थांबे**

**(४) * २७००८ श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते , श्री. विनोद तावडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिर्डी (जि. अहमदनगर) येथे मुंबई व मुंबई परिसरातून हजारो पालख्या विविध धार्मिक उत्सवानिमित्त जात असतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साई संस्थांन (शिर्डी) यांनी मुंबई ते शिर्डी या मार्गावर आठ ठिकाणी पालखी थांबे व रुंद व पक्के रस्ते बांधण्याचे जाहिर केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी विविध ठिकाणी पालखी थांबे बांधावेत असे शिर्डी संस्थानला दिनांक २० डिसेंबर, २००६ वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यावर शासनाने काय कार्यवाही केली, सदर पालखी थांबे कधी बांधण्यात येंणार आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) विविध उत्सवाच्या वेळी विशेषत: रामनवमी उत्सवाच्या वेळी सुमारे ६० पालख्या मुंबई व मुंबई परिसरातून शिर्डी येथे जात असतात.

(२), (३) व (४) होय. मुंबई ते शिर्डी या मार्गावर अंदाजे ३० कि.मी अंतरावर एक याप्रमाणे नऊ ठिकाणी पालखी थांबे उभारण्याचे संस्थानतर्फे नियोजन करण्यात आले आहे.

ठाणे ते शिर्डी या मार्गावर पालखी पदयात्रींसाठी रस्त्याच्या बाजूने चार मीटर रुंदीची मार्गिका बांधण्याबाबतचा प्रस्ताव शिर्डी संस्थानने सादर केला आहे. सदर प्रस्ताव विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, साई भक्तांसाठी चांगल्या योजनांचे नियोजन करुन अनेक स्तुत्य उपक्रम शिर्डी संस्थानने राबविले आहेत. मुंबई परिसरातून मोठया प्रमाणावर साईभक्त शिर्डी येथे जात असतात. प्रवासाच्या दृष्टीने विविध ठिकाणी थांबे बांधण्याची संस्थानची योजना आहे व एकूण ९ ठिकाणी असे थांबे प्रस्तावित करण्यात आलेले आहेत. या थांब्यांचे काम नेमके केंव्हा सुरु होणार आहे ? दिवसेंदिवस साईभक्तांची संख्या वाढत आहे. रायगड जिल्हयामधून साईभक्त शिर्डी येथे जात असतात. त्या भागातील प्रवाश्यांसाठी कळंबोलीच्या आसपास थांबा प्रस्तावित करण्यात येईल काय, त्याचप्रमाणे डोंबिवली, कल्याण या भागातील साईभक्तांसाठी डोंबिवली-मानपाडा येथे थांबा प्रस्तावित करण्यात येईल काय, तसेच मुंबई-नाशिक महामार्गावर शहापूर येथे थांबा बांधणार काय ?

..3.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.27008 पुढे सुरु**..........

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मुंबई परिसरातून रोज जवळ जवळ 25 ते 30 हजार साईभक्त शिर्डी येथे दर्शनासाठी जात असतात. मुंबई ते शिर्डी या मार्गावर अंदाजे प्रत्येकी 30 कि.मी.अंतरावर याप्रमाणे सायाळे, वावी, सिन्नर, पांगरी, पांढुर्ली, घोटी, पाडळी, लतीफवाडी, पेंढरघोळ, वाहुली या ठिकाणी पालखी थांबे उभारण्याचे संस्थानतर्फे नियोजन करण्यात आले आहे. पैकी सिन्नर, पांढुर्ली व पांगरी या तीन थांब्यांसाठी जागा उपलब्ध झाली आहे व सिन्नर येथील थांब्याचे काम सुरु झाले असून 40 लक्ष रुपयांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. पांगरी येथील कामासाठी 15 लक्ष रुपयांचे व पांढुर्ली येथील कामासाठी 40 लक्ष रुपयांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. पांढुर्ली येथील कामाची वर्क ऑर्डर देखील देण्यात आली आहे. उर्वरित 6 ठिकाणी थांबे बांधण्यासाठी जागा उपलब्ध झालेली नाही. रायगड परिसरातील साईभक्तांसाठी कळंबोली येथे थांबा बांधण्याबाबतचा प्रस्ताव शिर्डी संस्थानसमोर नाही.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, 9 पैकी 3 थांब्यांचे काम सुरु झाले आहे, असे मंत्री महोदयांनी सांगितले. 6 थांब्यांसाठी अद्याप शासनाला जागा मिळालेली नाही. या 6 थांब्यांसाठी जागा मिळवून थांब्याचे काम पूर्ण करण्यासाठी किती कालावधी लागणार आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, 6 थांब्यांसाठी जागा उपलब्ध करुन देण्याची विनंती महसूल विभागाला तसेच संबंधित ग्राम पंचायतींना करण्यात आली आहे. जागा उपलब्ध झाल्याबरोबर काम सुरु करण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मुंबई नाशिक एक्सप्रेस-वेच्या चौपदरीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत हाती घेण्यात आले आहे. याच कामामध्ये मार्गिकेचा, वाटिकेचा अंतर्भाव होणार काय ? किंवा संकल्पित चौपरीकरणामुळे शिर्डी संस्थांनच्या मार्गिका, वाटिका प्रस्तावास आडकाठी येणार आहे काय ?

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.विनोद तावडे यांनी विचारलेल्या प्रश्नालाच पूरक प्रश्न असल्यामुळे मला प्रश्न विचारण्याची परवानगी द्यावी. राष्ट्रीय महामार्गाचे काम करीत असतांना अशी तरतूद आहे की, या महामार्गावर सब-वे किंवा सर्व्हिस रोड बांधण्यात येतात. तसेच या रोडवर प्रवासी सुविधा म्हणून मोटेल, पेट्रोल पंप उभारण्यात येतात. या सुविधांसाठी केंद्र शासनाकडून भूसंपादन करण्यात येते व त्याचा खर्च केंद्र शासन करते.

..4.......



SRR/ SBT/ MHM/ 12:35

**ता.प्र.क्र.27008 पुढे सुरु..........**

श्री.नितीन गडकरी...........

तेंव्हा, याच प्रस्तावात मार्गिका व वाटिकांचा समावेश केल्यास राज्य शासनाला वेगळा खर्च करण्याची गरज लागणार नाही व साईभक्तांचीही सोय होऊ शकेल. यादृष्टीने शासन प्रयत्न करणार काय ?

यानंतर कुमारी जयश्री..........

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ MHM/ SBT प्रथम श्री.रोझेकर...... 12:40

ता.प्र.क्र.27008.....

श्री.विनोद तावडे : माननीय मुख्यमंत्री हे साईबाबांचे भक्त आहेत म्हणून शिर्डी येथील जनतेलाही त्याचा काहीतरी लाभ झाला पाहिजे.

श्री.गणेश नाईक : ठाणे ते शिर्डी या महामार्गावर पालखी यात्रेसाठी चार मीटर रुंदीचा रस्ता बांधण्याचा प्रस्ताव आलेला आहे, या प्रस्तावांतर्गत पहिल्या टप्प्यामध्ये 50 मीटर लांबीचा खांब बांधण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याकडून 11 कोटी रुपये मिळणार आहेत. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्याची माहिती माझ्याकडे उपलब्ध नाही. सन्माननीय सदस्यांनी विचारले की, या कामामध्ये अडथळे येणार आहेत का ? यावर माझे उत्तर आहे की, या कामामध्ये निश्चितच काही अडथळे येणार आहेत. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी जो प्रश्न विचारला त्याबाबत शासन निश्चितपणाने विचार करेल.

श्री.नितीन गडकरी : शासनाला याकरिता 11 कोटी रुपये लागणार नाहीत. 50 किलोमीटरच्या रस्त्यावर रोड साईट सर्व्हिस सेंटर चालू करण्याकरिता केंद्रसरकार पैसे देते परंतु पेट्रोल पंप आणि हॉटेल बांधून झाले की झाले काम संपले.

श्री.गणेश नाईक : याबाबत सार्वजनिक बांधकाम खात्याबरोबर चर्चा केल्यानंतर निर्णय घेण्यात येईल.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, शासनाने हे जे 9 थांबे बांधण्याचा विचार केलेला आहे, ते थांबे कोणत्या ठिकाणी बांधण्यात येणार आहेत, याचा तपशील मला पाहिजे होता. या पालख्या रामनवमी व गुरुपोर्णिमेच्या वेळेलाच येतात, ऐरवीच्या काळामध्ये या खांबाचा उपयोग करण्याच्या दृष्टीकोनातून शासन शिर्डी संस्थानाला काही सूचना देणार आहे का ?

श्री.गणेश नाईक : रामनवमी,गुरुपोर्णिमा,साईबाबा पुण्यतिथी या सारख्या अनेक दिवशी वर्षभर पालख्या चालूच असतात त्यामुळे वर्षभर या खांब्यांचा उपयोग पालख्यांसाठी सातत्याने होत असतो.

I - 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.27008......

श्री.प्रकाश शेंडगे : मुंबई - सभापती महोदय, ज्याप्रमाणे पुणे - मुंबई एक्सप्रेस हायवे तयार झालेला आहे त्याप्रमाणे नाशिक एक्सप्रेस हायवे तयार होत आहे या दोन्ही हायवेवरुन पालख्यांना जाण्यासाठी परवानगी मिळणार आहे का ?

**सभापती** : सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाचा या प्रश्नाशी काहीही संबंध नाही, हा प्रश्न वेगळया विषयाशी संबंधित आहे.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## परभणी शहरात अंडरग्राऊंड ड्रेनेज निर्माण करणेबाबत

**(५) * २४९९० प्रा. फौजीया खान , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. सदाशिवराव पोळ , श्री. वसंतराव चव्हाण , श्रीमती उषाताई दराडे : :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये परभणी हे एकमेव असे जिल्ह्यांचे ठिकाण आहे, जेथे अंडरग्राऊंड ड्रेनेज नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत वारंवार मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकांचे आरोग्य लक्षात घेऊन याबाबत काय उपाययोजना करण्यात येत आहेत ?

**श्री.राजेश टोपे,राज्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) परभणी शहरामध्ये भुमिगत गटारे नाहीत, हे खरे आहे.

(२) होय.

(३) शहरातील सांडपाण्याची विल्हेवाट व्यवस्थितपणे करण्यासाठी प्राधान्य देण्याच्या सूचना नगरपरिषदेस देण्यात आलेल्या आहेत. शहरामध्ये मोठी उघडी गटारे, तसेच छोट्या नाल्या असून वेळोवेळी त्यांची सफाई करण्यात येते. जेणेकरुन शहरातील नागरिकांचे आरोग्य अबाधित राहू शकेल.

प्रा.फौजिया खान :सभापति महोदय, उत्तर क्रमांक तीन में यह कहा है- " शहरातील सांडपाण्याची विल्हेवाट व्यववस्थितपणे करण्यासाठी प्राधान्य देण्याच्या सूचना नगरपरिषदेस देण्यात आलेल्या आहेत. शहरामध्ये मोठी उघडी गटारे, तसेच छोटया नाल्या असून वेळोवेळी त्यांची सफाई करण्यात येते. जेणेकरुन शहरातील नागरिकांचे आरोग्य अबाधित राहू शकेल". सभापति महोदय, मैं इस उत्तर से थोड़ी परेशान हूं क्योंकि नगरपरिषद की परिस्थिति ऐसी नहीं है कि वे कुछ इसके लिए कर सके. दूसरी बात यह है कि, यह कहा गया है कि नालों की सफाई समय समय पर की जाती है, यह भी सही नहीं है. क्योंकि मैं परभणी में रहती हूं इसलिए यह बताना चाहती हूं कि जलपूर्ति के पाईप तोड़े जाते हैं और वहां से पानी लिया जाता है. परभणी में दो तीन नाले हैं, बरसात में उन नालों का पानी पूरे शहर में फैल जाता है जिससे आरोग्य की समस्या भी खडी है. इसलिए मैं माननीय मंत्री जी कहना चाहती हूं कि जिस प्रकार से जीवन प्राधिकरण की ओर से पूरी स्कीम करके नगरपालिका को हस्तांतरित की गई है, तो कम से कम नगरपालिका की आज की परिस्थिति को देखते हुए क्या शासन अपने पैसे से परभणी शहर का सर्वे कराएगा, प्रोजेक्ट तैयार करेगा, बजट तयार करेगा और ट्रीटमेंट प्लान तैयार करेगा और क्या यह प्रोजेक्ट UIDSSMT से लेने के लिए बनाकर देगा ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय,UIDSSMT या योजनेच्या माध्यमातून परभणीला आताच स्टेअरिंग कमिटीने पाणीपुरवठयाची योजना त्या ठिकाणी क्लियर केलेली आहे. भुयारी गटारांच्या संदर्भात सन्माननीय सदस्या प्रा.फौजिया खान यांनी जो प्रश्न उपस्थित केला, यासंदर्भात मी असे सांगू इच्छितो की UIDSSMT चा प्रोजेक्ट रिपोर्ट, डी.पी.आर.तयार करणे,सर्व्हेक्षण करणे, या सगळया दृष्टीकोनातून परभणी नगरपालिकेला आर्थिक अडचणी आहेत, असा मला या ठिकाणी बोध होत आहे.

यानंतर श्री.बोरले......

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.24990**........

श्री.राजेश टोपे .........

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हा महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम आहे. यू.आय.डी.एस.एस.एम.टी. साठी डी.पी.आर. तयार करण्यात यावा, अशी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला सूचना करण्यात येईल. त्यासाठी लागणारा निधी शासनाकडून देण्यात येईल आणि डी.पी.आर. तयार करुन तो स्टेअरिंग कमिटीच्या माध्यमातून लवकरात लवकर केंद्र शासनाकडे पाठविण्यात येईल.

श्री.सुरेशदादा देशमुख : सभापती महोदय, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नगरपालिकांकडून 17 टक्के रक्कम घेत असते. नगरपालिकांची आर्थिक परिस्थिती चांगली नाही, याची माननीय मंत्री महोदयांना कल्पना आहे. शासन सर्व्हे करण्याची परवानगी टाटा कन्सलटन्सी किंवा इतर कंपन्यांना देईल काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, यू.आय.डी.एस.एस.एम.टी.साठी पाणी पुरवठा योजना असेल किंवा ड्रेनेज स्कीम असेल यासाठी लागणारा डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करण्याचे काम ख-या अर्थाने नगरपालिकेचे असते. नगरपालिकेने टाटा कन्सलटन्सी, क्रिसिल किंवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून सर्व्हे केला तरी चालेल. कोणाकडून सर्व्हे करुन घ्यावयाचा याचे अधिकार नगरपालिकेला आहेत. त्यासाठी लागणारे पैसे नगरपालिकेकडे उपलब्ध नसतील तर ते शासनाच्या वतीने देण्यात येतील. निधीचा पुरवठा करुन डी.पी.आर. तयार करण्यात येईल.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, परभणी ही मराठवाडयातील दुस-या क्रमांकाची नगरपालिका आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती फौजीया खान यांनी असा प्रश्न विचारला होता की, पाणीपुरवठयाची पाईप लाईन आणि ड्रेनेज यांचे एकत्रिकरण झाल्यामुळे परभणीमध्ये मोठया प्रमाणावर रोगराई परत आहे. ही वस्तुस्थिती आहे. ड्रेनेज लाईन एक-एक महिना साफ केली जात नाही. म्हणून शासन येणा-या पावसाळयापूर्वी परभणी नगरपालिकेला अनुदान देऊन पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन ड्रेनेजपासून वेगळी करण्याची व्यवस्था करील काय, त्यासाठी किती अनुदान दिले जाईल आणि ड्रेनेजच्या संपूर्ण कामाचे अंदाजपत्रक किती दिवसात तयार करण्यात येईल ?

..2.......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.24990........**

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी विचारलेला प्रश्न वेगळा आहे. 12 व्या वित्त आयोगातून जो निधी दिला जातो त्यातील 50 टक्के निधी अर्बन एन्व्हायरमेंटसाठी खर्च करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या असतात. 12 व्या वित्त आयोगाचा निधी नुकताच देण्यात आलेला आहे. त्यातून यासाठी लागणारा खर्च करता येणे शक्य आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले की, सर्व्हे करण्याकरिता नगरपालिकेला अनुदान देण्यात येईल. परभणी नगरपालिका ही "अ" वर्ग नगरपालिका आहे. राज्यातील नगरपालिकांना सर्व्हे करण्यासाठी शासनाने किती निधी दिलेला आहे ? अलिबाग ही "क" वर्ग नगरपालिका आहे. सर्व्हे करण्यासाठी अलिबाग नगरपालिकेने स्वत:च्या फंडातून 16 लाख रुपये टाटा कन्सलटन्सीला दिलेले आहेत. ज्या नगरपालिकांनी सर्व्हे करण्यासाठी स्वत:च्या फंडातून पैसे खर्च केले असतील त्या नगरपालिकांना शासन अनुदानातून पैसे परत देणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, यू.आय.डी.एस.एस.एम.टी. टोटल प्रोजेक्टमध्ये फंडींग करते. त्यामध्ये सर्व्हेक्षणासाठी लागणा-या पैशांचा अंतर्भाव असतो. यू.आय.डी.एस.एस.एम.टी.कडून जे पैसे मिळतात त्यातून पैसे परत करणे शक्य असते. शासन आपले विशेष अधिकार वापरुन नगरपालिकांची आर्थिक स्थिती बघून त्यांना निश्चितपणे मदत करेल.

--------

(यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ठाणे महापालिका क्षेत्रात अनियमित पाणीपुरवठा होत असल्याबाबत**

**(६) * २६१०८ श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. लक्ष्मण जगताप , डॉ. वसंत पवार , श्री. सदाशिवराव पोळ , श्री. वसंतराव चव्हाण , श्रीमती मंदा म्हात्रे , प्रा. फौजीया खान , श्री. राजेंद्र जैन , श्री. जगन्नाथ शेवाळे : तारांकित प्रश्न क्रमांक २२१३० ला दिनांक ६ डिसेंबर, २००६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :**
सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महापालिका क्षेत्रामध्ये होत असलेल्या अनियमित पाणीपुरवठ्याचा विचार करता करण्यात येत असलेले वितरण व्यवस्थेचे काम पूर्ण झाले आहे काय,

(२) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्नी करण्यात येत असलेली कार्यवाही पूर्ण झाली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत महापालिका क्षेत्रातील विशेषत: वागळे इस्टेट, रोड नं. २२ परिसरामध्ये रात्री अपरात्री करण्यात येत असलेल्या अपुरा तथा अनियमित पाणीपुरवठ्याप्रकरणी कोणती उपाययोजना केली जावी यासाठी कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री.राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१), (२) व (३) ठाणे शहराच्या पिण्याच्या पाण्याच्या वितरण प्रणालीमध्ये सुधारणा करण्यासाठी ठाणे महानगरपालिकेने पाणी वितरण व्यवस्था ही योजना हाती घेतली असून त्यात सद्या निविदा प्रक्रिया सुरु आहे.

ठाणे शहरातील लोकसंख्येत वाढ झालेली असल्याने पाण्याच्या मागणीतही वाढ झालेली आहे. सर्व विभागांना पाणी पुरवठा होण्याच्या दृष्टीने पाणी पुरवठ्याचे नियोजन केले असल्याने ठाणे शहरातील काही भागात रात्री पाणी पुरवठा केला जात आहे. पाणी वितरण व्यवस्थेत नवीन जलकुंभ व संप-पंप हाऊस बांधण्यासाठी पुनर्नियोजन करण्याचे काम ठाणे महानगरपालिकेने हाती घेतले आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी ठाणे महानगरपालिका क्षेत्रात होत असलेल्या अनियमित पाणीपुरवठयाच्या प्रश्नाबाबत आम्हाला मदत केलेली आहे. याबाबत मी सांगू इच्छितो की, माझा प्रश्न ठाणे महानगरपालिकेमार्फत केल्या जाणाऱ्या पाणी वितरण व्यवस्थेबाबत आहे. ठाणे महानगरपालिकेमध्ये टेंडर काढण्याची आगळीवेगळी पध्दत आहे, खड्डे एकाने खोदायचे, दुसऱ्याने भरावयाचे, माल तिसऱ्याने टाकायचा. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि ठाणे महानगरपालिकेची पाणीपुरवठयाबाबत जी व्यवस्था आहे, त्यामध्ये पाईप विकत घेणे, Laying and Commissioning एकत्रितरित्या झाले पाहिजे. अशा प्रकारचे एकत्रित टेंडर काढण्याचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाद्वारे केले जाते. ठाणे महानगरपालिकेने इलेक्ट्रो स्टील कंपनीला मदत करण्यासाठी हे केले असावे. म्हणून तेथे पाईप

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एकाने विकत ध्यायचे, दुसऱ्याने टाकायचे आणि तिसऱ्याने त्याचे Commissioning करावयाचे अशा प्रकारची टेंडर सिस्टीम चालू आहे. याबाबत माझा स्पेशिफीक प्रश्न आहे की, कंप्लीटेड वर्कची संज्ञा पी.डब्ल्यू.डी., एरिगेशन, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये आहे. या विभागात कंप्लीटेड वर्कचे टेंडर निघते, वेगवेगळया कामाचे टेंडर निघत नाही. त्याप्रमाणे आपण कंप्लीटेड वर्कचे टेंडर ठाणे महानगरपालिकेला काढायला लावणार का ? ठाणे महानगरपालिका Laying and commissioning चे एकत्रित टेंडर न काढता  खड्डे खोदण्याचे काम एका एजन्सीला देते. पाईप विकत घेण्याचे काम दुसऱ्या एजन्सीला देते आणि पाईप जोडण्याचे काम तिसऱ्या एजन्सीला दिले जाते. कंप्लीटेड वर्क ही संज्ञा वापरुन टेंडर काढले पाहीजे. कंप्लीटेड वर्क संज्ञेप्रमाणे टेंडर काढण्याचे आदेश आपण ठाणे महानगरपालिकेला देणार आहात काय ?.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, टेंडर कसे काढायचे याबाबत महानगरपालिकेचा अधिकार असतो व या कामासाठी त्यांचाच निधी असतो. याचे काही नॉर्मस आहेत परंतु पाईपलाईनचे वेगळे टेंडर आणि Laying चे वेगळे टेंडर देखील काढता येते तसेच एकत्रित पध्दतीनेही टेंडर काढता येते. याबाबत मी सांगितले आहे की, याचा अधिकार महापालिकेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.जितेंद आव्हाड यांनी विचारले आहे की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये एकत्रित टेंडर काढले जाते त्याप्रमाणे महापालिकेला एकत्रित टेंडर काढण्याबाबत सूचना देणार आहात काय ? याबाबत मी सांगू इच्छितो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून ही बाब तपासण्यात येईल, कारण महानगरपालिकेच्या आर्थिक बाबींशी संबंधित असलेले हे काम आहे, महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणार नाही याची काळजी घेतली जाईल. योग्य काय आहे, ते तपासण्यात येईल व तशी गरज असेल तर महाराष्ट्र शासनाच्या वतीने तशा प्रकारच्या सूचना महानगरपालिकेला देण्यात येईल.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील वाढती लोकसंख्या व शहरातील पाणीपुरवठयाबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. ठाणे जिल्हयातील धरणांमधून मुंबई शहरास पाणी पुरवठा होत आहे. माझा प्रश्न ठाणे जिल्हयाशी संबंधित असा आहे, ठाणे जिल्हयातील शहरांना पाणीपुरवठा करण्यासाठी बांधण्यात येणाऱ्या पोशीर धरणासाठी जमीन देण्यासाठी शेतकऱ्यांनी विरोध केलेला आहे हे खरे आहे काय ? विरोध केला असल्यास त्याची कारणे कोणती आहेत. ?

.....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील पाणीपुरवठयाबाबत प्रश्न उपस्थित झालेला आहे. माझ्या माहितीप्रमाणे 265 एमएलडी पाणी ठाणे शहराकरिता देण्यात आले आहे. पाणी पुरवठयाच्या वितरण व्यवस्थेमध्ये प्रश्न निर्माण झाल्यामुळे पाण्याची जी काही बोंब चालू होती ती अद्याप चालूच आहे. माझा स्पेशिफिक प्रश्न असा आहे की, तेथे जलकुंभ तयार असताना तीन वर्ष काम का बंद पडले ? त्यानंतर कोणते निष्कर्ष समोर आले आहेत ? तीन वर्ष पाईप का लावले गेले नाहीत, हे काम बंद होण्याची कारणे कोणती ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, ठाणे महानगरपालिकेच्या माध्यमातून सध्या 362 एम.एल.डी. पाणी दिले जात आहे. वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन फेज-1 व फेज-2 अशा दोन मोठया योजना पाणीपुरवठयासाठी आखण्यात आलेल्या आहेत. यामध्ये जलवितरण, जलकुभ, पंप हाऊस असेल. अशा पध्दतीने काम दोन फेजमध्ये काम करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी जो प्रश्न विचारला आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की, टप्पा-1 हा 63 कोटीचा असून 94 कि.मी. पाईपलाईन पूर्ण झालेली आहे. टप्पा-2 मध्ये 300 कि.मी.पैकी 161 कि.मी. पाईपलाईन पूर्ण झाली असून 139 कि.मी. चे काम बाकी आहे. या कामामध्ये तीन वर्षांची नव्हेतर एक-दीड वर्षाची दिरंगाई झालेली आहे. हे काम 2005 पर्यंत पूर्ण व्हायला पाहिजे होते, परंतु दीड वर्ष जास्त झालेले आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील रेट कॉन्ट्रक्टला गृहीत धरुन टेंडर काढण्यात आले होते. या कामासाठी श्री.रोटकर नावाचे रिटायर्ड मेंबर सेक्रेटरी नेमले होते.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय मंत्री महोदयांना अधिकाऱ्यांनी पुरविलेली माहिती चुकीची आहे. चुकीची माहिती रेकॉर्डवर येऊ नये यासाठी मी उभा आहे. माझ्या माहितीप्रमाणे जीवन प्राधिकरण रेट कॉन्ट्रक्ट करु शकत नाही, हे नॅशनल रेट कॉन्ट्रक्ट होते. त्या नॅशनल रेट कॉन्ट्रक्टमध्ये इलेक्ट्रो स्टील कंपनीने स्वत:ला बसवून घेतले होते आणि त्याबाबतचा आक्षेप सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी घेतल्यानंतर इलेक्ट्रो स्टील कंपनीची चौकशी सुरु झाली होती. चुकीचे रेकॉर्डवर येऊ नये म्हणून मी हा हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे.

.....4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी अद्याप उत्तर पूर्ण केले नाही, मला उत्तर पूर्ण करण्याची परवानगी द्यावी. टेंडर न काढता रेट कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर हे काम देण्यात आले होते, त्यामुळे हे काम थांबवावे, निविदेच्या माध्यमातून हे काम द्यावे असा श्री.रोटकर यांचा अहवाल आहे.

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे (पुढे चालू....) ता.प्र.क्र. 26108 ....

आणि त्या अहवालाच्या माध्यमातून नवीन टेंडर काढण्याचे काम चालू आहे. त्याला शासनाची मंजूरी लागेल त्यासाठी एक वर्ष लागेल. सन्माननीय सदस्यांनी जो यामध्ये विलंबाचा मुद्दा मांडला आहे तो योग्य असाच आहे, पण यासाठी लागणारी शासनाची मंजुरी, रोटेकर समितीचा अहवाल वगैरे कारणांमुळे यामध्ये उशीर झालेला आहे. परंतु 2008 च्या दरम्यान हे काम पूर्ण केले जाईल एवढेच मी आपल्याला या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, 72 वी अमेंडमेंट केल्यानंतर महापालिकांना आपण स्वायत्तता दिलेली आहे त्यामुळे आता त्यांनी टेंडर्स कशी काढावीत हे आपण त्यांना सांगणे बरोबर होणार नाही. आता या संबंधात आपण जीवन प्राधिकरणाचा उल्लेख केला आहे. परंतु जीवन प्राधिकरण म्हणजे एक फ्रॉड आहे. हे महामंडळ संपूर्णत: आऊट डेटेड टेक्नॉलॉजी घेत असते. इलेक्ट्रोमॅट कंपनी आहे त्यांची तर यामध्ये मोनोपोली आहे. हे आपल्या कॉस्ट ऑफ प्रॉडक्शन पेखाही खूप जास्त मार्जिन घेतात. तेव्हा या संदर्भात माझी आपल्याला विनंती आहे की, सगळ्या महापालिका, नगरपालिका मोठ्या प्रमाणात हे खरेदी करतात तेव्हा त्याचा दर्जा, त्याबाबतचे निकष वगैरे सगळे आपण पक्के करा, त्याची पद्धत काय राहील हेही पक्के करा. या बाबतीत एमएसएसआरडीसीची पद्धत चांगली आहे. तेव्हा ती सगळ्या महापालिकांना प्रपोज करा. जेणे करून त्यात भ्रष्टाचार होणार नाही. मी माननीय राज्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, आपल्याला आज हे दिसते तेवढे चांगले नाही. त्यात खूप काही गडबड आहे. तेव्हा याच्या खोलामध्ये जाऊन यामध्ये चांगली सिस्टीम आणण्याची गरज आहे, तरी त्यादृष्टीने शासन लक्ष घालील का ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांची सूचना निश्चितपणे चांगली आहे. त्याबद्दल शासन जरूर विचार करून काम करण्यात येईल.

****

....... एल 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पश्चिम द्रुतगती मार्गावर एम.एम.आर.डी.ए मार्फत चालू असलेल्या रस्ते विकासाचे कामामुळे वाहतुकीस होत असलेला अडथळा**

**(7) * 25071 श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद, श्री. धनाजी साठे, श्री. रमेश निकोसे, श्री. गोविंदराव आदिक, श्री.सय्यद जामा** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पश्चिम द्रुतगती मार्गावर एम.एम.आर.डी.ए मार्फत चालू असलेल्या रस्ते विकासाचे कामामुळे वाहतुकीस अडथळा होत असल्याबाबतचे निवेदन मा. लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, एम.एम. आर.डी.ए. मुंबई यांचे कडे दिनांक 2 फेब्रुवारी, 2007 रोजी वा त्या दरम्यान दिले आहे हे खरे आहे काय,
(2) असल्यास, मुंबई कडे जाणेसाठी वा मुंबईकडून उपनगराकडे जाणेसाठी तीन तासाचा कालावधी लागतो हे खरे आहे काय,
(3) असल्यास, सदर रस्ते विकासाचे चालू असलेल्या कामाचे वेळेत बदल करुन वाहतूकीस होणारा विलंब टाळण्याच्या दृष्टीने व सदर काम रात्री चालू ठेवणेबाबत कोणती कार्यवाही करण्यात येत आहे, वा आली आहे,
(4) अद्याप, कोणतीच कार्यवाही झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (1) होय.
(2) व (3) रस्ते विकासाचे काम चालू असल्यामुळे काही प्रमाणात विलंब होत असून वाहतुकीस विलंब होऊ नये, याकरीता तांत्रिक दृष्टीने शक्य ती कामे उदा. कॉंक्रिटची कामे वाहतूक विभागाने सूचना दिल्याप्रमाणे कंत्राटदारामार्फत दक्षता घेऊन रात्री चालू ठेवली जात आहेत.
(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, पश्चिम द्रूतगती मार्गावर या आधी लोकसंख्येचे प्रमाण खूप कमी होते परंतु आजच्या घडीला अंधेरी नंतर बोरीवली आणि पुढे विरार पर्यंत लाखोंच्या संख्येने लोकवस्ती झालेली आहे. द्रूतगती मार्गावर हायवे रूंदीकरणाचे काम मागील 2-3 वर्षापासून चालू आहे आणि त्यामुळे तेथे खूप मोठ्या प्रमाणात वाहतुकीचा खोळंबा होत असतो. त्यामुळे तेथून प्रवास करणाऱ्यांना मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. सभापती महोदय, विरार पासून वांद्रे पर्यंत जेवढी मोठमोठी हॉस्पिटल्स आहेत ती जवळपास सगळीच पश्चिमेच्या बाजूला आहेत. उदाहरणार्थ, वांद्रे येथील लीलावती हॉस्पिटल, पार्ला-सांताक्रूझ येथील नानावटी व कूपर हॉस्पिटल, बोरीवली येथील भगवती हॉस्पिटल., ही सारी हॉस्पिटल्स पश्चिमेच्या बाजूला आहेत आणि एक्सप्रेस हायवे हा पूर्वेच्या बाजूला असल्याने लोकांना त्यातून प्रवास करावा

...... एल 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुझफ्फर हुसेन (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 25071 ....

लागतो आणि वाहतुकीचा मोठा खोळंबा तेथे या कामामुळे होत असल्याने अर्ध्या तासाच्या प्रवासाला 3-3 तास लागतात त्यामुळे कित्येकदा लोकांची जीवित हानी, पेशंट वेळेवर अँब्युलन्सच्या माध्यमातून हॉस्पिटलमध्ये पोहोचू शकत नसल्याने होते. म्हणून हे उड्डाणपूल आणि रस्त्यांचे काम केव्हा पर्यंत पूर्ण आपण करणार आहात ? तसेच तेथे ॲम्ब्युलन्स आणि फायरब्रिगेडच्या गाड्यांना जाण्या-येण्यासाठी काही खास व्यवस्था करण्यात येणार आहे का ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, आपल्या सगळ्यांनाच माहिती आहे की, या ठिकाणी एमयूआयपीच्या माध्यमातून मुंबईच्या रस्त्यांचे काम मोठ्या प्रमाणात चालू आहे. त्याच्या पहिल्या फेजमध्ये मेन कॅरीडॉर घेण्यात आलेला आहे. पश्चिम आणि पूर्व द्रूतगती मार्गाचे रूंदीकरण आणि नूतनीकरणाचे काम डिसेंबर 2007 पर्यंत पूर्ण केले जाणार आहे. त्याच्यावर जे सात उड्डाणपूल आहेत ते पूर्व आणि पश्चिम हायवेवरील, डिसेंबर 2008 पर्यंत पूर्ण केले जाणार आहेत. सभापती महोदय, हे काम चालू असल्याने त्या महामार्गावर होत असलेला वाहतुकीचा खोळंबा लक्षात घेऊन तेथे आपण वाहतूक पोलिसांची मदत घेतो आणि एमएमआरडीए कडून वाहतूक वॉर्डन देखील आहेत. तसेच तेथे काँक्रीटींगचे काम रात्रीच्या वेळी केले जात आहे जेणे करून दिवसा वाहतुकीला अडथळा होऊ नये.

( यानंतर श्री. सरफरे ..... एम 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25071...

श्री. राजेश टोपे...

या दृष्टीकोनातून कॉक्रिटीकरणाचे काम रात्री करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्याठिकाणी इन्फॉर्मेशन बोर्ड लावले आहेत. ॲम्बुलन्सकरिता वेगळी व्यवस्था करण्यात येईल काय? अशाप्रकारे माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे. ही बाब तपासून तशाप्रकारच्या सूचना देण्यात येतील.

**सभापती** : प्रश्नोत्तराच्या तासाच्या प्रारंभी नियम 289 अन्वये प्रस्ताव घेण्यासंबंधी माननीय सदस्यांनी केलेल्या भाषणामध्ये प्रश्नोत्तराच्या तासातील वाया गेलेला 8 मिनिटांचा वेळ वाढवून देण्यात येत आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, एम.एम.आर.डी.ए.च्या कामांमुळे प्रवासाला विलंब होत नाही तर ही संस्था काम करीत असतांना पाणी पुरवठा करणारी मुंबई महानगरपालिका, गॅस कनेक्शन, वीज पुरवठा करणारी एम.एस.ई.बी., बी.ई.एस.टी., रिलायन्स एनर्जी या अत्यावश्यक सेवा देणाऱ्या संस्थांशी कोणताही समन्वय साधत नाही. एम.एम.आर.डी.ए. च्या खोदकामामुळे लोकांचे टेलिफोन कनेक्शन बंद पडतात. याबाबत त्यांच्याकडे अनेक वेळा तक्रारी केलेल्या आहेत. तेव्हा माझ ा असा प्रश्न आहे की, एम.एम.आर.डी.ए. यापुढे काम करीत असतांना सर्व संस्थांशी समन्वय साधून काम करील काय? आणि खोदकाम केल्यामुळे महानगर टेलिफोन कंपनी, वीज कंपनी यांच्या झ ालेल्या नुकसानीची भरपाई करील काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, कोणत्याही इंम्प्लिमेंटींग एजन्सीने काम करीत असतांना टेलिफोन कंपनीसारख्या निगडीत असलेल्या संस्थेकडून एन.ओ.सी. घेऊन काम केले पाहिजे. अशाप्रकारे एन.ओ.सी. घेऊन काम केले जात नसेल तर ती घेण्याची व्यवस्था करण्यासंबंधी एम.एम.आर.डी.ए. ला सूचना दिल्या जातील. त्याचप्रमाणे झालेल्या नुकसानीची भरपाई संबंधित कंपनीकडून मागितली गेली तर त्यासंबंधी निश्चितपणे विचार केला जाईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, एम.एम.आर.डी.ए. हा एक पांढरा हत्ती आहे. रस्त्यावरील मोठी झाडे तोडून टाकण्याचे काम करीत आहे. पश्चिम द्रुतगती महामार्गावरील नाला अरुंद केल्यामुळे मुंबईमध्ये 26 जुलैला महापूर आला. यामध्ये एम.एम.आर.डी.ए. चा दोष होता. असे असतांना एम.एम.आर.डी.ए. अगदी उन्मत्तपणे ही कामे करीत आहे. माननीय सदस्य श्री. मुझ फ्फर हुसेन म्हणाल्याप्रमाणे बांद्रयाहून बोरीवलीपर्यंत जाण्यास दीड तास लागतो. त्याहीपुढील प्रवास अत्यंत त्रासदायक असतो. त्याठिकाणी ट्रॅफिक ब्लॉकेज निर्माण झाले आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MHM/ SBT

ता.प्र.क्र. 25071...

श्री. मधुकर सरपोतदार...

तेव्हा याबाबतीत एम.एम.आर.डी.ए. ने सहकार्याची भूमिका जर घेतली नाही तर त्यांच्या विरोधात मुंबईमध्ये एक दिवस प्रचंड आंदोलन उभे राहील. आणि त्याचे उत्तर आपल्याला द्यावे लागेल. या दृष्टीकोनातून मुंबई महानगरपालिका, टेलिफोन कंपनी व अन्य संस्थांशी कामांबाबत समन्वय साधून पावसाळयापूर्वी एम.एम.आर.डी.ए. काही परिणामकारक उपाय योजना करणार आहे काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सर्व माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, मुंबईमध्ये जी वहातुकीची कोंडी आहे, ती दूर करण्याच्या दृष्टीने काही उपाय योजना करण्याची आवश्यकता आहे. त्याबाबत निश्चितपणे एम.एम.आर.डी.ए. ला सूचना दिल्या जातील.

श्री. मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, आयुक्त, एम.एम.आर.डी.ए. यांना मी स्वत: पत्र दिले होते. त्यामध्ये ॲम्बुलन्सचा विषय नमूद केला होता. त्यासंबंधीच्या मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देण्यात आले नाही. आयुक्तांना दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने मी हा प्रश्न विचारला होता. त्या अनुषंगाने मंत्रिमहोदयांनी दिलेल्या उत्तराने माझे समाधान झाले नाही. माझ्या प्रश्नाचा रोख असा होता की, रुग्णवाहिकेमधून पेशंटना घेऊन जात असतांना वहातुकीच्या कोंडीमुळे पेशंट वेळेवर दवाखान्यामध्ये पोहोचू शकत नाही, त्यामुळे जीवितहानी होते. याबाबत आपण कोणती उपाय योजना करणार आहात? या प्रश्नाचे उत्तर आपण दिलेले नाही ते देणार काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, रुग्णवाहिका आणि फायर ब्रिगेडच्या वाहनांबाबत वेगळी व्यवस्था करण्याकरिता वहातूक विभागाच्या अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करुन निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने मी अगोदर सांगितल्याप्रमाणे निश्चितपणे ही अत्यावश्यक सेवा असल्यामुळे ती बाब तपासून घेऊन या वाहनांकरिता वेगळे कॉरीडॉर करावे अशाप्रकारच्या सूचना देण्यात येतील.

----

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/ पूर्वी श्री.सरफरे... 13:05

**चिपळूण नगरपालिकेतील वादग्रस्त घन कचरा प्रकल्प**

**(8) * 25931 श्री.भास्कर जाधव , श्री. गुरुनाथ कुलकर्णी , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. फौजीया खान** : : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) चिपळूण नगरपालिकेतील वादग्रस्त घन कचरा प्रकल्पाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कामातील भ्रष्टाचार व अनियमितता याला आळा घालून सखोल चौकशी होणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक 17 सप्टेंबर, 2006 रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचेकडे मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन संबंधितांवर कारवाई केली आहे काय,

(3) नसल्यास, चौकशी न करणे वा कारवाई न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे,श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (1) होय.

(2) व (3) तक्रारीच्या अनुषंगाने निर्णय घ्यावा असे जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी नगरपरिषदेस कळविले आहे. नगरपरिषदेच्या ठरावानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, शासनाचे नक्की काय धोरण आहे, हे कळत नाही. त्या ठिकाणचे अधिकारी शासनाच्या वरचढ झालेले आहेत, शासनाला त्यांना पाठिशी घालायचे आहे काय ? 9-10 लाख रुपये किंमतीची जमीन 52 लाख रुपयाला घेतली. त्या ठिकाणी रस्त्याचा प्रश्न आहे. तो रस्ता 1.4 कि.मी.चा आहे. म्हणजे दीड कि.मी. देखील तो रस्ता नाही. त्यासाठी 58 लाख रुपयाचे एस्टीमेट केलेले आहे. या संदर्भाने कलेक्टरांकडे तक्रार केली असता, कलेक्टरनी त्या रस्त्याच्या ठिकाणी भेटही दिलेली नाही. त्यांनी नगरपालिकेने भ्रष्टाचार केलेला आहे त्यांच्याकडेच याबाबतची कार्यवाई करण्यासाठी प्रकरण पाठविले. या कामाचा ठेका मिळविण्याकरिता एका कॉन्ट्रॅक्टरने निविदा भरली. कंत्राट पध्दतीमध्ये दोन-दोन लखोटे पाठविले जातात. पहिल्या लखोट्यामध्ये कॉलिफाय नाही, असे लिहिलेले होते आणि नंतरच्या दुसऱ्या लखोटयामध्ये कॉलिफाय आहे, असे सी.ई.ओं.नी लिहिलेले होते. या संबंधाने चौकशी करण्याबाबत तक्रार केलेली असताना, या 58 लाखाच्या कामामध्ये भ्रष्टाचार होऊनही त्याकडे दुर्लक्ष केलेले आहे. शासन म्हणून जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दिलेली होती त्यांनीही, त्याकडे दुर्लक्ष केलेले आहे, म्हणून जिल्हाधिकाऱ्यांवर कारवाई करणार आहात काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/

ता.प्र.क्र.25931....

श्री.राजेश टोपे : या संदर्भाने मी सविस्तर माहिती सांगू इच्छितो. नगरपालिकेला डम्पींग ग्राऊंडसाठी जमीन खरेदी करणे आवयक होते. त्यासाठी 6 एकर जमीन खरेदी करण्यात आली. त्या ठिकाणच्या जमिनीचे मूल्यांकन डायरेक्टर ऑफ टाऊन प्लॅनिंग यांच्याकडून करण्यात आले. जमिनीची निश्चिती जिल्हाधिकाऱ्यांच्या वतीने करण्यात आली. 52 लाख रुपये जमिनीची किंमत निघालेली आहे, ती किंमत शासनाच्या यंत्रणेकडून तपासून घेतलेली आहे.

श्री.भास्कर पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांच्या उत्तरालाच माझी हरकत आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराच्या तासामध्ये हरकत घ्यायची नसते.

श्री.भास्कर पाटील : उत्तर चुकीचे आहे.

**सभापती** : मी आपल्याला प्रश्न विचारावयास परवानगी दिलेली आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, जिल्हाधिकाऱ्यांवर कारवाई करणार आहात काय ? अशाप्रकारची सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे. ही जमीन कशापध्दतीने खरेदी झाली हे मी सांगितले. दीड कि.मी.च्या रस्त्याचे 58 लाख रुपयाचे एस्टीमेट केलेले आहे. जमीन उंचवटयावर आहे, त्यामुळे कटींग रिटेनिंग वॉल करणे या सगळ्या गोष्टींचा त्यामध्ये अंतर्भाव आहे. कोणा अधिकाऱ्यांना पाठिशी घालण्याचा प्रश्न नाही. एस्टीमेट संबंधी काही संशय असेल किंवा टेंडरींग प्रोसिजर नीट झालेले नाही असे म्हणणे असेल, कलेक्टर संबंधी काही संशय असेल तर शासन नगर विकास विभागाचे प्रधान सचिव, श्री.फाटक यांच्या माध्यमातून चौकशी करेल. यामध्ये कोणी दोषी असतील तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

**सभापती** : आता प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

---

यानंतर श्री.बरवड......

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समितीचा सन 2005-06 चा एकोणिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री. रणजित कांबळे ( ग्रामविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यावरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन चौतिसावा अहवाल सन 2004-05 सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : पंचायती राज संस्थांच्या लेख्यावरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली या जिल्हा परिषदांचे सन 2005-06 चे वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : जिल्हा परिषदांचे वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

----

श्री. बाबा सिद्दीकी ( कामगार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सातारा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळाचा ( सातारा ) सन 1991-92, 1992-93 चा पहिला व दुसरा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

---

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नांदेड माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाचा (नांदेड) सन 1994-95, 1995-96, 1996-97, 1997-98, 1998-99 चा तिसरा, चौथा, पाचवा, सहावा व सातवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

----

श्री. बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कापड बाजार आणि दुकाने मंडळाचा (मुंबई) (बृहन्मुंबई, ठाणे व रायगड जिल्ह्यांकरिता) सन 1997-98 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री. बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लातूर जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाचा (लातूर) सन 1991-92, 1992-93, 1993-94, 1994-95, 1995-96, 1996-97, 1997-98, 1998-99, 1999-2000, 2001-02 चा पहिला, दुसरा, तिसरा, चौथा, पाचवा, सहावा, सातवा, आठवा, नववा व दहावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS/

**पृ.शी./मु.शी.**: विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे

श्रीमती उषाताई दराडे ( समिती सदस्य ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा तिसरा अहवाल सभागृहास सादर करते.

**सभापती** : विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS/

**पृ.शी./मु.शी.**: अनुसूचित जाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे

डॉ. वसंत पवार ( समिती सदस्य ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अनुसूचित जाती कल्याण समितीचा चौथा अहवाल सभागृहास सादर करतो.

**सभापती** : अनुसूचित जाती कल्याण समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

----

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याच्या मुद्यासंबंधी

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मी अत्यंत महत्वाच्या विषयावर या सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो...

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी ....

**सभापती** : मी आपल्याला परवानगी दिलेली नाही. आपले बोलणे रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात येईल. औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्याबाबत अशी पध्दत आहे की, एखादा अत्यंत तातडीचा आणि महत्वाचा मुद्दा असला तर आणि त्याबाबत आपण दालनात येऊन मला सांगितले तर औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून तो मुद्दा उपस्थित करण्यास परवानगी देतो.

श्री. जितेंद्र आव्हाड : मी औचित्याचा मुद्दा दिलेला आहे.

**सभापती** : माझ्याकडे जी कागदपत्रे आहेत त्यामध्ये आपला कागद पोहोचलेला नाही. दुसरी बाब अशी की, आज माझ्याकडे जे औचित्याचे मुद्दे आलेले आहेत ते थोडे जास्तच आहेत. उद्यापासून मी असे बंधन घालण्याचे ठरविले आहे की, पहिले जे पाच औचित्याचे मुद्दे येतील तेवढेच स्वीकारणार, त्या व्यतिरिक्त जास्त मुद्दे स्वीकारणार नाही.

सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांनी एक औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्यास परवानगी मागितलेली आहे. मी त्यांना तो मुद्दा उपस्थित करण्यास परवानगी देत आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. काल या सभागृहामध्ये या राज्याच्या माननीय उपमुख्यमंत्र्यांनी एक निवेदन केले. आंध्र प्रदेशमधून काही आमदार आणि त्यांच्या समर्थकांनी महाराष्ट्राच्या सीमेत घुसून बाभळी प्रकल्पाचे ज्या टप्प्याचे काम सुरु आहे ते बंद पाडण्याच्या दृष्टीने सत्याग्रह करण्यासाठी सीमेचे उल्लंघन करुन या राज्यात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. काल या ठिकाणी सांगण्यात आले की, अशा प्रकारे कोणाचाही दबाव सहन केला जाणार नाही.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 13:15

(श्री. पांडुरंग फुंडकर...)

महाराष्ट्र कोणालाही दबणार नाही अशा प्रकारची घोषणा राज्याच्या गृहमंत्र्यांनी केली आहे. आज आम्ही वर्तमानपत्रातील बातम्या वाचल्या. सभापती महोदय, आंध्रप्रदेश राज्याचे मुख्यमंत्री हे कॉंग्रेस पक्षाचे आहेत आणि महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देखील कॉंग्रेस पक्षाचे आहेत. दोन्ही राज्यांचे मुख्यमंत्री माननीय पंतप्रधानांची भेट घेऊ तेथील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सामोपचाराने सुटावा यादृष्टीने प्रयत्न करु शकतात. हा मार्ग सोडून आंध्रप्रदेश राज्यातील दोन-चार हजार माणसे महाराष्ट्रामध्ये घुसवून, महाराष्ट्रामध्ये अतिक्रमण करण्याचा प्रयत्न आंध्रप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी केलेला आहे. इतकेच नाही तर आंध्रप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना "नालायक, बेशरम" अशा प्रकारची शिवीगाळ आणि अशोभनीय वक्तव्य केलेले आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांना एखाद्या राज्याचे मुख्यमंत्री अशा प्रकारे शिवीगाळ करीत असतील तर ते आम्ही कदापि सहन करणार नाही. आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री हे कॉंग्रेस पक्षाचे आहेत आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री हे देखील कॉंग्रेस पक्षाचे आहेत. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना अशा प्रकारे शिवीगाळ करणे हा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचाच नाही तर संपूर्ण महाराष्ट्राचाही अपमान आहे. तेव्हा मी संपूर्ण सभागृहाच्या वतीने "महाराष्ट्राच्या माननीय मुख्यमंत्र्यांना नालायक आणि बेशरम अशा प्रकारे शिवीगाळ करणा-या आंध्रप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांचा हे सदन निषेध करीत आहे" असा ठराव मांडतो. माझी सभागृहाला विनंती आहे की, हा ठराव सभागृहाने संमत करावा. अशा प्रकारे महाराष्ट्राच्या माननीय मुख्यमंत्र्यांचा कोणी अवमान करणार असेल तर त्याचा निषेद या सभागृहाने केला पाहिजे, असा माझा औचित्याचा मुद्दा आहे.

श्री. अशोक चव्हाण (राजशिष्टाचार मंत्री) : सभापती महोदय, बाभळी बंधाऱ्याच्या संदर्भातील चर्चा नुकतीच विधानसभेमध्ये पार पडली. या सदनामध्ये दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या ज्या भावना आहेत तशाच भावना विधानसभेतील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या आहेत. बाभळी बंधाऱ्याचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. या संदर्भातील सुनावणी 25 तारखेच्या आसपास सुप्रीम कोर्टामध्ये होईल. याबाबतीत राज्य शासनाने निर्णय घेत असताना कोणतीही चूक केलेली नाही. मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यामध्ये होत असलेल्या या बंधा-याच्या अनुषंगाने आंध्रप्रदेशच्या वाट्याचे पाणी त्या राज्याला देण्याची भूमिका राज्य शासनाने कायम ठेवलेली आहे. वर्तमानपत्रामध्ये

..2..

प्रसिध्द झालेल्या बातम्यांच्या अनुषंगाने दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या भावना तीव्र झालेल्या आहेत. या संदर्भातील वस्तुस्थिती आणि सत्यासत्यता तपासून घेऊन वस्तुस्थिती खरी असेल तर या संदर्भातील ठराव शासनाच्यावतीने आणला जाईल असे माननीय मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यानुसार आंध्रप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी तसे व्यक्तव्य केले असेल तर त्याबाबतीत निषेधाचा ठराव राज्य शासनाच्या वतीने मांडला जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हे फार गंभीर प्रकरण आहे. मी सुरुवातीलाच सांगितले की, केन्द्रामध्ये कॉंग्रेसचे सरकार आहे, आंध्रप्रदेश आणि महाराष्ट्रामध्येही कॉंग्रेस पक्षाचे मुख्यमंत्री आहेत. हा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न केन्द्रामध्ये जाऊन सामोपचाराने सोडविता आला असता. परंतु याबाबतीत धमक्या देऊन महाराष्ट्राला दाबण्याचा प्रयत्न झालेला आहे. हा जो प्रकार घडला त्यासंदर्भातील बातम्या वृत्तपत्रातून प्रसिध्द झालेल्या आहेत. टी.व्ही.चॅनल्सवरुन देखील बातम्या प्रसारीत होत आहेत. या बाबतीतील सत्यासत्यता पडताळून पाहण्यासाठी आतापर्यन्त फोनवरुन तरी चौकशी व्हायला पाहिजे होती. उद्या पर्यन्त हे प्रकरण कशासाठी लांबणीवर ठेवता ? मी मांडलेला निषेधाचा ठराव मागे घेणार नाही. हा ठराव सभागृहाने संमत करावा अशी मी सभागृहाला विनंती करतो.

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, राज्य शासनाने याबाबतीत बघ्याची भूमिका घेतलेली नाही. आंध्रप्रदेशच्या काही लोकप्रतिनिधींनी त्यांच्या राज्यातील माणसे महाराष्ट्रामध्ये आणण्याचा प्रयत्न केला. त्याठिकाणी पोलीस बंदोबस्त लावण्यात आलेला आहे. त्या ठिकाणी अनुचित प्रकार घडू नये म्हणून जमाव प्रतिबंधात्मक कलम लावण्यात आलेले आहे. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या भावना तीव्र आहेत. वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या बातम्यांची सत्यासत्यता किती आहे याबाबतीत शहानिशा केली पाहिजे. आंध्रप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी केलेले वक्तव्य खरे असेल तर त्याबाबतीत निषेधाची भूमिका घेतली जाईल.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझी माहिती अशी आहे की, आंध्रचे मुख्यमंत्री महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना उद्देशून बोलले नाहीत. महाराष्ट्र नालायक आहे व बेशरम आहे असे वक्तव्य त्यांनी केलेले आहे. हा एकट्या मुख्यमंत्र्यांचा विषय होत नाही. हा तमाम मराठी माणसांचा विषय आहे, तमाम महाराष्ट्राचा अवमान झालेला आहे. मी सभागृहाच्या आणि शासनाच्या असे निदर्शनास आणू इच्छितो की, आंध्रप्रदेशमधून आलेले आंदोलक दगडफेक करीत होते. ते परत जात असताना त्यांना तहान लागली तेव्हा धर्माबाद येथील आमच्या मराठी माऊलींनी आपल्या घरात बोलावून त्यांना पाणी पाजून मग रवाना केले. ही शोषिक भूमिका महाराष्ट्राच्या मराठी माणसाची असेल तर कायद्याचा आदर करण्याचे काम केवळ महाराष्ट्रानेच करावयाचे का? सरकारिया आयोगाच्या अहवालानुसार आंतरराज्य संबंध कसे असावेत या संदर्भातील भूमिका स्पष्ट झाली पाहिजे. आदल्या दिवशी आंध्रप्रदेशचे माजी मुख्यमंत्री श्री.चंद्राबाबू नायडू म्हणतात, की बाभळी धरण आम्ही बॉम्ब टाकून उडवून देऊ. आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री म्हणतात, महाराष्ट्र नालायक आहे, बेशरम आहे. महाराष्ट्राच्या मराठी माणसांनी हातात बांगड्या भरलेल्या नाहीत. शासनाने या संदर्भात स्पष्ट भूमिका घ्यावी. अन्यथा महाराष्ट्राच्या मराठी माणसांना, महाराष्ट्राचे सुपूत्र म्हणून सह्याद्रीच्या कड्यासारखे उभे राहून भूमिका घ्यावी लागेल. अशी भूमिका घेण्यास आम्हाला मजबूर करु नये एवढीच विनंती करतो.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्वाचा प्रश्न याठिकाणी उपस्थित झाला आहे. सन्माननीय उद्योगमंत्री श्री.अशोक चव्हाण म्हणाले की, हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. न्यायप्रविष्ठ असताना आंध्रप्रदेशच्या कोणालाही काहीही बोलता येते? कुणीही यावे, कितीही लाथा घालाव्यात, दगड मारावेत, शिवीगाळ करावी? न्यायप्रविष्ठ बाब फक्त महाराष्ट्राला लागू आहे का? माझा शासनाला प्रश्न आहे की, प्रत्येक ठिकाणी महाराष्ट्राला अतिशय दुर्लक्षित वागणूक दिली जाते हे कितपत योग्य आहे? मंत्रीमहोदयांनी याचे उत्तर द्यावे. काल या प्रश्नासंबंधी सदनामध्ये चर्चा झाली. महाराष्ट्राच्या सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी जे निवेदन केले त्यामध्ये असे सांगितले गेले की, श्री.चंद्राबाबू नायडू, माजी मुख्यमंत्री, आंध्रप्रदेश यांनी वक्तव्य केले की, बाभळी धरणावर बॉम्ब टाकून ते पूर्णपणे उडवून देऊ, त्यांनी शिवीगाळ केली. आज पुन्हा हा विषय याठिकाणी याकरिता उपस्थित करावा लागला. काल स्पष्टपणे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, आम्ही हे सहन करणार नाही. जशास तसे उत्तर देऊ असे स्वाभिमानी उत्तर

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MHM/ KGS/ 13:20

श्री.मधुकर सरपोतदार...................

काल सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सभागृहात दिले. हे उत्तर बाहेर प्रसिध्द झाल्यानंतर आंध्रप्रदेशने प्रतिक्रिया दिली. काल तेथील आंदोलकांनी ज्या पध्दतीने गोंधळ घातला, सत्याग्रहाच्या नावाखाली दगडफेक केली, महाराष्ट्राला उद्देशून शिवीगाळ केली. तेथील मुख्यमंत्री महाराष्ट्राला शिवीगाळ करतात, सत्याग्रही महाराष्ट्राला शिवीगाळ करतात आणि महाराष्ट्राच्या जनतेला हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे म्हणून तटस्थपणे बघत रहावे लागेल का? हा मी शासनाला प्रश्न विचारु इच्छितो. प्रश्न एकच आहे, शेजारच्या राज्यांशी आपले संबंध बिघडावेत असे आमचे मत नाही. सगळ्या संघराज्यांशी संबंध चांगले असले पाहिजेत. हा देश सर्वांचाच आहे. याचा अर्थ असा नाही, बेळगावचा प्रश्न उपस्थित झाला की तो प्रश्न न्यायप्रविष्ठ आहे म्हणून सांगण्यात येते. कर्नाटक सरकार वाटेल तो अन्याय मराठी माणसांवर करीत आहे. आंध्रप्रदेशचा प्रश्न आला, मराठी माणसांवर अन्याय केला जातो. सगळ्या ठिकाणी महाराष्ट्रावर अन्याय केला जातो. तरी देखील महाराष्ट्र सरकार षंढासारखे राहू शकते का? महाराष्ट्र सरकारने मर्दासारखे वागले पाहिजे. हा महाराष्ट्र छत्रपती शिवरायांचा आहे. त्यांनी महाराष्ट्राला मर्दानगी शिकविली आहे. त्या शिवरायांचे तुम्ही वारसदार आहात. उद्या चर्चा करु, माहिती घेऊ, काय बोलले त्याचा निश्चित शोध घेऊ, खरोखरच बोलले का ते तपासून घेऊ असा युक्तिवाद करु नये. काल विषय मांडल्यापासून 24 तास उलटले, 24 तासात माहिती मिळवून मुख्यमंत्र्यांनी स्वत: पुढाकार घेऊन सभागृहात विषय मांडून एव्हाना निवेदन करणे आवश्यक होते. तेथील मुख्यमंत्र्यांनी काल संपूर्ण महाराष्ट्राला उद्देशून शिवीगाळ केली. ही शिवीगाळ प्रत्येक मराठी माणसाला आणि महाराष्ट्रातील प्रत्येक भाषिकाला लागू होते. या पार्श्वभूमीवर हा विषय मांडून निषेधाचा जो प्रस्ताव सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी मांडला त्या प्रस्तावाला मी पाठिंबा देतो आणि हा प्रस्ताव आजच या सदनामध्ये मंजूर व्हावा अशी विनंती करतो. आंध्रप्रदेश शासनाचा निषेध करण्याचे काम या महाराष्ट्राच्या दोन्ही सदनांना करावे लागेल. शेवटी महाराष्ट्राच्या विधानसभा व विधानपरिषद या दोन्ही सदनांकडे महाराष्ट्राची जनता लक्ष ठेवून आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

अशुद्धित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ...

सभापती महोदय, आमच्यावर जर अशा प्रकारचा प्रहार झाला तर आम्ही तो कदापिही सहन करणार नाही तर आम्ही सुध्दा प्रती प्रहार केल्याशिवाय राहणार नाही एवढेच मला या प्रस्तावाच्या संदर्भात विचार मांडावयाचे आहेत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी अतिशय महत्वाचा प्रस्ताव मांडलेला आहे. एखाद्या मुख्यमंत्र्यांना किंवा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना बेशरम, नालायक म्हणणे बरोबर नाही. यासंदर्भातील बातमीचा ऑल इंडिया इंग्लिश न्यूज पेपर मधून मी शहानिशा केलेली आहे. आपल्या माननीय मुख्यमंत्र्यांच्या संदर्भात आंध्रप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी जे वक्तव्य केलेले आहे ते सत्य आहे. नांदेड जिल्हयातील बाभळी प्रकल्पात केवळ 2 टी.एम.सी. पाणी साचणार असून या धरणामुळे त्यांच्या 250 टी.एम.सी. धरणावर परिणाम होऊन आंध्रप्रदेशचा वाळवंट होईल असे ते सांगतात. आंध्रप्रदेशचे ज्येष्ठ नेते श्री. चंद्राबाबू नायडू यांनी तर म्हटले आहे की, बाभळी प्रकल्पावर बॉंब टाकून ते उडवून देण्यात येईल. तसेच आंध्रप्रदेशच्या मुख्यमंत्री श्री. राज शेखर रेड्डी यांनी आपल्या मुख्यमंत्र्यांना नालायक आणि बेशरम म्हटलेले आहे. आंध्रप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी आपल्या मुख्यमंत्र्यांच्या संदर्भात अशा प्रकारचे शब्द वापरणे शोभा देणारे नाही. कोणत्याही मुख्यमंत्र्यांचा अशा प्रकारे निषेध करणे ही आपली प्रथा आणि परंपरा नाही. खरे म्हणजे जे सामर्थ्यशाली लोक असतात तेच शांतता प्रस्थापित करीत असतात, दुर्बल लोक शांतता प्रस्थापित करुच शकत नाही. आंध्रप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचा तसेच महाराष्ट्राच्या जनतेचा अपमान केलेला आहे. त्यांना तेलांगणाच्या संदर्भात राजकारण करावयाचे आहे परंतु त्यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचे किंवा महाराष्ट्राचे अशा प्रकारे नाव घेऊन राजकारण करु नये. यामध्ये तीन गोष्टी येतात त्या तीन गोष्टी तातडीने करण्याची आवश्यकता आहे. या संदर्भात आपल्या राज्यशासनाने केंद्राकडे त्वरीत रिपोर्ट पाठवावा तसेच राज्या राज्यामध्ये डिस्प्यूट झाला तर आपण सुप्रिम कोर्टात अपिल करु शकतो त्यामुळे यासंदर्भात आपण सुप्रिम कोर्टात अपिल केले पाहिजे. तसेच तिसरा मुद्दा असा आहे की, केंद्रीय गृहमंत्र्यांकडे हा विषय जातो, केंद्रीय गृहमंत्री श्री. शिवराज पाटील हे महाराष्ट्राचेच असल्याने त्यांनी यासंदर्भात त्वरित लक्ष घालून दिल्लीमध्ये एक बैठक घ्यावी व महाराष्ट्राला न्याय मिळवून

.....2

श्री. नितीन गडकरी......

द्यावा. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या संदर्भात तसेच महाराष्ट्रातील जनतेच्या संदर्भातील आंध्रप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी जे अपशब्द वापरलेले आहेत त्यामुळे आंध्रप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी ताबडतोब महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचे तसेच महाराष्ट्राच्या जनतेची माफी मागावी आणि आपले शब्द मागे घ्यावे. या ठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे तो सभागृहाने एकमताने मंजूर केला तर संपूर्ण देशात आणि संपूर्ण महाराष्ट्रात एक चांगल्या प्रकारचा मेसेज जाईल. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना आणि महाराष्ट्रातील जनतेला आंध्रप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी जे अपशब्द वापरले आहे ते शब्द महाराष्ट्रातील जनता कदापिही सहन करणार नाही. त्यामुळे हा प्रस्ताव एक मताने पास केल्याशिवाय हा प्रश्न सुटू शकणार नाही. मोठया पदावर असणा-या व्यक्तींनी वैयक्तिक स्वार्थासाठी किंवा राजकारणासाठी अशा प्रकारचे शब्द वापरणे कधीही योग्य नाही त्यामुळे यासंदर्भात निषेध करणे आवश्यक आहे. चंद्राबाबू नायडू यांनी बाभळी धरणावर बॉंब टाकून ते उडवून देण्यात येईल अशी भाषा वापरलेली आहे ती योग्य नाही. कारण श्री. चंद्राबाबू नायडू हे तेलगू देसम पक्षाचे प्रमुख आहेत. त्यामुळे यासंदर्भात तीव्र नापसंती व्यक्त करुन या संदर्भातील प्रस्ताव एक मताने मंजूर केला पाहिजे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी जे शब्द वापरले ते शब्द मी या ठिकाणी वापरणार नाही. सभापती महोदय, आम्ही आक्रमक नाही, आम्ही कोणावर टीका करीत नाही परंतु आमच्या अंगावर कोणी आले तर आम्ही त्याला शिंगावर घेण्यास मागे पुढे पाहणार नाही कारण ही शिवछत्रपतींची पुण्य भूमी आहे, कर्म भूमी आहे त्यामुळे यासंदर्भात आंध्रप्रदेशला कडक इशारा दिला पाहिजे. या ठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे तो एकमताने पास करावा अशी मी सभागृहाला विनंती करतो.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांबद्दल किंवा महाराष्ट्राबद्दल जे विशिष्ट उद्गार काढलेले आहेत ते अत्यंत आक्षेपार्ह आहेत. त्याचा निषेध करणे ही महत्वाची बाब आहेच, पण त्याच बरोबर हाय कॉन्स्टीटयुशनल ऑथॉरिटीने एकमेकांशी कसे वागावे याचे तपशीलवार नियम घटनेने ठरवून दिलेले आहेत. त्यासंबंधी एक स्वतंत्र प्रकरण घटनेमध्ये आहे. त्या नियमाला अत्यंत अशोभनीय असे वर्तन झालेले आहे. आंतर राज्य प्रश्न सोडविण्यासाठी काही मार्ग उपलब्ध आहेत. घटनेने इंटर स्टेट रिलेशनशीप घालून दिलेली आहे त्याचा उघड उघड भंग झ ाालेला आहे. तेव्हा महाराष्ट्र सरकारने या गोष्टीचा निषेघ नोंदविला पाहिजे आणि ही महाराष्ट्रातील जनतेची इच्छा आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, हा अतिशय गंभीर प्रश्न आहे. सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.अशोक चव्हाण यांनी सांगितले की, ही बाब तपासून घेण्यात येईल. मी त्यांना सांगू इच्छितो की, नांदेड जिल्ह्यातील बाभळी बंधारा बांधल्यास ते बॉम्बने उडवून देण्यात येईल अशाप्रकारचे वक्तव्य श्री.चंद्राबाबू नायडू यांनी केले. या घटनेमुळे मराठी माणसांची मने दुखावली गेली आहेत. एकीकडे बेळगाव भागातील मराठी जनतेवर अन्याय होत आहे, तर दुसरीकडे आपल्याच राज्यातील नांदेड भागातील किंबहुना संपूर्ण महाराष्ट्रातील मराठी माणसांची मने दुखावली जात असताना आपण फक्त बध्याची भूमिका घेत आहोत. आपण सुध्दा हातामध्ये बांगड्या भरलेल्या नाहीत. तेव्हा चौवीस तासाच्या आत, कोणताशी उशीर न करता या प्रश्नाचे गांभीर्य ओळखून ताबडतोब येथे शासनाने भूमिका स्पष्ट करावी. या महाराष्ट्राचा भूमीपुत्र म्हणून मी ही मागणी करीत आहे.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी या संदर्भात अतिशय सामंजस्याची भूमिका मांडलेली आहे. दोन राज्यांमध्ये वाद निर्माण झालेला आहे. बाभळी प्रकरणात माननीय मुख्यमंत्री मार्ग काढण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यासाठी माननीय मुख्यमंत्री दिनांक 18 रोजी माननीय पंतप्रधानांची भेट घेणार आहेत. त्यावेळी दोन्ही मुख्यमंत्र्यांची चर्चा होण्याची शक्यता आहे. प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे म्हणजे त्यांनी काहीही बोलावे अशी शासनाची भूमिका नाही. फक्त प्रश्न एवढाच आहे की, ही बातमी फक्त एकाच वर्तमानपत्रात

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

11-04-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) S-2

AJIT/ MHM/ KGS/ 13:30

श्री.अशोक चव्हाण.......

आलेली आहे. तेव्हा ते व्हर्शन कितपत अधिकृत आहे किंवा कसे याची तपासणी करण्यात येणार आहे. या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी विधानसभा सभागृहात शासनाची भूमिका स्पष्ट केलेली आहे. आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांबद्दल काढलेले उद्‌गार खरे असतील तर त्याबाबत शासनाच्या वतीने निषेधाचा ठराव मांडला जाईल... माझी आपणास विनंती आहे की,....

( अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, "तोंड भाजले की, ताक सुध्दा फुंकून पितात " अशी मराठीत म्हण आहे. परंतु ते आपणास समजले पाहिजे. आंध्र प्रदेश आणि कर्नाटक या दोन्ही राज्यांची महाराष्ट्राच्या विरोधातील भूमिका सततची आक्रमक दिसत आहे. नक्षलाईज मूव्हमेंटचा उपयोग करुन आक्रमण करु, बॉम्बस्फोटाने धरण उडवून देऊ अशाप्रकारची वक्तव्ये करण्यात आलेली आहेत. राजकारणाकरिता श्री.चंद्राबाबू नायडू आणि श्री.राजशेखर रेड्डी एक होऊन उभे राहिले आहेत. सन्माननीय मंत्रिमहोदय सांगत आहेत की, आम्ही बातमीचा शहानिशा करु. आपण पाणी मिळाल्याचे कौतुक करु शकतो, परंतु त्यांच्या आक्रमणाचे समर्थन कसे काय करु शकतो आंध्र प्रदेशाकडून ताबडतोब प्रतिक्रिया व्यक्त होत असताना आपण फक्त बातमीची शहानिशा करीत आहोत.

यानंतर श्री.पुरी...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

अमुक करु, तमुक करु असे जर होणार असेल तर जो फटका आपल्याला बेळगांव व कारवारच्याबाबतीत बसला आहे, तो यासंदर्भातही बसल्याशिवाय राहणार नाही. कृष्णा खोऱ्याच्या बाबतीत अजूनही वाद भडकतच आहे. त्यामुळे आज याठिकाणी शासनाने माघार घेतली तर त्याचे परिणाम फार गंभीर होतील. त्यामुळे आजच आपण प्रस्ताव घ्यावा. उद्या घेतला तर तिथे राहणा-या मराठी माणसांना जे परिणाम भोगावे लागतील व कोणती परिस्थिती निर्माण होईल, हे आपण सांगू शकणार नाही. याबाबतीत जर प्रतिक्रया उमटल्या तर आपण याठिकाणी कोणत्या भाषेमध्ये बोलणार आहात ? याचे परिणाम म्हणून आंध्रप्रदेशमधील मराठी माणसाच्या संदर्भात कोणताही आततायीपणा घडला तर येथील आंध्रप्रदेशच्या लोकांना दूर करावे लागेल की काय ? अशाप्रकारची प्रतिक्रया याठिकाणीही उमटल्याशिवाय राहणार नाही. अशाप्रकारची यादवी याठिकाणी निर्माण होईल. म्हणून तातडीने याबाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांतर्फे प्रतिक्रिया याठिकाणी व्यक्त झाली पाहिजे. याठिकाणी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो प्रस्ताव मांडला आहे, तो तातडीने मंजूर करावा, अशी माझी विनंती आहे व विधीमंडळामध्ये राग व्यक्त केल्याची भूमिका बाहेर जाऊ द्यावी. याठिकाणी पुरुषार्थाचा परिचय आपण त्यांना करुन दिला पाहिजे. त्यानंतर त्यांची उलट प्रतिक्रया ही येणारच आहे. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, आपण हा प्रस्ताव एकमताने मान्य करावा व संसदीय माध्यमातून तरी याबाबतची प्रतिक्रिया दृश्य स्वरुपात दिसली पाहिजे. त्यामुळे याठिकाणी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो प्रस्ताव मांडला आहे तो मंजूर करावा, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य, डॉ.वसंत पवार यांनी आपले म्हणणे मांडावे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, श्री.चंद्राबाबू नायडू यांनी सांगितले की, आम्ही बॉम्ब टाकून धरण उडवू व दुसरीकडे श्री.रेड्डीही सांगत आहेत की, महाराष्ट्र शासन नालायक आणि बेशरम आहे. या दोघांच्या स्पर्धेमध्ये मराठी माणूस बदनाम होत आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, मी सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार यांना बोलण्यासाठी संधी दिलेली आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार यांनी बोलावे.

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याबद्दल शेजारी राज्यातील प्रमुख नेत्यांनी जी काही वक्तव्ये केलेली आहेत ती महाराष्ट्राची अस्मिता आणि महाराष्ट्राचा स्वाभिमान दुखवाणारी आहेत. पूर्वीसुध्दा अलमट्टी धरणाच्या बाबतीत कर्नाटक राज्याने जी भूमिका घेतली होती, त्यावेळीही आपल्याला कठोर निर्णय घेता आलेला नाही. आज आंध्रप्रदेशच्या माजी मुख्यमंत्र्यानी आणि आजी मुख्यमंत्र्यांनी जी स्टेटमेंटस् केलेली आहेत, ती निश्चितपणे निषेधार्ह आहेत. तसेच, याबाबतीत त्यांनी ताबडतोबीने ॲक्शन घेऊन 25 आमदार पाठवून निदर्शने व महाराष्ट्रास शिवीगाळ करातात, हे महाराष्ट्राला शोभणारे नाही. त्यामुळे माझी माननीय सभापती महोदयांना नम्र विनंती आहे की, आपणच महाराष्ट्र शासनास निर्देश द्यावेत व तातडीने आजच्या आज महाराष्ट्र शासनाचे एक शिष्ट मंडळ माननीय पंतप्रधानांच्या भेटीसाठी पाठविण्यात यावे. व याबाबतीत माननीय पंतप्रधानांनी हस्तक्षेप करुन हे ताबडतोब थांबवावे. आपले हे वरिष्ठ सभागृह असून ठोशास ठोस देण्याचे विचार मांडणे, बरोबर होणार नाही. आपल्याला त्याठिकाणी निषेध करण्यासाठी जाणे गरजेचे आहे व माननीय पंतप्रधानांना जाऊन सांगणे गरजेचे असून महाराष्ट्राची अस्मिता टिकविणे गरजेचे आहे.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जोरात घोषणा देतात. )

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, अधिवेशन सुरु असताना अशाप्रकारचे विचार मांडणे म्हणजे मुर्दाडपणाचे......

( विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य जोरात घोषणा देतात. )

नंतर कु.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात )

**सभापती** : महाराष्ट्राची अस्मिता आणि महाराष्ट्राचा स्वाभिमान ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणी आपण या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्य एक विचाराचे आहोत. सातत्याने या दृष्टीने,या आणि या पुढच्या काळातही महाराष्ट्राची अस्मिता टिकविणे हे आपले महत्वाचे काम आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी औचित्याच्या मुद्दयाच्या माध्यमातून हा विषय येथे मांडला, तो अत्यंत महत्वाचा आहे. सत्तारुढ पक्षाच्या सन्माननीय सदस्यांची देखील तीच भावना आहे. मी असे म्हणेन की, ज्या ज्या वेळी अशा पद्धतीने दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदंस्यांच्या एखादया विषयाबाबत एकच भावना असतात त्या वेळी दोन्ही बाजूकडून असा प्रस्ताव आपण घेतो. म्हणून मी असे म्हणेन की, सभागृहाचे कामकाज आपण 15 मिनिटांकरिता तहकूब करु व त्यानंतर या बाबतीतील ठराव या ठिकाणी मांडण्यास आपण अनुमती देऊ.

(सभागृहाची बैठक 1 वाजून 41 मिनिटांनी 15 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी केलेल्या वक्तव्याबाबत जो निषेधाचा ठराव विरोधी पक्षाने मांडला आहे, तो चर्चेला आला पाहिजे, अशी आमची आग्रही भूमिका आहे. हा ठराव आम्ही कुठल्याही परिस्थितीत मागे घेणार नाही. उद्यापर्यन्त कन्फर्म करुन सांगू, माहिती घेऊन सांगू, असे चालणार नाही. शासनाची नेहमी अशी जाहिरात प्रसिद्ध होत असते की, आमचे शासन गतिशील आहे. हे काय गतिशीलपणाचे लक्षण आहे का ? आंध्र प्रदेश राज्याकडून माहिती घेण्यास किती वेळ लागणार होता ? हा काही साधा ठराव आम्ही आणलेला नाही तर महाराष्ट्राचा अवमान झाल्यामुळे हा ठराव आणलेला आहे. त्यामुळे शासनाने ताबडतोब माहिती घेऊन ती आजच सभागृहाला दिली पाहिजे.

श्री.अशोक चव्हाण (उद्योग व राजशिष्टाचार मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी ज्या भावना सभागृहात व्यक्त केल्या, त्याबरोबरच सभागृहातील सर्वच सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या तशीच शासनाची भूमिका आहे. ऑथेंटिक व्हर्जन प्राप्त करुन घेऊन दोन तासाच्या आत सभागृहाला माहिती दिली जाईल.

**उपसभापती** : शासनातर्फे आजच निवेदन करण्यात येणार आहे त्यामुळे आता हा मुद्दा संपलेला आहे. आता आपण पुढच्या कामकाजाकडे वळू या.

---------------

..2...........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याचे मुद्दे**

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील औचित्याचा मुद्दा मांडू इच्छितो :-

सभापती महोदय, अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्रांना (आय.टी.आय.) अनुदान मिळणेसाठी शासन दरबारी गेली 15 वर्षे मागणी करण्यात येणे, त्याकरिता आंदोलने, उपोषणे करुनही शासनाकडून कोणतीच अंमलबजावणी न होणे, दिनांक 31 जानेवारी 1996 रोजी अनुदान कोणत्या पद्धतीने देण्यात यावे, या संदर्भात माननीय संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-1 यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीने शासनाकडे अहवाल सादर करण्यात येऊनही अनुदान देण्यात होत असलेली टाळाटाळ, दिरंगाई, गेल्या 24 वर्षांपासून अनुदानाचा प्रश्न न सुटल्यामुळे अशासकीय आय.टी.आय. कर्मचा-यात पसरलेला तीव्र असंतोष, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना.

----------

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य, श्री.विनोद तावडे यांचा औचित्याचा मुद्दा माझ्याकडे प्राप्त झालेला नाही. तथापि, त्यांनी विनंती केल्यानुसार विशेष बाब म्हणून मी त्यांना औचित्याचा मुद्दा मांडण्याबाबत परवानगी देत आहे, त्यांनी तो मांडावा.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपला अत्यंत आभारी आहे की, आपण मला औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी दिली.

सभापती महोदय, सन्माननीय शिक्षण मंत्री, प्रा.वसंत पुरके हे देखील आता सभागृहात उपस्थित असल्यामुळे हा मुद्दा आत्ताच मांडला तर अधिक औचित्याचे ठरेल.

सभापती महोदय, काही दिवसांपूर्वी विधानसभेत सी.बी.एस.सी. अभ्यासक्रमांतील एका पुस्तकातील एका प्रकरणासंबंधी औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. लैंगिक शिक्षणासंबंधी सभागृहात मोठया प्रमाणावर विरोध झाला व संबंधित मंत्री महोदयांनी निर्णय घोषित केला. सभागृहाबाहेर असे वातावरण झाले आहे की, विधिमंडळामध्ये चर्चा होऊन लैंगिक शिक्षणावर

..3.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...........

बंदी आणण्यात आली. तसेच लोकप्रतिनिधींना काही कळत नाही, ते जुनाट विचारांचे आहेत, अशा प्रकारची चर्चा मिडियामध्ये, लोकांमध्ये सुरु झाली असून त्यामुळे लोकांमध्ये गैरसमज निर्माण झाला आहे.

यानंतर कुमारी जयश्री.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे......

आज ज्या पध्दतीने चॅनल्स वाढलेली आहेत, घराघरांमध्ये टी.व्ही.पोहोचलेले आहेत, ते पहाता या माध्यमातून हे विषय लोकापर्यंत जात आहेत. एखादे वेळेस लैंगिक शिक्षण हे नाव चुकीचे वाटत असेल तर या शिक्षणाला " किशोरवयीन आरोग्य शिक्षण " हे नाव घेऊन ग्रामीण व नागरी स्तरांवर तज्ज्ञांची मते घेऊन असे शिक्षण शाळांमधूनदेण्याचा शासनाने विचार केला तर बरे होईल. या विषयाबाबतची दुरदर्शनवरील महाचर्चा मी 10 ते 15 मिनिटे ऐकली होती, त्यावरुन मला असे आढळून आले की, आपल्या आमदारांना काहीच कळत नाही. असा समज सर्व ठिकाणी निर्माण झाला आहे. राज्यातील लाखो विद्यार्थ्यांना हे शिक्षण द्यावयाचे झाले तर हजारो शिक्षक प्रशिक्षित करावे लागतील. एखाद्या ठिकाणी पुरुष शिक्षक तर एखाद्या ठिकाणी महिला शिक्षक हा विषय ठराविक वयोगटातील विद्यार्थ्यांना शिकवतील परंतु महिला शिक्षिका हे शिक्षण द्यावयाला तयार होतील का ? हा ही एक प्रश्न निर्माण होतो. अशा प्रकारे आपल्या समाजातील सांस्कृतिक आणि सामाजिक मूल्ये लक्षात घेऊन असे जे अनेक मुद्दे समोर येतील त्या मुद्दयांच्या आधारे व तज्ज्ञांची मते यांचा सारासार विचार करुन याबाबत शासन आवश्यक तो निर्णय शासन घेईल का ? माझी शिक्षण मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, शासनाने ओपन माईंडेड राहून तज्ज्ञांची मते घेऊन " Adolscence health education "या नावाखाली लैंगिक शिक्षण हा विषय विद्यार्थ्यांना शिकवावा तसे शिक्षण शिकविण्यास सुरुवात करणार का ?

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी या ठिकाणी जो मुद्दा मांडला त्याचे मी समर्थन करीत आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि मी स्वत: यासंबंधी या सभागृहात यापूर्वी चर्चा केली होती की, सी.बी.एस.ई.मध्ये या विषयाच्या सिलॅबसमधील जो अभ्यासक्रम आहे, त्यातील तपशिलाबद्दल आमचे मतभेद होते आणि मुख्यत: त्याच्यामध्ये जी सांस्कृतिक आणि नैतिक मूल्ये दिलेली होती, त्याबद्दल आमचे मतभेद होते. यामुळे लैंगिक शिक्षणाला आमचा पूर्णपणे विरोध व नकार आहे आणि अशीच आमची भूमिका आहे असे नाही. दुर्देवाने विधानसभेमधील जी चर्चा वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाली त्यावरुन महाराष्ट्रातील सर्व आमदारांना काहीच कळत नाही, असा मतप्रवाह निर्माण झाला होता. मलाही एका वाहिनीवर बोलावून याबाबत अनेक प्रश्न विचारण्यात आले होते. लैंगिक शिक्षण या विषयातील अभ्यासक्रमामधील तपशिलाबद्दल आमचे मतभेद असल्यामुळे लैंगिक शिक्षणाला असलेला





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे......

आमचा विरोध सर्वांसमोर आला. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी आपल्या समाजातील सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थिती लक्षात घेऊन या विषयाची आखणी करण्याबाबतचा जो मुद्दा मांडला त्या मुद्दयाला माझे समर्थन आहे. आमच्या माहितीप्रमाणे शहरी आणि आदिवासी भागांतील अनेक वैशिष्टये डोळयासमोर ठेवून सन्माननीय शिक्षण मंत्र्यांनी अनेक तज्ज्ञांना असे सांगितले की, विरोधी पक्षाचा या शिक्षणाला विरोध आहे परंतु आमचा विरोध हा तपशिलाला आहे आणि म्हणून अभ्यासक्रम निश्चित करतांना सर्व वैशिष्टये लक्षात घेऊन आखणी व्हावी असे सांगून या मुद्दयाचे समर्थन करते.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी देखील या सभागृहामध्ये औचित्याच्या मुद्दयाखाली सदर विषय उपस्थित केला होता. मुळात हा जो अभ्यासक्रम आहे किंवा हे जे सिलॅबस आहे, त्या सिलॅबसमध्ये ज्या पध्दतीने या अभ्यासक्रमाचे वर्णन केलेले आहे, त्याला आमचा विरोध होता. अन्यथा लैंगिक शिक्षणाला आमचा विरोध नाही. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी सांगितल्याप्रमाणे किशोरवयीन मुलांना या शिक्षणाचे प्रशिक्षण कसे दिले जाणार आहे ? समजा एखाद्या वर्गामध्ये 25 विद्यार्थी आणि 25 विद्यार्थिनी आहेत तर त्यांना लैंगिक शिक्षण कोण देणार, पुरुष शिक्षक की, महिला शिक्षक देणार ? सी.बी.एस.ई.बोर्डातील लैंगिक शिक्षणातील तपशिलाला आमचा विरोध होता, लैंगिक शिक्षण या संकल्पनेला आमचा विरोध नव्हता. इयत्ता 10 वी पासूनच सर्व विद्यार्थ्यांना हे शिक्षण दिले गेले पाहिजे कारण इयत्ता पाचवी किंवा सहावीपासून सर्व विद्यार्थ्यांना लैंगिक शिक्षण दिले गेल्यास त्याचे परिणाम विपरीत होतील कारण सी.बी.एस.ई.बोर्डातील या विषयाच्या पुस्तकात जे चित्र दाखविलेले आहेत त्या चित्रांचा इयत्ता पाचवी ते सहावीच्या विद्यार्थ्यांच्या मनावर वाईट परिणाम होईल. या पुस्तकामध्ये या शिक्षणाबाबत असे म्हटले आहे की, " पुरुष व स्त्री यांनी एकमेकांना स्पर्श करुन किंवा गुप्त अवयवांना स्पर्श करुन तुमच्या मनामध्ये कोणत्या भावना निर्माण होतात अगर होत नाहीत " या पध्दतीने जर हे सिलॅबस असेल तर ते योग्य नाही, अशी आमची भूमिका आम्ही या ठिकाणी मांडली होती. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी सांगितल्याप्रमाणे या लैंगिक शिक्षणाचा अभ्यासक्रम आपल्या सामाजिक परिस्थितीचा व सांस्कृतिक मूल्यांचा विचार करुन ठरविला गेला पाहिजे हा अभ्यासक्रम या वयोगटातील मुलांना कशा पध्दतीने शिकविला पाहिजे याचे ट्रेनिंग शिक्षकांना दिले जाणार आहे का ? या सर्व बाबींचा खुलासा होणे आवश्यक आहे. यानंतर श्री.बोरले..

अशुध्दीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर .......

एक्सपर्ट लोकांची समिती नेमून, विचारविनिमय करुन यासंदर्भात निर्णय घ्यावयास पाहिजे. या विषयासंबंधी सामाजिक आणि नैतिक बंधने असल्यामुळे याबाबतची माहिती समाजापर्यंत गेली पाहिजे आणि नंतर यासंदर्भातील निर्णय घेतला पाहिजे.

**उपसभापती** : मी फक्त तीनच सन्माननीय सदस्यांना बोलण्याची परवानगी देणार आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, लैंगिक शिक्षणाच्याबाबतीत जो मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे त्याला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे. अनेक शिक्षकांनी आणि प्राचार्यांनी या विषयासंदर्भात माझ्याकडे पत्रे दिली होती, ती मी माननीय शिक्षणमंत्री प्रा.वसंत पुरके यांच्याकडे दिली होती. हा विषय अतिशय गंभीर आहे. सन 1974 पासून जर्मनीमध्ये, सन 1980 पासून फ्रान्समध्ये जागतिक पातळीवर सगळीकडे हा विषय शिकविला जात आहे. टी.व्ही.च्या माध्यमातून हा विषय लोकांसमोर येत आहे. त्यामुळे हा विषय विद्यार्थ्यांना हेल्थ आणि हायजिन या दृष्टीकोनातून शिकविणे आवश्यक आहे. आरोग्याच्या दृष्टीने देखील या विषयाकडे पहावयास पाहिजे. सभापती महोदय, भुगोलाच्या शिक्षकाने इतिहास शिकविणे किंवा बायोलॉजिच्या शिक्षकाने मॅथ्स् शिकविणे, ही पद्धत नाही. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यासंदर्भात चांगले मार्गदर्शन करु शकतात. कौन्सिलर या विषयासंदर्भात विद्यार्थ्यांना चांगले मार्गदर्शन करु शकतील, म्हणून त्यांनी हा विषय शिकवावा, अशी माझी सूचना आहे. त्या सूचनेला शासनाने अनुमती द्यावी, अशी माझी विनंती आहे.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, पुणे विद्यापीठ क्षेत्रामध्ये लैंगिक शिक्षणाच्याबाबतीत स्टुडंट हेल्थ स्कीम राबविली जाते. स्टुडंट हेल्थ स्कीमच्या माध्यमातून प्रत्येक कॉलेजमध्ये मुले आणि मुलींना लैंगिक शिक्षणाचे वेगवेगळया प्रकारचे लेक्चर दिले जातात. संसर्गजन्य रोग होऊ नयेत किंवा आरोग्याच्या दृष्टीने जी काळजी घ्यावयाची असते ती विद्यार्थ्यांना समजावून सांगणे गरजेचे आहे. विधानपरिषद हे वरिष्ठ सभागृह आहे. या सभागृहामध्ये जास्त विचारपूर्वक निर्णय घेणे गरजेचे आहे, असे मला वाटते. माननीय मंत्री महोदयांनी देखील लैंगिक शिक्षण बंद करण्याचा आदेश दिलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भात जे मुद्दे मांडलेले आहेत ते जास्त

..2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार ........

प्रकर्षाने मांडलेले आहेत. आमचा लैंगिक शिक्षणाला विरोध नाही. 8 वी पासूनच्या विद्यार्थ्यांना शाळेमध्ये लैंगिक शिक्षण देणे महत्वाचे आहे. या विषयावर रोज एक तास लेक्चर दिले पाहिजे, असे नाही. महिन्यातून एक किंवा दोन वेळा लेक्चर दिले तरी चालेल. इमर्जन्सीसाठी प्रत्येक शाळेला एक डॉक्टर नेमून दिलेला असतो. त्या डॉक्टरला या विषयावर लेक्चर देण्यास सांगावे, जेणे करुन यासंदर्भातील प्रश्न सुटेल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, लैंगिक शिक्षण आणि लैंगिक शिक्षणाचे प्रबोधन टी.व्ही. चॅनलच्या माध्यमातून लोकांसमोर येत आहेत. शास्त्रशुद्ध आणि सेक्स बाजूला ठेऊन लैंगिक शिक्षण दिले तर चांगले प्रबोधन होऊ शकेल. विधानपरिषद हे वरिष्ठांचे सभागृह आहे. माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी उपस्थित केलेल्या या विषयावर सभागृहामध्ये चर्चा होऊ शकली नाही.

(यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

या विषयामध्ये कोणत्या प्रकारचा अभ्यासक्रम असावा ? याची आपल्या परवानगीने सभागृहात विस्तृत चर्चा होणे आवश्यक आहे. केवळ एक मिनिटामध्ये ही चर्चा होऊ शकत नाही. आपण जर परवानगी दिली तर या विषयावर सांगोपांग चर्चा होऊ शकते म्हणून कृपया आपण नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चेस परवानगी द्यावी.

प्रा.वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे, लैंगिक शिक्षण देणे काळाची गरज आहे. हा विषय सभागृहात चर्चेला येणार आहे हे मला अपेक्षित होते. अनेक मान्यवर सदस्यांनी सुक्ष्म अभ्यास करुन हा विषय मांडला आहे. मला असे सांगावयाचे आहे की, लैंगिक शिक्षणासंबंधीची आढळून आलेली पुस्तके ही प्रशिक्षण देणाऱ्या शिक्षकांसाठी आणलेली होती. पण शिक्षकांनी व्यवस्थित काळजी न घेतल्यामुळे ही पुस्तके बाहेर आलेली आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्यांच्या भावना भडकल्या आहेत. या विषयावर खालच्या सभागृहात कोणी ऐकायला देखील तयार नव्हते. लैंगिक शिक्षणाची सदरील पुस्तके सी.बी.एस.ई. च्या अभ्यासक्रमातील आहेत. महाराष्ट्रातील इतर शाळेतील विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात याचा अंतर्भाव करावयाचा की नाही याचा विचार चालू होता. परंतु या गोष्टीचा विचार न करताच सन्माननीय सदस्यांच्या भावना भडकल्या आहेत.

सभापती महोदय, माझी विनंती आहे की, या विषयावर नागपूर, पुणे, मुंबई अशा मोठया शहराच्या ठिकाणी चर्चासत्र होणे गरजेचे आहे. या चर्चासत्रामध्ये डॉक्टर्स, सामाजिक संस्था, शिक्षकांचे प्रतिनिधी, पालकांचे प्रतिनिधी यांचा समावेश केला जाईल. मुंबईसारख्या शहरामध्ये लैंगिक रोग मोठया प्रमाणात पसरत असून लोक त्यात बळी पडत आहेत. आदिवासी महिला याबाबतीत बोलण्यास संकोच बाळगतात, त्यामुळे माहितीच्या अभावी त्यांचा रोग वाढत असेल तर त्याचाही गंभीरपणे विचार होणे आवश्यक आहे. याबाबत मी पुन्हा सांगतो की, महाराष्ट्रात तीन मोठया शहरात चर्चासत्रे होतील. सभागृहाच्या भावनेचा हा प्रश्न असल्याने महाराष्ट्रातील तीन मोठया शहरामध्ये याची चर्चासत्रे होतील. या सभागृहातील प्रतिनिधी म्हणून 4-5 सदस्य व खालच्या सभागृहातील प्रतिनिधी म्हणून 4-5 सदस्य यांची समिती स्थापन केली जाईल. डॉ.दीपक सावंत, डॉ.वसंत पवार, श्री.विनोद तावडे, डॉ.नीलम गोऱ्हे यांना मी विनंती करतो की, त्यांनी या

....2

प्रा.वसंत पुरके.....

समितीमध्ये सहभागी व्हावे. याबाबत मी सभागृहाला आश्वासन देऊ इच्छितो की, अभ्यासक्रमाचे स्वरुप ठरविल्यानंतरच अभ्यासक्रम लागू करायचा की नाही याबाबत निर्णय घेण्यात येईल.

सभापती महोदय, जनतेला लैंगिक रोगापासून सावध केले पाहिजे. त्यादृष्टीने मुलांना लैंगिक शिक्षण देणे गरजेचे आहे परंतु त्यातील आकर्षणामुळे त्यांच्या मनावर वाईट परिणाम होऊ नये हे पाहिले पाहिजे. आकर्षणापासून मुले परावृत्त कशी राहतील हे पाहिले पाहिजे. याच भावनेने हा विषय सभागृहात मांडण्यात आलेला आहे. अभ्यासक्रम शिकताना मुलांवर वाईट परिणाम होणार नाहीत, याची काळजी घेऊन त्यापासून त्यांना आकर्षणापासून परावृत्त करणे गरजेचे आहे. याची दखल घेतली जाईल. याबाबत सविस्तर चर्चासत्र घेण्यात येईल व त्याद्वारे अभ्यासक्रमाचे स्वरुप ठरविले जाईल.

**उपसभापती** : माननीय उद्योगमंत्री श्री.अशोक चव्हाण यांना खालच्या सभागृहात जायचे असल्याने सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी त्यांच्या विभागाशी संबंधित असलेला औचित्याचा मुद्दा मांडावा.

.....3



PNG/ MHM/ SBT/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिसरातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाईचा प्रश्न दिवसेंदिवस उग्र होत चालला आहे. वास्तविक तेथील जनतेची 150 एमएलडी पाण्याची दैनंदिन मागणी असताना शासनातर्फे एमआयडीसी कडून केवळ 117 एमएलडी पाणी मंजूर करण्यात आले आहे. असे असताना त्यातही गेल्या काही दिवसापासून 80 ते 90 एमएलडी इतक्याच पाण्याचा पुरवठा केला जात आहे आणि तेही अनियमित वेळेनुसार व कमी दाबाने दिले जात आहे. त्या भागातील जनता पाण्याच्या तीव्र टंचाईच्या समस्याने त्राही त्राही करीत आहे. याबाबत एमआयडीसी च्या संबंधित अधिकाऱ्यांकडे मंजूर कोटयानुसार तरी पाणी पुरवठा करावा अशी वेळोवेळी मागणी करण्यात आली आहे. तरी याबाबत आश्वासनपुर्ती करण्याऐवजी त्रस्त झालेल्या जनतेच्या तोंडाला पाने पुसण्यात येत आहेत. परिणामी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिसरात पाण्यावरुन तीव्र संघर्ष निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला आहे. या अत्यंत महत्वाच्या विषयाबाबत शासनाने वेळीच हस्तक्षेप करुन मंजूर कोटयानुसार आजपासूनच पाणी सुरु करावे अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्दयाद्वारे करीत आहे.

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त ....

आणि या संबंधात खात्याचे कार्यक्षम मंत्री महोदय येथे उपस्थित आहेत. तरी आपल्या मार्फत मी त्यांना विनंती करतो की, त्यांनी याबाबत दखल घेऊन योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री. अशोक चव्हाण (उद्योग मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांची अतिशय महत्त्वाच्या प्रश्नाबाबत औचित्याच्या मुद्याद्वारे उल्लेख केला आहे. कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न तेथील लोकसंख्या लक्षात घेता निश्चितच अडचणीची झालेली आहे ही बाब मान्य करावीच लागेल. याबाबतीत वस्तुस्थिती अशी आहे की, तेथे जवळपास 17 एमएलडी पाण्याची गरज आहे मात्र सन्माननीय सदस्यांनी ही गरज 150 एमएलडी असल्याचा उल्लेख केला आहे. परंतु सध्या आपण तेथे 100 एमएलडी पाणी उपलब्ध करून देत आहोत आणि अजून 7 ते 8 एमएलडी अधिक पाणी अशा प्रकारे एकंदर 107 ते 108 एमएलडी पाणीपुरवठा करण्याची आपली तयारी आहे. मात्र त्यासाठी पाटबंधारे विभागाने देखील परवानगी दिली पाहिजे. त्यांनी यासाठी तयारी दर्शविली तर तेवढे पाणी देण्याची आमची तयारी आहे. ही तांत्रिक बाब आहे आणि यामध्ये सुधारणा करण्याबाबत निर्णय घेण्यासाठी एमआयडीसीचे अधिकारी, महापालिकेचे इंजिनिअर्स यांची बैठक मी उद्या बोलाविली आहे. त्यामुळे जेवढा जास्तीत जास्त रिलिफ देण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत एवढेच मी या प्रसंगी सांगू इच्छितो.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी मागितली होती व ती त्यांना देण्यात आलेली आहे. परंतु आता सन्माननीय सदस्य येथे उपस्थित नसल्याने मी सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांना त्यांचा औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी देत आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, शिक्षकांच्या मान्यतेच्या संदर्भात सध्या फार मोठ्या प्रमाणात न्यायालयीन प्रकरणे निर्माण होत आहेत. म्हणूनच प्रत्येक शिक्षक या संदर्भात न्यायालयात जाण्यापूर्वी आता या ठिकाणी माननीय शालेय शिक्षणमंत्री उपस्थित आहेत, त्यांच्या उपस्थितीत मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करतो, जेणे करून त्यांनी याबाबत काही निर्णय घेतला तर फार मोठ्या प्रमाणात ही सगळी न्यायालयीन प्रकरणे समाप्त होतील.

सभापती महोदय, सुरूवातीस शाळा विनाअनुदान तत्त्वावर असते आणि टप्प्याटप्प्याने ती अनुदानावर येते. साधारणत: विनाअनुदानित शाळेमध्ये शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मान्यता

....... झेड 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोते .....

घेणे आवश्यक आहे आणि त्यांना मान्यता देणे ही विभागाची जबाबदारी आहे. परंतु शासनाकडून मान्यता मिळत नाही म्हणून त्यांना मान्यता घेतली जात नाही. मग टप्प्याटप्प्याने शाळा अनुदानावर आल्यानंतर मात्र मान्यता घेतली जाते. दरम्यान त्यांच्या विनाअनुदानित काळातील सेवा, पेन्शन वगैरे लाभांसाठी ग्राह्य धरली जाते परंतु त्यासाठी अट इतकीच आहे की, त्यांना मान्यता घेतली पाहिजे. म्हणून विनाअनुदानित सेवेला मान्यतेसाठीची प्रकरणे अनेक प्रलंबित आहेत. तेव्हा मी या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो की, साधारणत: 2006-07 अखेर ज्या ज्या शिक्षकांची विनाअनुदानित शाळांतील सेवेची प्रकरणे प्रलंबित आहेत ती तातडीने निकालात काढण्याच्या बाबतीत आपण सर्व शिक्षणाधिकाऱ्यांना तसेच शिक्षण संचालकांना निर्देश दिले तर मोठ्या प्रमाणत असलेली ही न्यायालयीन प्रकरणे समाप्त होऊ शकतील. तरी आपण त्याबाबत काही निर्णय येथे जाहीर केल्यास बरे होईल.

. प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षणमंत्री) : सभापती महोदय, हा विषय निश्चितपणे गंभीर असाच आहे. 4-5 वर्षे ही प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यामुळे त्यात पेन्शनची प्रकरणे किती आहेत, ॲप्रोचची प्रकरणे किती आहेत, न्यायालयीन प्रकरणे किती आहेत वगैरेची प्रश्नावली करून मी सगळ्या अधिकाऱ्यांना पाठविलील आहे आणि या संदर्भात मी 16 तारखेला सर्व अधिकाऱ्यांची एक बैठक बोलाविली आहे त्यामध्ये या अनुषंगाने चर्चा करून निर्णय घेण्यात येईल इतकेच मी या प्रसंगी सांगू इच्छितो.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, आपल्या परवानगीने मी औचित्याचा मुद्दा येथे उपस्थित करीत आहे. सभापती महोदय, शासकीय कर्मचारी आणि शिक्षक, प्राध्यापक यांना 6 टक्के महागाई भत्ता देण्याच्या बाबतीत नियम 93 खाली येथे चर्चा झाली. त्यात प्रश्नोत्तरे झाली त्यावेळी मी स्वत: आणि सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी प्रश्न विचारला होता की, 6 टक्के महागाई भत्ता 1 जानेवारी 2007 पासून लागू होईल काय ? त्यावर माननीय वित्त मंत्र्यांनी असे उत्तर दिले की, सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे आदेश निर्गमित करतो. डी.ए.मध्ये वाढ झालेली आहे तेव्हा ती द्यावीच लागणार. सभापती महोदय, तेव्हा माननीय सभापती यांनी माननीय वित्त मंत्र्यांना प्रश्न विचारला की, सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल काय ?

( यानंतर श्री. सरफरे ..... एए 1 ..

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही. यू.डायगव्हाणे...

त्यावेळी सन्माननीय मंत्रिमहोदयांनी आपण म्हणता त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल असे उत्तर दिले. याचा अर्थ असा की, केंद्र सरकारच्या धर्तीवर 1 जानेवारी 2007 पासून हा जी.आर. सर्व कर्मचाऱ्यांना लागू व्हावयास पाहिजे होता. परंतु कालपरवा जी. आर. काढण्यात आला आहे त्यासंबंधी मी वर्तमानपत्रामध्ये बातमी वाचली आहे आणि माहिती घेतली आहे त्यानुसार 1 एप्रिल 2007 पासून जी.आर. लागू होणार आहे. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, मंत्रिमहोदयांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे कारवाई झालेली नाही. त्यावेळी मी दोन प्रश्न विचारले होते. त्यामध्ये पहिला प्रश्न अधिवेशन संपण्यापूर्वी जी.आर.काढणार काय? आणि दुसरा प्रश्न 1 जानेवारी 2007 पासून जी.आर. लागू करणार काय? या दोन्ही प्रश्नांना "होय" असे उत्तर देण्यात आले होते. परंतु शासनाने काल घेतलेल्या निर्णयामुळे विसंगती निर्माण झाली आहे. शासनाच्या निर्णयाच्या विरोधात शासकीय कर्मचाऱ्यांनी आंदोलन उभे केले आहे. तेव्हा दिलेल्या आश्वासनाप्रमाणे कार्यवाही करावी अन्यथा आम्हाला हक्कभंगाची सूचना द्यावी लागेल. तेव्हा सभापती महोदय, आपण 1 जानेवारी 2007 पासून जी.आर. ची अंमलबजावणी करावी अशाप्रकारचे निर्देश शासनाला द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

**उपसभापती** : ठीक आहे.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, होय.

-----

AA 2 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MHM/ SBT/

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, विधी व न्याय विभाग आणि गृह विभागाशी संबंधित असलेला औचित्याचा मुद्दा मी आपल्या अनुमतीने सभागृहापुढे मांडते. परभणी येथे विद्या देशमुख या मुलीवर मेहबूब खान पठाण व वसीमखान पठाण या दोन गुंडांनी 1.12.2003 रोजी बलात्कार केला यासंबंधी विधानसभा आणि विधान परिषदेमध्ये वेळोवेळी प्रश्न मांडण्यात आलेला आहे. या घटनेला साडे तीन वर्षे झाली आहेत. विद्या देशमुख हिच्या घरामध्ये घुसून तिच्या कुटुंबियांसमोर तिच्यावर बलात्कार करुन तिची निर्घृण हत्या करण्यात आली. घरातील लोकांवर त्यांनी सशस्त्र हल्ला केल्यानंतर दोन वर्षे हे आरोपी फरारी होते. घटना घडल्यानंतर तीन वर्षानी गेल्या सहा महिन्यापूर्वी त्यातील एक आरोपी सापडला. विद्या देशमुखचे वडील श्री. विलास देशमुख हे उपोषणला बसण्याच्या मनस्थितीत आहेत. अशा असह्य परिस्थितीमध्ये त्यांची मागणी आहे की, जलद गती न्यायालयाकडे हे प्रकरण सुपूर्द करावे. आणि त्याचबरोबर ज्यांनी बलात्काराच्या केसेस हाताळल्या आहेत असा अनुभवी सक्षम वकील देण्यात यावा. जेणेकरुन पुढील सहा महिन्याच्या आत या खटल्याचा निकाल लागून या आरोपींना अतिशय कठोर अशी शिक्षा होणे आवश्यक आहे. परभणी शहरामध्ये संपूर्णपणे दहशत आणि भयग्रस्ततेचे वातावरण निर्माण झाले आहे. आम्ही या कुटुंबाचे पुनर्वसन करु अशी घोषणा सरकारने केली होती त्या घोषणेची अजून अंमलबजावणी झाली नाही. म्हणून विद्या देशमुख प्रकरणाचा खटला परभणी येथील जलद गती न्यायालयाकडे वर्ग करण्यात यावा किंवा त्याकरिता फास्ट ट्रॅक कोर्ट करण्यात यावा. अशाप्रकारे या औचित्याच्या मुद्दयाव्दारे मी या प्रश्नाकडे आपले लक्ष वेधते. आणि हे अधिवेशन संपण्यापूर्वी अशाप्रकारचे कोर्ट स्थापन करण्याचा औपचारिक निर्णय शासनाने घेऊन त्या कुटुंबाला दिलासा द्यावा अशी विनंती करते.

धन्यवाद.

---

AA 3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान :सभापति महोदय, माननीय सदस्या श्रीमती गोरहे ने विद्या देशमुख का जो मामला अभी यहां उठाया है, इस मामले में परभणी शहर में हलचल मच गई थी. मेरा यह अनुरोध है कि इस मामले की फास्ट ट्रेक कोर्ट में सुनवाई की जानी चाहिए और दूसरा मेरा यह अनुरोध है कि हर जिले में फास्ट ट्रेक कोर्ट और महिला पुलिस स्टेशन की स्थापना की जानी चाहिए. क्योंकि महिलाओं पर हो रहे अत्याचार के मामले बढ़ रहे हैं इसलिए इस संबंध में शासन की ओर से कोई न कोई निर्णय लेने की आवश्यकता है.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, होय.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. "खैरलांजीजवळ दलित महिलेला पेटविले", अशाप्रकारची बातमी वर्तमानपत्रातून आलेली आहे. सभापती महोदय, कालच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचा अवमान झाला म्हणून या ठिकाणी तीव्र भावना व्यक्त केल्या गेल्या. त्या संदर्भाने माननीय उपमुख्य मंत्री महोदयांनी निवेदन केले. हजारो वर्षापासून दलित समाज पायदळी चिरडला गेलेला आहे, अन्याय आणि अत्याचार सहन करून तो भावनाप्रधान झालेला आहे याची देशातील राजकीय संघटनांना जाणीव होऊ लागलेली आहे. एखाद्या दलितांवर अत्याचार झाला तर संपूर्ण दलित समाज कसा खवळून उठेल, त्याचे प्रतिबिंब संपूर्ण महाराष्ट्रामध्ये कसे उमटेल, याची योजना तयार करत असतात. बातमीमध्ये म्हटलेले आहे की, "दलित हत्याकांड प्रकरणी गाजलेल्या भंडारा जिल्ह्यातील खैरलांजी गावाजवळ पुन्हा एका दलित महिलेला जाळण्यात आल्याची घटना घडली आहे. दुर्दैवी महिलेचे नाव इंदूबाई तांडेकर, वय 35 असे आहे. संशयित बाबुलाल भगत फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत."

सभापती महोदय, माझी एकच मागणी आहे की, या महिलेला ज्यांनी पेटवून दिलेले आहे त्याचा शोध लवकरात लवकर घेण्यात यावा. महाराष्ट्रामध्ये लोकांच्या भावना भडकतील अशाप्रकारची कोणतीही कृती होता कामा नये, याची दखल घेतली जावी. पोलिसांनी यासंबंधात सतर्क राहून लवकरात लवकर आरोपीला पकडून त्याच्यावर कारवाई करावी, अशाप्रकारची माझी मागणी आहे. मंत्री महोदयांनी या प्रकरणी त्वरित लक्ष द्यावे, अशी विनंती करतो.

श्री.गणेश नाईक (कामगार मंत्री) : कारवाई करण्यात येईल.

---



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शेतकरी आझाद मैदानावर उपोषणास बसलेले आहेत. 1990 साली महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाने सुप्रीम कोर्टामध्ये अफिडेव्हीट केलेले आहे. जवळजवळ 61 हजार हेक्टर जमीन वन संज्ञा म्हणून जाहीर केलेली आहे. त्यामधील 42 हजार हेक्टर जमीन सिंधुदुर्ग जिल्हयातील आहे. वन संज्ञा लावून सातबाराच्या उताऱ्यावर सरकारचा हक्क लावण्यात आलेला आहे. ही जमीन शेतकऱ्यांची आहे. त्या ठिकाणी त्यांची घरे आहेत, झाडे आहेत, शेती आहे, शाळा आहे. शासनाने वन संज्ञा लावून सरकारच्या ताब्यात घेतल्यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये कमालीचा असंतोष आहे. त्यावेळचे जिल्हाधिकारी श्री.भूषण गगराणी यांनी पुन्हा सर्व्हे केला असता ही जमीन 42 हजार हेक्टर नसून 4200 हेक्टर जमीन वनसंज्ञामध्ये असल्याचा निष्कर्ष काढला. हा निष्कर्ष निघून सुध्दा महाराष्ट्र शासनाने 1998 पासून 2007 पर्यन्त कोणतीही कारवाई केलेली नाही. गेल्या अधिवेशनामध्ये या विषयावर सभागृहात चर्चा झाली, त्यावेळेस वन मंत्र्यांनी आश्वासन दिले की, या विषयावर समिती गठित करू आणि पुन्हा एकदा ॲफिडेव्हीट सुप्रीम कोर्टामध्ये दाखल करू. परंतु आजपर्यन्त काही झालेली नाही. आज आझाद मैदानावर शेतकरी उपोषणास बसलेले आहेत. सरकारतर्फे कोणीही मंत्री महोदय त्यांना भेटण्यास गेलेले नाहीत. सभापती महोदय, आपल्या माध्यमातून माझी विनंती आहे की, या विषयावर ॲफिडेव्हीट करण्याच्या दृष्टीने शासनाने कारवाई करावी आणि उपोषणास बसलेल्या शेतकऱ्यांना तसे आश्वासन देण्यात यावे, असा माझा मुद्दा औचित्याचा मुद्दा आहे.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, या विषयावर मला बोलायचे आहे. मी आझाद मैदानावर उपोषणास बसलेल्या शेतकऱ्यांना भेटून आलेलो आहे. सिंधुदुर्ग शहरातील जमीनही वन संज्ञेखाली लावलेली आहे. यामुळे शेतकऱ्यांना आपली घरे दुरूस्त करता येत नाहीत. शेतकऱ्यांना आपल्या शेतातील झाडे तोडता येत नाहीत, अशी शेतकऱ्यांची परिस्थिती झालेली आहे. परवा महसूल मंत्र्यांच्या दालनामध्ये या विषयावर बैठक झाली. या संदर्भात फेर सर्व्हे करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. अनेक वेळेला सर्व्हे झालेले आहेत. गगराणी आणि लक्ष्मी बिद्री यांनी पुन्हा सर्व्हे केला. मुख्य सचिव सुप्रीम कोर्टामध्ये प्रतिज्ञापत्र सादर करणार आहेत.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर ....

आणि 42 हजार हेक्टरपैकी 4 हजार हेक्टरच जमीन त्यामध्ये येते त्यामुळे या 4 हजार हेक्टर जमिनीच्या बाबतीत या राज्याचे मुख्य सचिव सुप्रीम कोर्टामध्ये केव्हा प्रतिज्ञा पत्र सादर करणार आहेत हे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे. त्याचप्रमाणे या ठिकाणी कोकणातून आलेले जे शेतकरी आंदोलन करण्यासाठी बसलेले आहेत त्यांना माननीय मंत्रिमहोदयांनी किंवा शासनाच्या प्रतिनिधीने भेटून त्यांना दिलासा द्यावा अशी मी विनंती करतो.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मला यासंदर्भात एकच पूरक बाब सांगावयाची आहे. कोकणतील जनतेचा अतिशय महत्वाचा हा प्रश्न आहे. संपूर्ण राज्यामध्ये 62 हजार हेक्टर जमीन वन सज्ञा म्हणून जाहीर झालेली आहे त्यापैकी 42 हजार हेक्टर जमीन एकट्या सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये दाखवलेली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व्हे केल्यानंतर अशी जमीन फक्त साडेचार हजार हेक्टर निघाली. ते होऊन सुध्दा गेली सात आठ वर्षे आमच्या लोकांना त्या जमिनीवर कर्ज घेता येत नाही, नवीन बांधकाम करता येत नाही. शासनाच्या एका अधिकाऱ्याच्या चुकीमुळे आज त्या ठिकाणी हजारो लोक अडचणीत आलेले आहेत. त्यामुळे आपण शासनाला याबाबतीत निदेश द्यावेत. आज ते लोक त्या ठिकाणी उपोषणाला बसलेले आहेत. धरणे धरण्यासाठी बसलेले आहेत. सभापती महोदय, आपण कोकण विभागातील आहात. आपल्याकडून कोकणातील जनतेच्या खूप मोठ्या अपेक्षा आहेत. आपण याबाबत शासनाला असे निदेश द्यावेत की, त्या लोकांना बोलवून त्यांचे समाधान करावे. त्यांना कोणताही व्यवहार करता येत नाही. आंब्याचे नुकसान झाल्यामुळे लोकांना कर्ज काढावे लागते. परंतु त्या लोकांना कर्ज मिळत नाही. सभापती महोदय, आपण याबाबतीत निदेश द्यावेत अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आमचे मित्र सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत यांनी कोकणाच्या दृष्टीने अत्यंत जिव्हाळ्याचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्याला सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर तसेच सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी पाठिंबा दिलेला आहे. कोकणाच्या दृष्टीने अत्यंत जिव्हाळ्याचा असलेला हा विषय आहे. कोकणातील 42 हजार हेक्टर जमिनीवर वन सज्ञा लावल्यामुळे या शेतकऱ्यांची कुटुंबे उद्ध्वस्त होणार असतील तर शासनाने त्यांच्याकडे पाहण्याची आवश्यकता आहे. एवढेच नव्हे तर आयुष्यभर,

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM

श्री. मधुकर सरपोतदार .....

पिढ्या न पिढ्या जी कुटुंबे त्या ठिकाणी राहिली, ज्यांची घरे-दारे त्या ठिकाणी आहेत, ज्या ठिकाणी शेत जमीन आहे त्या सगळ्या विभागाला वन सज्ञा लावण्याचा निर्णय कसा काय घेतला हे निर्णय घेणाऱ्यालाच माहीत. मला त्याची कल्पना नाही. यासंदर्भात हजारो शेतकरी आझाद मैदानावर बसलेले आहेत. या प्रश्नाला, अन्यायाला वाचा फुटावी, त्यांना दिलासा मिळावा आणि त्यातून मार्ग निघावा एवढ्यासाठी ते लोक या ठिकाणी आलेले आहेत. लोकप्रतिनिधींनी या ठिकाणी हा विषय उपस्थित केलेला आहे. माझी आपल्याला विनंती आहे. आपण अशा अनेक गोष्टींमध्ये पुढाकार घेऊन धाडसाने काही निर्णय घेतलेले आहेत. यासंदर्भातही आपण धाडसाने निर्णय घेऊन शासनाला निदेश द्यावेत. या जमिनीची पूर्ण पाहणी करुन मुख्य सचिवांकडून जे प्रतिज्ञापत्र सुप्रीम कोर्टात सादर व्हावयाचे आहे ते वेळेवर सादर केले जाऊन त्या शेतकऱ्यांना संरक्षण मिळेल अशी भूमिका महाराष्ट्र शासनाकडून मांडली गेली तर या सर्व शेतकऱ्यांचा प्रश्न मार्गी लागेल. सगळ्या मराठी गरीब शेतकरी कुटुंबांचा प्रश्न मार्गी लागेल आणि त्यांच्या जीवनात आनंद निर्माण होईल. अशा प्रकारचा हा औचित्याचा मुद्दा आहे. या अन्यायाचा वाचा फोडण्याच्या बाबतीत आपण पुढाकार घ्यावा आणि तशा पध्दतीचे निदेश शासनाला द्यावेत अशी मी या औचित्याच्या मुद्याला पाठिंबा देत असताना सदनाच्या वतीने आपल्याला विनंती करतो.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत यांनी या औचित्याच्या मुद्याव्दारे कोकण भागातील ज्या जमिनीवर वन सज्ञा लावलेली आहे त्यासंदर्भातील मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्याबाबत सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे तसेच सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार साहेब या सगळ्यांनी आपली मते व्यक्त केलेली आहेत. एक गोष्ट नक्की आहे की, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये 62 हजार हेक्टर जमीन वन सज्ञा म्हणून जाहीर केली त्यामध्ये कोकणातील 42 हजार हेक्टर जमीन येत असेल तर त्या ठिकाणच्या गोरगरीब जनतेपुढे आपल्या उपजीविकेचा प्रश्न नक्कीच आ वासून उभा राहील. मला स्वत:ला वन खात्याच्या बाबतीत जास्त काही माहिती नसली तरी एक गोष्ट नक्की आहे की, वन खाते हे लहरीप्रमाणे वागते असा वारंवार अनुभव आमच्या सारख्याला येतो. कोठेही अचानकपणे वन सज्ञा लावली जाते.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(उपसभापती....

कोकणातील शेतक-यांचा प्रश्न जसा गंभीर बनलेला आहे त्याप्रमाणे राज्यामध्ये ब-याचशा ठिकाणी अशा प्रकारचे प्रश्न निर्माण झालेले आहेत. आता सदनामध्ये औचित्याच्या मुद्याद्वारे जी चर्चा करण्यात आली त्या चर्चेच्या अनुषंगाने मी शासनाला असे निदेश देत आहे की, येत्या 15 दिवसाच्या आत या प्रश्नाच्या संदर्भात कोकणातील आमदार, या प्रश्नाशी सर्व संबंधित, माननीय मंत्री आणि सचिव यांची तातडीने बैठक बोलावून या प्रश्नावर निश्चित स्वरुपाचा निर्णय घ्यावा जेणेकरुन या निर्णयाद्वारे कोकणातील शेतक-यांच्या हालअपेष्टा संपुष्टात येतील, त्यांच्या उपजीविकेचा मार्ग त्यांना मोकळा होईल. आज कोकणातील शेतकरी त्यांच्या मागण्यांसाठी आझाद मैदानामध्ये उपोषणाला बसलेले आहेत. त्यांची आज संध्याकाळी 5.00 वाजेपर्यन्त भेट घेऊन त्यांच्या प्रश्नाला वाचा फोडण्याच्या दृष्टीने त्यांना आश्वासन द्यावे.

श्री. गणेश नाईक (कामगार मंत्री) : होय.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व विनोद तावडे,वि.प.स. यांनी "महाराष्ट्र रज्य विद्युत वितरण (महावितरण) कंपनीने विद्युत देयकांचे वितरण व मीटर रिडिंगचे काम खाजगी कंत्राटदारांना दिल्यानंतर देखील वीज ग्राहकांना भरमसाठ आकाराची देयके येणे सुरु असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व जगदीश गुप्ता, वि.प.स. यांनी "विदर्भातील अमरावती, यवतमाळ, बुलढाणा, अकोला व वाशिम या 5 जिल्ह्यांचे सार्वजनिक बांधकामाचे वार्षिक बजेट 450 कोटीचे असताना, सर्वाधिक 100 ते 110 कोटी यवतमाळ जिल्ह्यात, अकोला व वाशिम जिल्ह्यात 150 कोटी व उर्वरित अमरावती व बुलढाणा जिल्ह्यात खर्च झ ााल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व सागर मेघे, वि.प.स. यांनी " अमरावती शहरात रात्रीच्या वेळी विजेचे भारनियमन होत असल्याने परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांच्या अभ्यासात मोठ्या प्रमाणात व्यत्यय येऊन त्यांचे नुकसान होत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे, वि.प.स. यांनी "दिनांक 10.4.2007 रोजी जालना येथील कन्हैयानगर भागात असलेल्या पालिकेच्या उद्यानातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची करण्यात आलेली विटंबना, त्यामुळे संतप्त जमावाने वाहनांवर केलेली दगडफेक, परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी लाठीमार व गोळीबार केल्याबाबत" या विषयावर

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 14:40

(उपसभापती....

नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री. विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते व संजय केळकर, वि.प.स. यांनी "सन 2005-06 या आर्थिक वर्षात एम.एम.आर.डी.ए.ने शासनाच्या बुडीत महामंडळामध्ये 780 कोटी रुपये गुंतविल्यामुळे व्याज व मुद्दल वसूल न झाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील, व श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी " 2005 सालच्या पावसाळ्यातील महापुरामुळे राज्यातील अकोला, अमरावती, बुलढाणा, भंडारदरा, सांगली व कोल्हापूर या जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची घरे उद्ध्वस्त झाल्याने घराच्या फेरबांधणीसाठी इंदिरा आवास योजनेतून अनुदान मंजूर होण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावास मान्यता मिळण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री. नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर व केशवराव मानकर, वि.प.स. यांनी " दिनांक 10.4.2007 रोजी धर्माबाद (जिल्हा नांदेड) जवळ गोदावरी नदीवर बांधण्यात येत असलेल्या बाभळी बंधा-याचे बांधकाम रोकण्याच्या दृष्टीने आलेल्या आंध्रप्रदेशातील लोकप्रतिनिधी व आंदोलकांनी दगडफेक करुन बाभळीमध्ये गोंधळ घातल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे व रामनाथ मोते, वि.प.स. यांनी "मुंबई उपनगरातील सुमारे 1 लाख ऑटोरिक्षा मालकांनी निम्म्यापेक्षा अधिक ऑटोरिक्षा प्रादेशिक परिवहन खात्यातील काही अधिका-यांना हाताशी धरुन भाड्याने चालविण्यासाठी

..4..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(उपसभापती...

बेकायदेशीररित्या अतिरिक्त परवाना मिळविण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर नियम 93 अन्वयेची निवेदने घेण्यात येतील. नियम 93च्या निवेदनावर सन्माननीय सदस्यांनी एकच प्रश्न विचारावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आपण दिलेला आदेशांची नीट अंमलबजावणी होत नाही याकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो.

म्हाडाच्या प्रश्नासंबंधी मी वारंवार स्मरण करुन दिल्यानंतर आपण शासनाला तीन दिवसात निवेदन करण्याचे आदेश दिनांक 16 मार्च 2007 ला दिले. आज 11 एप्रिल तारीख आहे. अजून शासनाने निवेदन केलेले नाही. त्याच प्रमाणे "गोरेगाव येथील आरे कॉलनीसंबंधी" निवेदन करण्याचे आदेश आपण दिलेले होते. त्यासंबंधीचे निवेदन अद्याप केलेले नाही. "हिरानंदानी हॉस्पिटलमध्ये खानविलकर नावाच्या महिलेच्या झालेल्या मृत्यूसंबंधीचे" निवेदन अद्याप केलेले नाही. "निवृत्त न्यायाधीश लेंटिन यांचे आदेश धुडकावून कोट्यवधी रुपयांचा केलेला भ्रष्टाचार" या विषयासंबंधी आपण दिनांक 23 मार्च 2007 रोजी शासनाला निवेदन करण्यासंबंधीचे निदेश दिले होते. ते निवेदन अद्याप केलेले नाही. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी 100-150 निवेदने येतात. सभापती महोदय, भ्रष्टाचाराची प्रकरणे, अधिकारी काही लोकांची फसवणूक करतात असे विषय आम्ही 93च्या सूचनेद्वारे मांडलेले आहेत.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MHM/ SBT/ 14:45

श्री.मधुकर चव्हाण.............

हे विषय या सभागृहात येऊ नयेत अशी शासनाची इच्छा आहे की काय? शेवटच्या दिवशी 100 ते 150 निवेदने सादर केली जातात. आम्हाला अशी शंका आहे की, अधिवेशन लवकर गुंडाळले जाणार आहे. त्यामुळे या निवेदनांबाबत तातडीने विचार झाला पाहिजे.

**उपसभापती** : उद्या तीनही विषयाची निवेदने करावीत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी काल विधिमंडळ सचिवांना पत्र दिले आहे. आतापर्यंत माझ्या नियम 93 च्या सात सूचना प्रलंबित आहेत. 3 सूचनांवरील निवेदने प्राप्त झाली. 12 मार्चपासून आम्ही सूचना दिलेल्या आहेत. पिठासीन अधिकाऱ्यांचे आदेश पाळले जात नसतील तर नियम 93 चा विषय बंद करण्यात यावा. कशासाठी आम्ही सूचना द्यायच्या? सूचना मान्य झाल्यानंतर त्यावरील निवेदनाचा कालावधी निश्चित केला पाहिजे. 3 ते 5 दिवसात किंवा लगतच्या पुढील आठवड्यात सूचनेवरील निवेदन सादर झाले पाहिजे. मी मांडलेल्या 7 सूचनांवरील निवेदने अद्याप प्रलंबित आहेत. आम्हाला प्रश्न विचारण्याची संधी केव्हा मिळणार आहे? अधिवेशन लवकर गुंडाळले गेले तर आमच्या हातात निवेदन वाचायला दिली जातील. त्यामुळे प्रश्नाची तड लागणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी सांगितल्याप्रमाणे, भ्रष्ट्राचाराची जी प्रकरणे आहेत नेमके त्याच विषयावरील निवेदन सादर होत नाही. ज्याप्रमाणे नियम 93 च्या सूचनेचा प्रश्न आहे तसा तो लक्षवेधी सूचनेसंबंधी देखील आहे. 12 मार्च, 2007 पासून एक महिन्याच्या काळात माझ्या 12 लक्षवेधी सूचना मंजूर होऊनही फक्त एकच लक्षवेधी सूचना पहिल्या आठवडयात चर्चेला आली होती. आम्ही प्रश्न उपस्थित करायचे की नाहीत? सभापती महोदय, या नियमांचा विचार केला पाहिजे. सिस्टीम ठरवून दिली पाहिजे. महिन्याभरात एकच लक्षवेधी सूचना चर्चेला येत असेल तर आम्ही लक्षवेधी सूचना द्यायची की नाही? आपण या प्रश्नामध्ये लक्ष घालून आम्हाला न्याय द्यावा. सन्माननीय सदस्यांना न्याय द्यावा. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी माझ्याकडे तक्रार केली की, त्यांची एकही लक्षवेधी सूचना चर्चेला आलेली नाही. यापुढे असेच होणार असेल तर मी सभागृहात येणार नाही असेही त्यांनी मला सांगितले आहे. या संदर्भात नियम ठरवावेत, सिस्टीम ठरवावी, अन्यथा नियम 93 च्या सूचना व लक्षवेधी सूचना बंद कराव्यात.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, गोरेगावच्या फिल्म सिटीमधील जमिनीची किंमत 70 कोटी रुपये असल्याचा शासनाचा अहवाल आहे. या प्रश्नासंबंधी नागपूरच्या अधिवेशनात मी

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.............

लक्षवेधी सूचना मांडली होती. मला सांगण्यात आले की, पुढच्या वेळी घेण्यात येईल. 70 कोटी रुपये किंमत असलेली जमीन 3 कोटी रुपयांना विकण्यात आली. गेला महिनाभर आम्हाला दररोज सांगण्यात येते की, उद्या घेण्यात येईल. आता सांगण्यात आले की, सत्यता पडताळून घेऊ. माझ्या माहितीप्रमाणे लक्षवेधी सूचना स्वीकृत झालेली आहे. वास्तविक लक्षवेधी सूचना स्वीकृत झाल्यानंतर ती संबंधित विभागाकडे तात्काळचा शिक्का लावून वस्तुस्थिती मागविण्यासाठी पाठविली जाते. या विषयामध्ये कसली सत्यता पडताळून पाहावयाची आहे? 70 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार सभागृहात उपस्थित होऊ नये अशी शासनाची इच्छा आहे का?

श्री.पांडुरंग फुंडकर : संसदीय कार्यमंत्र्यांना बोलावून समज द्यावी.

**उपसभापती** : आज बुधवार आहे. शुक्रवारी दुपारी ताबडतोब ही लक्षवेधी सूचना घेण्याचा प्रयत्न केला जाईल. संसदीय कामकाजमंत्र्यांना सभागृहात उपस्थित होण्याची विनंती केली आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, शासनाकडून लक्ष दिले जात नाही म्हणून नियमात तरतूद केली तरी देखील ही परिस्थिती आहे. विशेष उल्लेखाची सूचना मांडल्यानंतर लेखी स्वरुपात एका महिन्यात उत्तर दिले पाहिजे. परंतु वर्ष-वर्ष होऊनही उत्तरे पाठविली जात नाहीत. या सभागृहाच्या माध्यमातून मांडलेल्या प्रश्नांना किंमत द्यायची नाही, महत्व द्यायचे नाही याला अधिकारी जबाबदार आहेत. सभापती महोदय, मंत्रीमहोदय असफल आहेत का? त्यांनी राजीनामा द्यावा असे आम्ही बोलू शकत नाही. अधिकारी मंत्र्यांना कशा पध्दतीने टांगवतात? आजचा दिवस उरकला, आम्ही सुटलो अशा पध्दतीने अधिकारी खुशीत असतात. आम्ही निर्णय दिला, माहिती योग्य असो वा नसो, पुढचा प्रश्न पुकारला की आपण सुटलो, यातून बचावलो अशी अधिकाऱ्यांची भावना झालेली आहे. म्हणून कोणत्याही परिस्थितीत संबंधित खात्याकडून प्रश्न, लक्षवेधी सूचना, नियम 93 च्या सूचना, विशेष उल्लेख या संदर्भात नियमानुसार योग्य ती दखल घेतली गेली नाही तर त्या खात्याच्या सचिवांना जबाबदार धरले पाहिजे. सभापती महोदय, आपण असे निर्देश द्यावेत की, हक्कभंग निर्माण होईल. मग कशी व्यवस्था होत नाही बघा. अधिकाऱ्यांना जबाबदार धरले पाहिजे. तसे घडल्याशिवाय यामध्ये काही सुधारणा होणार नाही अशी आमची ठाम भूमिका झाली आहे. सभागृहात मंत्री येतात, बोलतात, विषय संपला......................

(नंतर श्री.जुन्नरे...

अस्ुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

त्यांच्यावर काय इलाज करावयाचा ? मंत्र्यांनाच आपण नेहमी जबाबदार धरावयाचे का? परंतु जी कामे अधिकारी गलेलठ्ठ पगार घेऊन करतात त्यांना यामध्ये काहीच जबाबदार धरावयाचे नाही का? त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, या प्रश्नाच्या संदर्भात आपल्या दालनात एक बैठक घ्यावी व सदनाचा जो अशा प्रकारे अवमान होतो आहे तो कोठे तरी थांबवावा अशी माझी आपल्याला आग्रहाची विनंती आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी जो मुद्दा मांडला तो अतिशय योग्य आहे. नियम 93 च्या सूचनेच्या संदर्भात, लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात तसेच ब-याच विषयाच्या संदर्भात मागच्या अधिवेशनात चर्चा झाली होती. परंतु पुन्हा ये रे माझ्या मागल्या सारखीच परिस्थिती निर्माण झालेली आहे. आमचे सर्व गटनेते, प्रतोद यांची आपल्या किंवा माननीय सभापती महोदयांच्या दालनात एक बैठक बोलवावी व यासंदर्भात योग्य तो निर्णय घ्यावा. आम्ही स्पेसिफिक उदाहरणे देत असतो. आम्ही ज्या लक्षवेधी सूचना देत असतो त्या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात ती सर्व माहिती बिल्डरकडे त्वरित जाते आणि बिल्डर आमच्यावर दबाव आणतो. त्यामुळे हा जो काही प्रकार सुरु आहे तो सिरिअस आहे. केवळ मंत्रीच नाही तर विधी मंडळ कर्मचा-यांकडून सुध्दा यासंदर्भात माहिती घेतली पाहिजे. आम्ही लक्षवेधी सूचना दिल्या बरोबर समोरच्या संबंधित व्यक्तीकडे ही माहिती जातेच कशी? ही बाब सिरीअस आहे. केवळ प्रश्नांच्या संदर्भात देखावा करणे हे काही बरोबर नाही. आम्ही 50 दिवस अगोदर लक्षवेधी सूचना का देत असतो? त्यामुळे आपण या विषयाच्या संदर्भात बैठक बोलवावी अशी विनंती आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आम्ही जर तारांकित प्रश्न 3.00 वाजता दिला तर 4.00 वाजता संबधित व्यक्तीकडून फोन येतो की, "साहेब काही विचारु नका." मी काल मोखाडा बंधा-याच्या भ्रष्टाचाराच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला होता. ज्यावेळी बजेट सेशनमधील पुरवणी मागण्यावर चर्चा सुरु होती त्यावेळी संध्याकाळी मला फोन आला की, " या प्रश्नाच्या संदर्भात लक्ष घालू नका." सभापती महोदय, जर असा प्रकार होत असेल तर आम्ही प्रश्न तरी का विचारावयाचे ? त्यामुळे या विषयाच्या संदर्भात आपण गंभीर दखल घ्यावी. सन्माननीय सदस्य श्री. तावडे यांनी म्हटल्या प्रमाणे यासंदर्भात आपल्या किंवा माननीय सभापती महोदयांच्या दालनात एक बैठक बोलवावी व या विषयाला न्याय मिळवून द्यावा.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा मांडलेला आहे तो सिरिअस आहे. लक्षवेधी सूचना, तारांकित प्रश्न असो हे ज्याच्या संदर्भात असतात त्यांच्याकडून अशा प्रकारचे निरोप येणे बरोबर नाही, योग्य नाही. हा विषय फार सिरिअस आहे. या सर्व प्रकरणाची चौकशी करुन त्याचा अहवाल हे अधिवेशन संपण्यापूर्वी अहवाल द्यावा. या विषयाच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, काही काही ठिकाणी आपल्या कडून या व्यासपीठाचा गैरवापर होऊ नये यासाठी सदस्यांनीही आत्मपरीक्षण केले पाहिजे. हे मी कोणालाही उद्देशून बोलत नाही. मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, असे प्रकार घडत नाहीत हे मी नाकारीत नाही. या विषयाच्या संदर्भातील सन्माननीय सदस्यांच्या भावना बरोबर आहेत. या सभागृहाच्या कामकाजाला एक प्रतिष्ठा आहे. ही प्रतिष्ठा जपण्याचे काम आमदार, लोकप्रतिनिधी तसेच प्रशासनाने करावे. या विषयाच्या संदर्भात योग्य प्रकारे चौकशी करण्यात येईल. हे प्रकार कोठून घडतात, का घडतात यासंदर्भात चौकशी अहवाल आल्यानंतर काय भूमिका घ्यावयाची ते सुध्दा आपण ठरवू.

-------

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचा-यांना पाचवा वेतन लागू न होणे.

**मु. शी.** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचा-यांना पाचवा वेतन लागू न होणे याबाबत सर्वश्री संजय केळकर, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, विनोद तावडे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सुरेश शेट्टी ( तंत्र शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, विनोद तावडे यांनी "डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचा-यांना पाचवा वेतन लागू न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------------------

... ...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर : सभापती महोदय,नियम 93 अन्वये एक महत्वाचा विषय या ठिकाणी उपस्थित करीत आहे. रायगड जिल्हयातील लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचा-यांना 1999 मध्ये पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन देण्याचा जी.आर. निघाला. परंतु त्या ठिकाणच्या शिक्षकेतर कर्मचा-यांना पाचव्या वेतन आयोगा प्रमाणे वेतन मिळत नाही. मी स्वत: या विद्यापीठाला भेट देऊन शिक्षकेतर कर्मचा-यांकडून यासंदर्भात सर्व माहिती घेतलेली आहे. या शिक्षकेतर कर्मचा-यांनी अनेक वेळा यासंदर्भात आंदोलने केलेली आहेत. आता सुध्दा म्हणजे जानेवारी महिन्यात सुध्दा येथील शिक्षकेतर कर्मचा-यांनी आंदोलन केले होते.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर.........

त्यावेळी कुलगुरुंनी एक महिन्याच्या आत पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन सुरु करु असे हमीपत्र दिले होते. परंतु अद्यापपर्यंत पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन देण्यात आलेले नाही. काही शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा मृत्यू झालेला आहे. त्यांच्या कुटुंबांना पेन्शन लागू झालेले नाही. दिनांक 14 एप्रिल रोजी परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुण्यतिथी आहे. त्यांचे नाव या विद्यापीठाला देण्यात आलेले आहे. तेव्हा या विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन सुरु करण्यात यावे.

सभापती महोदय, निवेदनात जे म्हटलेले आहे ते चुकीचे आहे. निवेदनात असे म्हटले आहे की, " शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत शासनाकडून स्वतंत्ररित्या आदेश निर्गमित होणे क्रमप्राप्त ठरते." तसेच दुसऱ्या परिच्छेदात म्हटले आहे की, ".... डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्र शास्त्र विद्यापीठाचा समावेश नसला तरीही सदर विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना तंत्र शिक्षण संचालनालयाकडून पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत व त्याप्रमाणे विद्यापीठातील सर्व कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणीप्रमाणे वेतन मिळत आहे." दिनांक 2 एप्रिल रोजी मी त्या विद्यापीठाला भेट देऊन आलो आहे. तेथील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन मिळत नाही. तेव्हा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन देण्यात येणार आहे का ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्र शास्त्र विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिनांक 14.7.1999 रोजी पाचवा वेतन आयोग लागू केलेला आहे. तेथील कर्मचाऱ्यांना 70 टक्के रक्कम वितरित केलेली आहे. उर्वरित 30 टक्के रक्कम वितरित करायची आहे. ही रक्कम लवकरात लवकरत देण्यात येईल.

श्री.संजय केळकर : लवकरात लवकर म्हणजे केव्हा देण्यात येईल ?

श्री.सुरेश शेट्टी : एक महिन्यात देण्यात येईल.

---------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 वरील निवेदन क्रमांक दोन बाबत**

**उपसभापती** : नियम 93 वरील निवेदन क्रमांक दोन पुढे ढकलण्यात आले आहे.

---------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शालेय पोषण आहार योजनेंतर्गत अन्न शिजविण्यासाठी खरेदी करण्यात आलेल्या भांडी खरेदीमध्ये झालेला गैरव्यवहार

**मु. शी.** : शालेय पोषण आहार योजनेंतर्गत अन्न शिजविण्यासाठी खरेदी करण्यात आलेल्या भांडी खरेदीमध्ये झालेला गैरव्यवहार याबाबत श्री व्ही.यू.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख व श्री.वसंतराव खोटरे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. व्ही.यू.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख व श्री.वसंतराव खोटरे यांनी "शालेय पोषण आहार योजनेंतर्गत अन्न शिजविण्यासाठी खरेदी करण्यात आलेल्या भांडी खरेदीमध्ये झालेला गैरव्यवहार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, केंद्र पुरस्कृत शालेय पोषण आहार योजनेंतर्गत अन्न शिजविण्यासाठी आवश्यक असणारी भांडी खरेदी व्यवहारामध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. केंद्र शासनाने सन 2006-07 या वित्तीय वर्षासाठी 9 कोटी 95 लाख 91 हजार इतके अनुदान राज्य शासनास मंजूर केलेले आहे. केंद्र शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान राज्य शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या 19919 शाळांना प्रति शाळा रुपये 5000/- प्रमाणे भांडी खरेदीसाठी दिनांक 6 मार्च 2007 रोजी दिले. ही सर्व रक्कम 31 मार्च पूर्वी खर्च करायची होती. या खरेदीमध्ये साधारणत: 40-50 टक्के भ्रष्टाचार झालेला आहे. बाजारात जी भांडी 50 रुपयांना मिळत होती ती 100 रुपयाप्रमाणे खरेदी करण्यात आलेली आहेत. म्हणजे दुप्पट रकमेने ही खरेदी करण्यात आलेली आहेत. आपण ग्राम शिक्षण समितीमार्फत सर्व कामे करतो. शाळांचे बांधकाम मुख्याध्यापकांकडून करतो. तेव्हा यापुढे भांडी खरेदीमध्ये भ्रष्टाचार होऊ नये म्हणून भांडी खरेदीचे अधिकार ग्राम शिक्षण समितीला देण्यात येतील काय ? दुसरे म्हणजे निवेदनात म्हटले आहे की, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पवनी, जि.भंडारा यांच्या निलंबनाची कारवाई सुरु आहे. तसेच श्री.अनिल मिश्रा, सहाय्य लेखाधिकारी, सर्व शिक्षा अभियान योजना, वर्धा येथे कार्यरत असून त्यांनी शालेय पोषण आहार योजनेंतर्गत कोणताही गैरव्यवहार केलेला नाही. मात्र सर्व शिक्षा अभियान योजनेंतर्ग खोली बांधकामासंबंधात मुख्याध्यापकांकडून काही रकमेची मागणी केली व रक्कम घेतल्याचे देखील प्रथमदर्शनी दिसून आले. तेव्हा श्री.मिश्रा यांना देखील निलंबित केले जाईल का ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय,शालेय पोषण आहार योजनेंतर्गत अन्न शिजविण्यासाठी आवश्यक असणारी भांडी खरेदी करण्यासाठी केंद्र सरकारकडून राज्य शासनास 9 कोटी 95 लाख 91 हजार इतका निधी मंजूर झालेला आहे. दिनांक 6 मार्च 2007 रोजी शिक्षण संचालक, पुणे यांना शासनाने निधी उपलब्ध करुन दिला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर कु.गायकवाड..........

श्री.हसन मुश्रीफ ....
भांडी खरेदीच्या संदर्भात उद्योग विकास आयुक्त दर करार करीत असतात. या दर कराराप्रमाणे जो दर निश्चित केला जातो आणि त्या दर कराराप्रमाणे सर्व प्राथमिक शिक्षकांना कळविण्यात येते की, प्रत्येक शाळेला 5 हजार रुपये या प्रमाणे त्यांनी ही भांडी घ्यावीत असे आदेश देण्यात आलेले आहेत.

श्री.व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, या पुढे ग्राम समितीकडे भांडी खरेदी करण्याचा व्यवहार देणार का ? पवनीच्या बी.डी.ओ. ला सस्पेंड करणार का ? या प्रकरणात श्री. मिश्रा यांच्या बरोबर अजून कोणी सहभाागी आहेत का ?

**उपसभापती** : पुढच्या वेळी अनुदान मंजूर होईल त्या वेळी या विषयी विचार करण्यात येईल.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, पवनीच्या बी.डी.ओ. वर चार्ज होता, त्यांना सस्पेंड करण्याचा निर्णय घेतला आहे. श्री. अनिल मिश्रा यांच्या संदर्भात चौकशी करुन कारवाई करण्यात येईल.

...............

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुबईतील गोरेगाव येथील आरे कौलनीच्या डेअरी टेक्नॉलॉजी कॉलेजच्या 11 विद्यार्थ्यांना अन्नातून झालेली विषबाधा.

**मु. शी.** : मुबईतील गोरेगाव येथील आरे कौलनीच्या डेअरी टेक्नॉलॉजी कॉलेजच्या 11 विद्यार्थ्यांना अन्नातून झालेली विषबाधा याबाबत ॲड. अनिल परब, सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. हसन मुश्रीफ ( दुग्धविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब, सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर, वि.प.स.. यांनी मुंबईतील गोरेगाव येथील आरे कॉलनीनीतील डेअरी टेक्नॉलॉजी कॉलेजच्या 11 विद्यार्थ्यांना अन्नतून झालेली विषबाधा या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 3...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री संजय केळकर : सभापती महोदय, हे अतिशय गंभीर प्रकरण आहे. न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया या देशामधून अनेक मुले शिक्षण घेण्यासाठी मुंबईत येत असतात. यासर्व मुलांना अन्नातून विषबाधा झालेली आहे. खराब भात खायला दिल्यामुळे ही विषबाधा या मुलांना झालेली हे खरे आहे काय ? सन्माननीय सन्माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरात असे म्हटले आहे की, नऊ विद्यार्थ्यांना गॅस्ट्रायस्टीस व एका विद्यार्थ्यास अनेमियाची बाधा झाल्याचे निष्पन्न झाले. परंतु ही विषबाधा खानावळीतील खराब भात खाल्यामुळे झालेली आहे का ? या संबंधी अनेकदा तक्रारी दाखल झालेल्या आहेत तरी देखील आतापर्यंत याबाबतीत कोठलीही कारवाई झालेली नाही. तेव्हा यासंबंधी शासन दोषी लोकांवर काही कारवाई करणार आहे का ?

श्री हसन मुश्रीफ : सभापती महोदय, गोरेगाव येथील आरे कॉलनीतील डेअरी टेक्नॉलॉजी कॉलेजच्या विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा झाल्याबाबत तक्रार आल्यानंतर दुग्ध विकास आयुक्त यांनी श्री.डी.डी. कुलकर्णी उपआयुक्त, सह आयुक्त प्रशासन श्री. गायकवाड अंतर्गत लेखापरीक्षक श्री. सोनावणे यांची चौकशी समिती नियुक्त केलेली आहे. महानगरपालिकेने अन्नाच्या संदर्भातील नमुने, अन्न भेसळ औषध प्रशासन, महानगरपालिकेने घेतलेले असून या संदर्भात अद्याप अहवाल प्राप्त व्हावयाचा आहे हा अहवाल साधारणत: 16 एप्रिल 2007 पर्यंत प्राप्त होईल अशी अपेक्षा आहे. तेथील एका सुप्रिटेंडंन्टची ताबडतोब बदली केलेली आहे. मुलांना व्यवस्थित जेवण मिळावे यासाठी तेथील मुख्य सुरक्षा अधिकारी श्री. प्राचार्य यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, गॅस्ट्रायस्टीस हा रोग कशामुळे होतो याची माननीय मंत्री महोदयांना माहीती असेल .या ठिकाणच्या मेसचे कॉंट्रेक्ट महिला बचत गटाला देण्यात आलेले होते. टेंडर महिला बचत गटाला मिळाले पण ॲग्रीमेंट श्रीमती पुष्पलता जयप्रकाश अधिकारी यांना मिळाले.खरे म्हणजे महिला बचत गटाच्या नावाने ॲग्रीमेंट झाले पाहिजे. महिला बचत गटाच्या नावाने ॲग्रीमेंट न झाल्यामुळे यासंदर्भातील सर्व चेक्स श्रीमती पुष्पलता जयप्रकाश अधिकारी यांच्या नावाने जातात. टेंडर महिला बचत गटाला दिले जाते आणि पेमेंट दुसऱ्याच व्यक्तीला दिले जाते. श्रीमती पुष्पलता जयप्रकाश अधिकारी यांच्या नावाने जे ॲग्रीमेंट आहे ते रद्द करणार का ?

....4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हा विषय सुध्दा या चौकशी समितीकडे देण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, टेंडर बचत गटाच्या नावाने काढले जाते आणि पेमेंट मात्र दुसऱ्याच व्यक्तीला दिले जाते. यासंदर्भात आमच्याकडे पुरावे आहे. त्यामुळे या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी त्वरीत कारवाई केली पाहिजे.

यानंतर श्री. रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...........

सभापती महोदय, माझा एवढाच प्रश्न आहे की, विषयबाधा झाली आहे की नाही आणि झाली असेल तर संबंधितांवर कारवाई करणार की नाही ?

**उपसभापती** : या प्रकरणी चौकशी करावी व अधिवेशन संपण्यापूर्वी शासनाने निवेदन करावे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, होय.

-------------

..2...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 च्या सूचनांवरील निवेदनाबाबत**

श्री.गणेश नाईक (कामगार मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 च्या सूचनांवरील निवेदन मला करावयाचे आहे व त्यासाठी मी सकाळपासून सभागृहात बसलो आहे. परंतु, अद्याप ते पुकारले गेले नाही.

**उपसभापती** : सभापती महोदयांनी नियम 93 च्या सूचनेवरील चार निवेदने माझ्याकडे दिली होती त्याप्रमाणे मी ती पुकारली आहेत. बाकीची निवेदने उद्या घेण्यात येतील.

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, आम्हाला आपल्या कार्यालयाकडून सूचित केल्याप्रमाणे नियम 93 च्या दोन सूचनांवरील निवेदनांवर उत्तर देण्यासाठी मी सकाळपासून सभागृहात बसलो आहे. एवढा वेळ थांबून आता ही निवेदन उद्या घेतली तर आमचा वेळ वाया गेल्यासारखे होईल व त्यामुळे आमच्यावर अन्याय होईल.

**उपसभापती** : सभापतीस्थानी मी आसनस्थ झाल्यानंतर माझ्याकडे नियम 93 अन्वये सूचनेची चार निवेदने देण्यात आली होती व ती सगळी मी पुकारली आहेत. अन्य निवेदने आपण उद्या घेऊ. तरी देखील आपण आता जे सांगितले आहे त्याबाबत मी चौकशी करतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मागेही असे झाले आहे की, मंत्री महोदयांकडे 14 निवेदने होती परंतु सन्माननीय सदस्यांना केवळ 10 निवेदनेच वितरीत करण्यात आली होती.

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, आज हे निवेदन झाले असते तर बरे झाले असते. तरी देखील माझी अशी विनंती आहे की, उद्या माझ्या विभागाचे सभागृहात कामकाज नाही त्यामुळे ही निवेदने परवा ठेवावीत.

--------------

..3........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृहाच्या कामकाजाबाबत**

**उपसभापती** : माननीय सभापतींच्या निदेशानुसार आजच्या कार्यक्रम पत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या दोन शासकीय विधेयकांपैकी सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 11-महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक यावर चर्चा होईल. दुसरे सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 73-महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे विनियमन करण्याबाबत)(सुधारणा) विधेयक पुढे ढकलण्यात आले आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, दुसरे विधेयक पुढे ढकलण्यात आले आहे, असे आपण सांगितले. मला त्यासंबंधी बोलायचे आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, नियम 260 अन्वये विरोधी पक्षाने शेती व शेतक-यांच्या विविध समस्यांबाबत जो प्रस्ताव दिलेला आहे, तो आज चर्चेला घेण्यात येईल का ?

**उपसभापती** : होय.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मला बोलायचे आहे, मला परवानगी द्यावी.

**उपसभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.45 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 3.08 ते 3.45 मध्यंतर)

---------------

यानंतर कुमारी जयश्री..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>मध्यंतरानंतर</u>**

**<u>सभापतीस्थानी माननीय उपसभापती</u>**

**पृ.शी.**: मुंबई / ठाणे,शिधावाटप दुकानांमार्फत खुला बाजार विक्री योजनेअंतर्गत होणा-या गव्हाच्या विक्रीबाबत

**मु.शी.**: मुंबई / ठाणे,शिधावाटप दुकानांमार्फत खुला बाजार विक्री योजनेअंतर्गत होणा-या गव्हाच्या विक्रीसंबंधी माननीय अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे निवेदन

श्री. सुनील तटकरे ( अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :--

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, हा विषय मी यापूर्वी देखील औचित्याच्या मुद्दयाद्वारे उपस्थित केला होता. देर आये मगर दुरुस्त आये माननीय मंत्रिमहोदयांनी सदर बाबीसंबंधात तातडीने कारवाई करण्याचा निर्णय घेतला याबद्दल मी त्यांचे या ठिकाणी आभार मानतो.

**उपसभापती** : आपण माननीय मंत्रिमहोदयांचे आभार मानता आणि मी आपल्याला सदर मुद्दा या सभागृहामध्ये उपस्थित करण्याची संधी दिली पण आपण माझे कधीही आभार मानत नाहीत.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मी आपला तर सतत आभारीच आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, शासनातर्फे यावर केली जाणारी कारवाई कधी पूर्ण होणार आहे ?

**उपसभापती** : केंद्रीय अन्न प्रयोगशाळा,पुणे यांचेकडून अहवाल आल्यावर कारवाई पूर्ण होईल.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यात ग्रामीण व शहरी भागातील घसरत चाललेला शिक्षणाचा दर्जा

**मु.शी.**: राज्यात ग्रामीण व शहरी भागातील घसरत चाललेला शिक्षणाचा दर्जा यासंबंधी प्रा.फौजिया खान,सर्वश्री सदाशिवराव पोळ,जितेंद्र आव्हाड,वसंत चव्हाण,वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा.फौजिया खान ( नामनियुक्त ) : अध्यक्ष महोदय,मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शिक्षणमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आण त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

" परभणी जिल्हयात ग्रामीण भागातील अनेक केंद्रांवर यंदा शहराच्या तुलनेत मोठया संख्येने बारावीचे विद्यार्थी परीक्षा देत असणे, सर्व सोयींनी युक्त व सुरक्षित असलेलया शाळा महाविद्यालयातील परीक्षा केंद्रांना जिल्हा शिक्षण विभागाच्या शिफारशीनुसार विभागीय मंडळ परवानगी देत असणे,परंतु या नियमांची पायमल्ली करीत शहराच्या आजूबाजूस असलेल्या अनेक शैक्षणिक संस्थांनी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयास ग्रामीण भागाचा दर्जा प्राप्त करुन घेणे,त्या नावाखाली बारावीची परीक्षा केंद्रे मिळविणे,मोठया शहरातून आलेल्या विद्यार्थ्यांनी हजारो रुपये मोजून अशा ठिकाणी प्रवेश घेतलेला असणे,यामुळे शहरापेक्षा ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा वाढण्याबाबत प्रश्न निर्माण होणे,दरम्यान लातूर जिल्हयातील हालकी ( ता.शिरुर ) येथील परीक्षा केंद्रावर दिनांक 25 फेब्रुवारी,2007 रोजी पेपर सुरु होण्याआधीच त्याची उत्तरे विद्यार्थ्यांकडे असणे, त्या विद्यार्थ्यांनी याबाबत कबुली दिलेली असणे, यामागे मोठे रॅकेट असण्याची शक्यता,पैशाच्या जोरावर असे प्रकार होत असल्याने होतकरु गरीब विद्यार्थ्यांवर होत असलेला अन्या,शासनाचे या प्रकारांकडे होत असलेले दुर्लक्ष,परिणामी लोकांमध्ये निर्माण झालेली चिडीची भावना,याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रक्रिया "

प्रा.वसंत पूरके ( शालेय शिक्षण मंत्री ) : अध्यक्ष महाराज,लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

यानंतर श्री.बोरले............

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, आज तक हम सुनते आए हैं कि लोग बड़े बड़े देशों में, परदेश में शिक्षण के लिए जाते हैं, लेकिन यहां पर उल्टी बात हो रही है. बड़े बड़े शहरों से छोटे गांव के एक्जामिनेशन सेन्टर्स की तरफ आकर्षित होकर वहां पर परीक्षा देना चाहते हैं. यह आश्चर्य की बात नहीं तो और क्या है ? मैं माननीय मंत्री महोदय से पूछना चाहती हूँ कि इन सेन्टर्स में रिजल्ट कैसे निकलता है, क्या उन्होंने इस बात का विश्लेषण किया है. यहां पर निश्चित रुप से "दाल में काला" है. इन सेन्टर्स पर भ्रष्टाचार सिद्ध हो रहा है, इसलिए क्या मंत्री महोदय इन सेन्टर्स को बंद करेंगे ? मेरा दूसरा प्रश्न यह है कि इन सेन्टर्स से परीक्षा देने की वजह यह है कि ये लोग डी.एड. में प्रवेश लेना चाहते हैं. इसलिए क्या मंत्री महोदय डी.एड. में प्रवेश के लिए सी.ई.टी. की परीक्षा लेंगे ?

प्रा.वसंत पुरके : सन्माननीय सदस्या श्रीमती फौजीया खान यांनी तीन प्रश्न विचारलेले आहेत. विद्यार्थ्यांनी त्या शाळेमध्ये प्रवेश घेतलेला नाही, शाळेमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती नाही, विद्यार्थ्यांना शाळेचे नाव माहीत नाही, विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे चेहरे बघितलेले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. अशा अवस्थेमध्ये ग्रामीण भागातील परीक्षा केंद्रांची संख्या वाढत आहे. परभणी जिल्यातील 33 परीक्षा केंद्रांपैकी 25 परीक्षा केंद्र ग्रामीण भागातील आहेत. यामध्ये लातूर जिल्हयातील हालकी तालुका शिरुर येथील जयभवानी कनिष्ठ महाविद्यालयामध्ये मुलांनी प्रवेशच घेतलेला नव्हता. त्या ठिकाणी विद्यार्थ्यांना वाममार्गाने परीक्षेसाठी बसविण्यात आले होते. या ठिकाणी बाहेरच्या राज्यातील मुले देखील परीक्षेसाठी बसलेली होती, ही अतिशय लाजिरवाणी बाब आहे. मुलांना येथे प्रवेश कसा मिळाला याची चौकशी करुन मुख्याध्यापकांना निलंबित करण्यात आलेले आहे. श्री.एस.डी.बोधने व श्री.रेड्डी हे संबंधित संस्थेचे कर्मचारी असल्याने त्यांना निलंबित करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सन्माननीय सदस्या श्रीमती फौजीया खान यांनी दुसरा प्रश्न हे सेंटर बंद करण्यासंदर्भात विचारलेला आहे. कायदेशीर बाब लक्षात घेऊन कलम 7(1), 7(2) किंवा 7(3) ची कारवाई निचितपणे करण्यात येईल. नैसर्गिक न्यायानुसार त्यांना थोडासा वेळ देणे आवश्यक आहे. नाही तर ते कोर्टामध्ये जाऊन स्टे आणतील, असे होऊ नये. हे सेंटर बंद करण्यासंदर्भात आम्ही पत्र व्यवहार सुरु केलेला आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती फौजीया खान यांनी तिसरा प्रश्न डी.एड्.

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके ......

परीक्षेसंदर्भात विचारलेला आहे. मुलांनी डी.एड्. साठी प्रवेश घ्यावयाचा, पैसे भरावयाचे आणि निकाल हातामध्ये घ्यावयाचा, अशा प्रकारचे हे अनफेअरमिन्स बंद व्हावेत म्हणून सी.ई.टी. लागू करावी किंवा कसे यासंदर्भात प्रश्न विचारण्यात आलेला आहे त्यासंदर्भात देखील शासन निश्चितपणे गांभीर्याने विचार करेल.

श्री.सुरेशदादा देशमुख : सभापती महोदय, ज्या ठिकाणी असे प्रकार घडले आणि जे सेंटर बंद करण्यात आलेले आहे त्यांना पुन्हा परवानगी देण्यात येऊ नये. त्या सेंटरची नावे माननीय मंत्री महोदय ताबडतोब ब्लॅक लिस्टमध्ये टाकतील काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, शासनाचा असा मानस आहे की, ज्या प्रमाणे शाळांचा मास्टर प्लॅन तयार केला जातो त्याच प्रमाणे परीक्षा केंद्रांचा देखील बृहत आराखडा तयार केला गेला पाहिजे. जे सेंटर बंद करण्यात आले आहेत ते पुन्हा सुरु होणार नाहीत, याची काळजी घेण्यात येईल. मागच्या वर्षी असेच एक सेंटर बंद करण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी 8 तासात कोर्टातून स्टे आणला होता. जे बोगस सेंटर आहेत ते निश्चितपणे बंद करण्यात येतील.

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, भरारी पथके परीक्षा केंद्रांना भेटी देत असतात. सर्व परीक्षा केंद्रांना भरारी पथके भेट देऊ शकत नाहीत. माझा पहिला प्रश्न असा आहे की, सर्व परीक्षा केंद्रांची तपासणी करण्यासाठी शासन स्वतंत्र यंत्रणा निर्माण करणार आहे काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, ज्याप्रमाणे निवडणुकीमध्ये वेगळया प्रकारे रेकॉर्डींग केले जाते त्याप्रमाणे अशा परीक्षा केंद्रांवर रेकॉर्डींगची व्यवस्था केली पाहीजे. शासन रेकॉर्डींगची व्यवस्था करणार आहे काय ? माझा तिसरा प्रश्न असा आहे की, सी.ई.टी.च्या संदर्भात गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. कारण ग्रामीण भागातील शाळांमध्ये मिळणा-या शिक्षणामध्ये आणि शहरी भागातील शाळांमध्ये मिळणा-या शिक्षणामध्ये फरक आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांवर, मागास भागातील विद्यार्थ्यांवर स्पर्धेमध्ये येत असतांना अन्याय होणार याची देखील तपासणी करावी लागेल. अभ्यास करणा-या विद्यार्थ्यांवर अशा परीक्षा केंद्रामुळे अन्याय होतो. कोणत्याही दबावाला बळी न पडता अशा परीक्षा केंद्रांची चौकशी करुन शासन ते बंद करणार आहे काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांचा पहिला प्रश्न जे बोगस सेंटर आहेत त्यांना शिस्त लावण्यासाठी शासन स्वतंत्र यंत्रणा निर्माण

..3....

प्रा.वसंत पुरके .......

करण्यासंदर्भात आहे. शिक्षक बांधवांचीच स्वतंत्र यंत्रणा आहे. ही यंत्रणाच प्रामाणिकपणे काम करु शकते. शिक्षकांना विश्वासात घेऊन स्वतंत्र यंत्रणा कशी राबविता येईल, यासंदर्भात विचार करण्यात येईल. आम्ही परीक्षा केंद्रांवर कॅमेरे सुध्दा लावण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु स्वतंत्र रेकॉर्डींग करण्यासाठी मायक्रो कॅमेरे कसे लावता येतील, याचा देखील निश्चितपणे विचार केला जाईल.

(यानंतर श्री.गागरे ........

अप्रधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके .....

ग्रामीण भागातील मुलांवर अन्याय होणार नाही. तसेच मेरीटच्या मुलांवर अन्याय होणार नाही याची काळजी घेऊन सी.ई.टी.बाबत गांभीर्याने चर्चा केली जाईल व त्यानंतर निर्णय घेण्यात येईल.

श्री.धोंडीराम राठोड : सभापती महोदय, या विषयाबाबत मी मागील वर्षी माननीय शिक्षण मंत्री महोदयांना आणि संबंधित खात्याच्या सचिवांना पत्र दिले होते की, शासन मागेल त्याला शाळा-कॉलेज, मागेल त्या परीक्षा केंद्र देत आहे, ते आपण बंद करणार आहात का ? काही शाळा महाविद्यालयात विद्यार्थ्यांना प्रवेश देताना त्यांच्याशी कॉन्ट्रक्ट केले जाते की, तुला प्रवेश देतो, तुला पास करुन देण्याची हमीसुध्दा घेतो. हयाच बेसवर बहुतेक मुले हे ज्या परीक्षा केंद्रावर असे गैरप्रकार चालतात किंवा गुत्ते घेण्याचे प्रकार चालतात तेथे प्रवेश घेतात आणि गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांवर त्याचा अनिष्ट परिणाम होतो. केवळ चांगले निकाल लावून देणे व त्या मुलांना चांगले मार्कस मिळवून देणे एवढयासाठीच ही परीक्षा केंद्रे घेतली जातात. अशी परीक्षा केंद्र देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर आपण कारवाई करणार आहात काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, अशा प्रकारची परीक्षा केंद्रे बंद करावयाची असतील तर लोकप्रतिनिधींचीही शासनाला मदत मिळणे अपेक्षित आहे. शासन जेव्हा नियमाप्रमाणे परीक्षा केंद्र देण्याचे काम करीत असते, तेव्हा नियम डावलून परीक्षा केंद्र देण्याबाबत अनेक लोकांच्या शिफारसी येत असतात. परंतु आता मी सांगू इच्छितो की, यानंतर कोणाच्याही शिफारसीने परीक्षा केंद्र दिले जाणार नाही. जेथे आवश्यकता आहे, अत्यंत निकड आहे अशा ठिकाणी परीक्षा केंद्र दिले जाईल. शासन कोणाच्याही दबावाला बळी पडणार नाही.

श्री.धोंडीराम राठोड : सभापती महोदय, यापूर्वी चुकीच्या ठिकाणी परीक्षा केंद्र दिले असेल तर संबंधित अधिकाऱ्यांवर शासन कोणती कारवाई करणार ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, चुकीच्या पध्दतीने परीक्षा केंद्र दिले गेले असेल तर संबंधित अधिकाऱ्यावर निश्चित कारवाई केली जाईल.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, मंत्री महोदय ने यहां पर बताया कि डी.एड. में प्रवेश के लिए सी.ई.टी. लेने के बारे में गंभीरता से विचार करेंगे. मैं इस बात का आग्रह करना चाहती हूँ कि ये लोग भावी पीढ़ी को तैयार करने का काम करते हैं, इसलिए इनका दर्जा ऊंचा होना चाहिए, चाहे भले ही किसी के साथ इन्साफ हो या न हो. इसलिए क्या माननीय मंत्री

. . . LL 2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान . . .

महोदय बी.एड. में प्रवेश के लिए सी.ई.टी. लेने के बारे में पॉलिसी डिक्लरेशन करेंगे ? मेरा दूसरा प्रश्न यह है कि डी.एड. करने के बाद आप उनको शिक्षण सेवक के रुप में अपाइंट करते हैं और . . .

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, लक्षवेधी सूचनेवर प्रश्न विचारताना नेमका प्रश्न विचारायचा असतो, मोठे भाषण करायचे नसते. नाहीतर मुळ प्रश्न बाजूला पडतो.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, मैं केवल प्रश्न पूछ रही हूँ. मेरा दूसरा प्रश्न यह है कि डी.एड. करने के बाद आप उनको शिक्षण सेवक के रुप में अपाइंट करते हैं और 3 साल के बाद आप उनकी नियुक्ति शिक्षक के रुप में करते हैं. उस समय क्या आप उनको डी.एड. के आधार पर सीनियरिटी देंगे, क्या आप उसकी परीक्षा लेंगे या उसके 3 साल के परफोरमेंस के आधार पर परमानेंट करेंगे ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न विचारला आहे. सीईटी लागू करताना साकल्याने विचार केला जाईल. तीन वर्ष झाल्यानंतर पुन्हा परीक्षा घ्यायची किंवा कसे याचाही विचार केला जाईल. शिक्षण विभागाच्या बाबतीत असे झाले आहे की, कोणताही निर्णय घेतला तरी सर्व सभागृह अंगावर येऊन पडते. म्हणून याबाबत निर्णय घेताना शासन गांभीर्याने विचार करील. हा निर्णय घेताना कोणाला दुखावले जाणार नाही, डावलले जाणार नाही याचा विचार केला जाईल.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, शाळा महाविद्यालयात वर्षभर विद्यार्थी उपस्थित राहतात किंवा नाही हे पाहिले पाहिजे. विद्यार्थ्यांची किमान उपस्थिती पाहण्यासाठी हजेरीपट पाहणार आहात काय ? किंवा नेमके परीक्षेच्या वेळी हजेरीपट तपासून विद्यार्थ्यांना प्रवेश देणार आहात ? कारण काही मुले वर्षभर वर्गात उपस्थित राहत नाहीत, परंतु नेमकी परीक्षेला बसविली जातात. याबाबत आपण काय निर्णय घेणार आहात ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, कोणतीही शाळा म्हटली की त्यामध्ये इमारत, क्लॉलीफाईड स्टाफ, लॅबोरेटरी, लायब्ररी, उपस्थिती, इनरोलमेंट, परीक्षा या सर्व बाबी नियमाप्रमाणे येतात. या बाबी डावलून कोणी गैरप्रकार करीत असेल तर त्यांच्यावर निश्चितपणे कडक कारवाई करण्यात येईल. परंतु हे निदर्शनास येणे गरजेचे आहे. . . . LL 3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, महाविद्यालयात 11 वी किंवा 12 वी वर्गात विद्यार्थ्यांना प्रवेश देताना वरीष्ठ महाविद्यालयास जोडून असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये 100 पर्यत विद्यार्थीसंख्या असू शकते. परंतु शाळेला जोडून कनिष्ठ महाविद्यालय असेल तर 80 विद्यार्थीही पुरसे आहेत, असा नियम आहे. याबाबत मी वर्धा जिल्हयातील कारंजा तालुक्यातील ठाणेगाव येथील नवप्रभात विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे उदाहरण देऊ इच्छितो. या ठिकाणी 114 विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी डयेप्युटरी डायरेक्टर ऑफ एज्युकेशन यांनी परवानगी दिली आणि यातील सात विद्यार्थ्यांचे प्रत्येकी 15 ते 20 हजार प्रत्येकी घेतले. मी बोर्ड मेंबर म्हणून भेट द्यावयास गेलो तेव्हा तेथील विद्यार्थ्यांची मते जाणून घेतली.

नंतर श्री.सुंबरे.....

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. डायगव्हाणे ....

उमरेडचे विद्यार्थी देखील वर्ध्याला होते. तेव्हा मी त्यांना विचारले की, तुम्ही तेथे जाणे-येणे करीत होता का ? त्यावर त्यांनी सांगितले की, आम्ही प्रवेश घेतानाच एकदर 15 हजार रूपये दिले आहेत आणि ते उत्तीर्ण होण्याच्या हमीवर दिलेले आहेत. तेव्हा अशा प्रकारे तेथे व्यवहार चालतो आहे. याबद्दल नवप्रभात विद्यामंदिर कनिष्ठ महाविद्यालय, तालुका कारंजा, जिल्हा वर्धा या शाळेच्या प्राचार्यांना आणि ज्या डेप्युटी डायरेक्टरने हे कनिष्ठ महाविद्यालय मान्य केले त्या दोघांवर देखील आपण कारवाई करणार काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, याही कॉलेजमध्ये 179 विद्यार्थी होते आणि म्हणून ज्या लोकांनी अशा प्रकारे वाम मार्गाने प्रवेश दिले आहेत त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई आपण करू.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, डी.एड.साठी सीइटी व्हावी यासाठी आपण आमदारांची समिती स्थापन करणार का ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, यात आमदारांचा सहभाग असला तरी तज्ज्ञांची समिती गठित आपण करू आणि नंतरच याबाबत निर्णय घेऊ.

श्री. जी.एल.ऐनापुरे : सभापती महोदय, सध्याची परीक्षा पद्धती आणि आता ज्या विषयावर चर्चा चालू आहे तो प्रश्न अनएंडिंग असाच आहे. त्याला अंत नाही. कॉपी होणे ही केव्हाही न संपणारी गोष्ट आहे. ती होतच राहणार आहे. म्हणूनच या संदर्भात प्रगत देशांनी जी नवीन परीक्षा पद्धती स्वीकारली आहे ती आपण येथे स्वीकारणार आहात काय ? ती पद्धत म्हणजे निरंतर परीक्षा घेतली जाते, वार्षिक परीक्षा तेथे घेतली जात नाही. असे काही केले तरच यामध्ये काही फरक पडू शकेल. अन्यथा गुन्हेगार हे आपल्यापेक्षा प्रगत आहेत हे आपण लक्षात घ्यावे. तेव्हा असा अभ्यास करण्यासाठी समिती किंवा धोरण आपण अवलंबिणार आहात का ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.ऐनापुरे यांच्या सूचनेचा निश्चितपणे आदर केला जाईल.

***

...... एमएम 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कार्यक्रम पत्रिकेवरील लक्षवेधी सूचना क्र. 2 बाबत**

**उपसभापती** : आजच्या कार्यक्रम पत्रिकेवरील लक्षवेधी सूचना क्रमांक 2 ही पुढे ढकलण्यात आली आहे. त्यामुळे ती नंतर घेतली जाईल.

श्री. धोंडीराम राठोड : सभापती महोदय, आता हे अधिवेशन संपण्यास काही दिवसांचाच अवधी राहिलेला आहे. तेव्हा ही लक्षवेधी सूचना उद्या घेतली जाईल काय ?

**उपसभापती** : मी तसे संबंधितांना सांगतो. आता यानंतर क्रमांक 3 वरील लक्षवेधी सूचना चर्चेला घेतली जाईल.

***

....... एमएम 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : विद्युत (पनामा) मेटॅलिक्स लि.,ठाणे या कंपनीतील कामगार संघटनेतील काही पदाधिकाऱ्यांची बोगस राजीनामापत्रे सादर केली जाणे.

मु.शी. : विद्युत (पनामा) मेटॅलिक्स लि.,ठाणे या कंपनीतील कामगार संघटनेतील काही पदाधिकाऱ्यांची बोगस राजीनामापत्रे सादर केली जाणे या संबंधात संबंधी सर्वश्री जितेंद्र आव्हाड, लक्ष्मण जगताप, राजेंद्र जैन, भास्कर जाधव, सदाशिवराव पोळ, जगन्नाथ शेवाळे, वसंतराव चव्हाण, श्रीमती फौजिया खान, श्रीमती मंदा म्हात्रे, वि.प.स. यां□ दिलेली ल□वेधी सूच□

--

श्री. जितेंद्र आव्हाड (नामनियुक्त) : अध्य□ महोदय, मी □□म 101 अ□ये पुढील तातडीच्या व सार्वज□□ महत्वाच्या बाबी□डे आपल्या अ□मती□ स□□□ीय उप मुख्यमंत्र्यांचे ल□ वेधू इच्छितो आ□ त्याबाबत त्यां□ □□द□ □रावे अशी वि□ती □रतो.

" ठाणे येथील विद्युत (पनामा) मेटॅलिक्स लि. या कंपनीतील विद्युत मेटॅलिक्स एम्प्लॉईज युनियन या कामगार संघटनेने काही पदाधिकाऱ्यांचे बोगस राजीनामापत्रे सादर केल्याप्रकरणी वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात दिनांक 15 फेब्रुवारी 2007 रोजी तक्रार दाखल करूनही संबंधितांवर कारवाई करण्यास पोलिसांकडून होत असलेली दिरंगाई., सद्य:स्थितीत कंपनीत कार्यरत असलेल्या कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी कामगारांसंदर्भात नेहमीच घेतलेली अन्यायी भूमिका, त्यास संबंधित पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे असलेले गैरवाजवी संरक्षण, त्यामुळे कंपनीमध्ये असलेले दहशतीचे वातावरण, कामगारांनी दिनांक 31 मार्च 2007 रोजी केलेले उपोषण, सदर प्रकरणी मा. पोलीस आयुक्त, ठाणे तसेच सर्व संबंधितांकडे अलिकडील काळात वेळोवेळी तक्रारी करूनही कारवाई करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी कामगारांमध्ये पसरलेला असंतोष, संताप सदर गंभीर प्रकरणी उच्च स्तरीय सखोल चौकशी करून कारवाई करण्याची अत्यावश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली वाकरावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया. "

श्री.सिद्धाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : अध्य□ महाराज, ल□वेधी सूच□संबंधीच्या □□द□च्या प्रती मा□□ीय सदस्यां□ आधीच वितरीत □ल्या असल्यामुळे मी ते □□द□ आपल्या अ□मती□ सभा□हाच्या पटलावर ठवतो.

**उपसभापती** : □□द□ सभा□हाच्या पटलावर ठेव□यांत आले आहे.

<u>□□द□</u>

( प्रेस : येथे सोबतचे □□द□ छापावे )

...... एमएम 4 ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

( लक्षवेधी सुचनेवरील मा.गृहराज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, या ठिकाणी केलेल्या निवेदनावरून या प्रकरणी पोलिसांनी केलेली दिरंगाई, पोलिसांनी मॅनेजमेंटशी केलेली हातमिळवणी आणि त्यामुळे गुन्हेगारांना मिळालेले संरक्षण स्पष्ट होत आहे. सभापती महोदय, 8.12.2006 रोजी फिर्यादी आणि साक्षीदार यांनी पोलीस ठाण्यामध्ये तक्रार केली परंतु सदर तक्रार पोलिसांनी 15.2.2007 ला रजिस्टर केली म्हणजे जवळपास 67 दिवसांनंतर तक्रार रजिस्टर झाली. त्यानंतर 3 आरोपींना अटक केली पण मॅनेजमेंटच्या माणसांना अटक केली गेली नाही आणि ते रोज कामावर जात असताना देखील त्यांना अटक न करता त्यांना बेल कसा मिळेल हेच पाहिले गेले. त्यातील श्री.शशिकांत शिंदे हे कामगार पुढारी अगदी पहिल्या दिवसापासून पोलीस ठाण्याजवळ फिरत असताना देखील त्यांना फरार दाखवून अटक केलेली नाही. सभापती महोदय, पर्सोनपेल मॅनेजरचा राजीनामा घेण्याची देखील एक पद्धत आहे. पण ती पद्धत न अवलंबिता सहीचा कागद सबमिट केला गेला. तसेच दुसऱ्या युनियनकडे असलेल्या कोऱ्या कागदांवरील सह्यांचा फायदा घेऊन त्या आधारे बोगस राजीनामापत्रे सादर केली गेली. सभापती महोदय, हे एकंदर प्रकरण पाहता श्री.शशिकांत शिंदे यांना मिळालेला आश्रय आणि पोलिसांनी एकूणच प्रकरणामध्ये दाखविलेली उदासिनता आणि केलेली दिरंगाई त्यामुळे त्यांना मिळालेला इंटेरिम बेल रद्द करण्याच्या दृष्टीने शासन पावले टाकणार आहे काय ? तसेच या संपूर्ण प्रकरणामध्ये पोलिसांनी जी अक्षम्य दिरंगाई केलेली आहे ती लक्षात घेऊन या प्रकरणी केल्या गेलेल्या पोलीस तपासाची तसेच एकूणच प्रकरणाची चौकशी सीआयडीकडे आपण सुपूर्द करणार काय ?

( यानंतर श्री. सरफरे ..... एनएन 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे 8.12.2006 ला तक्रार करण्यात आली. त्यावेळी त्यांनी औद्योगिक न्यायालय, ठाणे यांच्याकडे अर्ज केला होता. त्या अर्जाची छाननी न्यायालयामार्फत चालू होती...

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. पोलीस स्टेशनला तक्रार केली आणि औद्योगिक न्यायालयामध्ये अर्ज केला याचा अर्थाअर्थी संबंध नाही. मी स्वत: लेबर लॉ या विषयामध्ये एम.एम.एस. केले आहे. मी स्वत: एक कंपनीमध्ये पर्सनल ऑफिसर म्हणून काम केले आहे. कोणत्याही लेबर कोर्टाचा राजीनाम्याशी संबंध नसतो. पोलिसांकडे एफ.आय.आर. केव्हा आला? औद्योगिक न्यायालयाने 15.2.2007 ला त्या कामगारांना काढून टाकावे म्हणून निकाल दिला काय? औद्योगिक न्यायालयाचा एफ.आय.आर. शी संबंध येत नाही.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी तेच सांगत आहे. दि.8.12.2006 ला पहिली तक्रार करण्यात आली, त्यावेळी त्याची नोंद करावयास पाहिजे होती. परंतु ते कामगार औद्योगिक न्यायालयामध्ये गेले. त्या कामगारांच्या कोऱ्या कागदावर घेण्यात आलेल्या सह्या आणि राजीनामा दिलेल्या सह्यांचे अक्षर व्हेरिफाय करण्यास वेळ लागला. ते अर्ज हस्ताक्षर तज्ज्ञांकडे पाठविण्यात आले असून त्यांच्याकडून अहवाल येईपर्यंत त्यासंबंधी निर्णय होणार नाही. या प्रकरणामध्ये उशीर झ ाला आहे हे खरे आहे. माननीय सदस्यांनी सी.आय.डी. चौकशीची मागणी केली. या प्रकरणामध्ये पोलिसांनी योग्य प्रकारे तपास केलेला नाही असे जर आपणास वाटत असेल तर संबंधित प्रकरणाची सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्यात येईल.

----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : कायम विना अनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या काही शाळांना अनुदान देऊन भेदभाव निर्माण करणे

मु.शी. : कायम विना अनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या काही शाळांना अनुदान देऊन भेदभाव निर्माण करणे यासंबंधी सर्वश्री. रामनाथ मोते, संजय केळकर, श्रीकांत जोशी, प्रतापराव सोनवणे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, प्रतापसिंह मोहिते-पाटील, संजय दत्त, सुधाकर गणगणे, धनाजी साठे, राजन तेली, रमेश निकोसे, गोविंदराव आदिक, कपिल पाटील, शरद पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"महाराष्ट्रात मराठी माध्यमाच्या नवीन शाळांना (प्राथमिक माध्यमिक/उच्च माध्यमिक) परवानगी देताना जबरदस्तीने शाळा कायम विनाअनुदानावर चालविण्यास तयार असल्याचे हमीपत्र लिहून घेणे, नवीन माध्यमिक शाळांना कायम विना अनुदानावर मान्यता देण्याचा धोरणात्मक निर्णय २४ नोव्हेंबर, २००१ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेणे, त्यापूर्वी मान्यता दिलेल्या शाळांनाही कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता देऊन अनुदानापासून वंचित ठेवणे, काही शाळांना विनाअनुदान तत्वावर मान्यता देऊन भेदभाव करणे, कायम विनाअनुदानावर मान्यता देण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यापूर्वी मान्यताप्राप्त शाळांना अनुदान न देणे, ग्रामीण, दुर्गम, आदिवासी व दुर्गम भागातही कायम विनाअनुदानीत शाळांना परवानगी देणे, विनाअनुदान तत्वावर शाळांना मान्यता देण्यासंबंधी प्रकटन देऊन कायम विना अनुदानावर मान्यता देणे, कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या काही शाळांना अनुदान देऊन भेदभाव निर्माण करणे, या संबंधी कृती समितीने आझाद मैदानावर उपोषण करणे, प्राथमिक शिक्षण ही शासनाची जबाबदारी असूनही प्राथमिक शाळांनाही अनुदानापासून वंचित ठेवणे, याबाबत शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेला प्रचंड असंतोष, विना अनुदानीत कृती समितीने दिलेला आंदोलनाचा इशारा, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व शासनाने करावयाची कार्यवाही."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MHM/ SBT/

श्री. हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनांसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, महाराष्ट्रातील शाळांच्या अनुदानासंदर्भात हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. या विषयावरील चर्चेकरिता आपण थोडा अधिक वेळ द्यावा आणि या प्रश्नासाठी आपले संरक्षण आम्हाला मिळावे अशी मी आपणास विनंती करतो. महाराष्ट्रामध्ये कायम विना अनुदान तत्वावर शाळांना मान्यता देण्याचे शासनाने धोरण स्वीकारले आहे. निवेदनामध्ये शासनाने स्पष्टपणे कबूल केले आहे की, कायम स्वरुपी विना अनुदान तत्वावर शाळांना मान्यता देण्याचा निर्णय 24 नोव्हेंबर 2001 रोजी झाला आहे. याचा अर्थ असा की, मंत्रिमंडळामार्फत हा निर्णय झाला असला तरी या निर्णयापूर्वी कायम विना अनुदान तत्वावर शिक्षण संस्थांना मान्यता देण्यासंबंधी मंत्रिमंडळाचा निर्णय नव्हता, किंवा शासनाचे असे कोणतेही धोरण नव्हते. त्यामुळे 25 नोव्हेंबर 2001 पूर्वी शासनाने शाळांना मान्यता देतांना भेदभाव केला. यामध्ये काही शाळांना विना अनुदान तत्वावर मान्यता दिली त्या शाळा आज अनुदानावर आल्या. आणि काही शाळांना कायम विना अनुदान तत्वावर मान्यता दिली त्या अद्यापि अनुदानावर आल्या नाहीत. भविष्यात त्यांना अनुदान मिळण्याची शक्यता कमी आहे. म्हणून प्रश्न असा आहे की, 24 नोव्हेंबर 2001 पूर्वीच्या धोरणाप्रमाणे शासनाने कायम विना अनुदान तत्वावर शाळांना मान्यता दिली अशा सर्व शाळांना शासनाच्या मूल्यांकनानुसार अनुदान मंजूर करण्यात येईल काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, 24 नोव्हेंबर 2001 रोजी मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्याची वित्तीय व्यवस्था सुधारण्यासाठी आपण कायम विना अनुदान तत्वावर शाळांना मान्यता देण्याचा निर्णय घेतला. 2001 पूर्वी सुध्दा काही शाळांना कायम विना अनुदान तत्वावर मान्यता दिली आहे. त्यावेळी त्यांनी कोणतेही अनुदान घ्यायचे नाही अशाप्रकारचे ॲफिडेव्हिट त्यांच्याकडून करुन घेण्यात आले. या तत्वानुसार कायम विना अनुदान तत्वावर त्यांना मान्यता देण्यात आली. त्यामुळे 2001 पूर्वीच्या व 2001 नंतरच्या शाळा उच्च न्यायालयामध्ये गेल्यानंतर शासनाने उच्च न्यायालयामध्ये एक शपथपत्र दाखल केले.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ (पुढे सुरु...

त्याप्रमाणे उच्च न्यायालयाने आदेश दिलेला आहे. महाराष्ट्र शासनाची आर्थिक परिस्थिती सुधारल्यानंतर शाळांना प्राधान्याने अनुदानावर आणणार आहोत. पहिल्यांदा आदिवासी विभागातील शाळांना अनुदान देणार आहोत त्यानंतर झोपडपट्टीमधील शाळांना, त्यानंतर अल्पसंख्यांक आणि भौगोलिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या शाळांना अनुदान देणार आहोत. जशी आर्थिक परिस्थिती सुधारेल, त्याप्रमाणे अनुदान देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माझा लहानसा प्रश्न आहे. हायकोर्टामध्ये शासनाने ॲफिडेव्हीट केलेले आहे. हायकोर्टाचा निर्णय झालेला आहे की, परमनंट नो ग्रॅन्ट बेसीस असे काही नसते. कायम विना अनुदान तत्वावरील शाळांना अनुदान देण्याच्याबाबतीत शासनाने निर्णय घेतलेला आहे. हे करत असताना काही प्रायोरिटी ठरविलेली आहे. हे नव्याने धोरण ठरविलेले आहे. हायकोर्टामध्ये जे ॲफिडेव्हीट केलेले आहे, त्याप्रमाणे कायम विना अनुदानित तत्वावरील शाळांना अनुदावर आणायचे आहे, त्याप्रमाणे कोणत्या शाळांना हा निर्णय लागू होईल याबाबत शासन केव्हा धोरण जाहीर करणार आहे ?

श्री.हसन मुश्रीफ :महिना-दोन महिन्यामध्ये आम्ही हा विषय घेऊन मंत्रिमंडळापुढे जातो आणि विना अनुदानित शाळांना अनुदानावर आणण्याचा निर्णय घेतो.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, माझे दोन प्रश्न आहेत. कायम विना अनुदानित शाळा अनुदानावर आणण्याच्या संदर्भात शासनाने ॲफिडेव्हीट केलेले आहे. परंतु 24 नोव्हेंबर पूर्वी अशाप्रकारचा कोणताही निर्णय शासनाने जाहीर केलेला नव्हता, तसा मंत्रिमंडळाचा निर्णय नव्हता. आपल्या मर्जीतील, ओळखीच्या, वशिल्याच्या शाळांना विना अनुदानित तत्वावर परवानगी दिलेली होती. त्यानंतर कायम विना अनुदानित तत्वावरील शाळांना परवानगी दिली. अशाप्रकारचा भेदभाव नोव्हेंबर 2001 पूर्वी केलेला आहे. तो भेदभाव दूर करून या सर्व शाळांना अनुदान देणार आहात काय ?

श्री.हसन मुश्रीफ : 2001 पूर्वी कायम विना अनुदानित शाळांना मान्यता दिलेली होती. या शाळाही उच्च न्यायालयात गेलेल्या होत्या, त्या नंतरच्याही विना अनुदानित शाळा उच्च न्यायालयात गेलेल्या होत्या. त्यांनाही जो काही निर्णय होईल, तो लागू होईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

श्री.धनाजी साठे : सभापती महोदय, काही कायम विना अनुदानित तत्वावरील शाळांना मान्यता दिल्यानंतर त्यापैकी ठराविक शाळांना अनुदानावर आणलेले आहे, हे खरे आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, कायम अनुदानित शाळांना परवानगी दिलेली आहे त्यापैकी कोणत्याही शाळांना अनुदानावर आणलेले नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : मंत्रिमंडळापुढे जाऊन निर्णय घेतला जाईल अशाप्रकारचे उत्तर मागच्या अधिवेशनामध्येही मंत्री महोदयांनी दिलेले होते. मंत्रिमंडळामध्ये जाऊन दोन महिन्यात यासंबंधीचा निर्णय करू, असे मंत्री महोदय सांगतात. आता माननीय मुख्यमंत्री महोदय उपस्थितीत आहेत. मी निदर्शनास आणून देतो की, 40 कायम विना अनुदानित शाळांमधील 400 शिक्षकांचे वेतन मी स्वत: देतो. माझ्यासारखा गरीब माणूस ते करतो. पुढील अधिवेशनामध्ये हा प्रश्न विचारला जाणार नाही, या दृष्टीने शासनाकडून निर्णय घेतला जाणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : दोन महिन्याच्या कालावधीमध्ये मंत्रिमंडळापुढे जाऊन कायम विना अनुदानित तत्वावरील शाळांना अनुदानावर कसे आणावे, याबाबत निर्णय घेतला जाईल.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ ....

पहिल्यांदा आदिवासी विभागातील शाळा, त्यानंतर झोपडपट्टी विभागातील शाळा, त्यानंतर अल्पसंख्यांक शाळा तसेच भौगोलिकदृष्ट्या अडचणीच्या भागातील शाळा यांच्या बाबतीत जशी वित्तीय स्थिती सुधारेल त्याप्रमाणे निर्णय करण्याच्या संदर्भात मी सांगितलेले आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, वेळेचे बंधन लक्षात घेता या विषयावर पूर्ण चर्चा होऊ शकणार नाही. यासंदर्भात विचारविनिमय करण्यासाठी आपण पुढाकार घेऊन आपल्या दालनामध्ये संबंधितांची बैठक बोलवावी अशी माझी विनंती आहे.

**उपसभापती** : ठीक आहे. पुढच्या आठवड्यात बैठक बोलविण्यात येईल.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ओरस मुख्यालयातील जिल्हा रुग्णालय, उप जिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयात डॉक्टर्सची पदे रिक्त असणे.

**मु. शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ओरस मुख्यालयातील जिल्हा रुग्णालय, उप जिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयात डॉक्टर्सची पदे रिक्त असणे यासंबंधी श्री. परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. परशुराम उपरकर ( विधानसभेने निवडलले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ओरस मुख्यालयातील जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी, तज्ञ डॉक्टर, व जिल्हा शल्यचिकित्सक यांची अनेक वर्षापासून रिक्त असलेली पदे, परिणामी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनेक रुग्णांना ओरस जिल्हा रुग्णालयात उपचार न घेता कोल्हापूर, गोवा, मुंबई या ठिकाणच्या रुग्णालयात उपचारार्थ दाखल होण्याची आलेली पाळी, रुग्णालयाच्या दुरावस्थेबाबत तसेच रिक्त पदांबाबत वारंवार संबंधितांचे लक्ष वेधूनही याकडे होत असलेले जाणीवपूर्वक दुर्लक्ष, यासंदर्भात हिवाळी अधिवेशनात (डिसेंबर, 2006 मध्ये) सभागृहात याबाबत लक्ष वेधले असता मंत्री महोदयांनी आश्वासन दिल्यानंतर काही काळ डॉक्टरांची नियुक्ती करण्यात येणे, त्यानंतर माहे जानेवारी, 2007 मध्ये पुन्हा डॉक्टरांना प्रतिनियुक्तीवर दुसऱ्या ठिकाणी पाठविण्यात येणे, परिणामी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नागरिकांचा शासनावरील उडत चाललेला विश्वास, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून ओरस मुख्यालयातील जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, व ग्रामीण रुग्णालयात डॉक्टरांची रिक्त पदे त्वरित भरण्याबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

श्री. रणजित कांबळे ( सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, डिसेंबरच्या अधिवेशनात 5 तारखेला सिंधुदुर्ग जिल्ह्यात डॉक्टर्स कमी आहेत असे सांगितल्यानंतर सभापती स्थानावरुन आपण माननीय मंत्रिमहोदयांना पंधरा दिवसाच्या आत डॉक्टर्स भरण्याचे आदेश दिले होते. ते आदेश शासनाने पाळलेले नाहीत. आपल्या आदेशाचे उल्लंघन झालेले आहे. या जिल्ह्यामध्ये डॉक्टर्सच्या 16 रिक्त जागांपैकी 3 जागा भरलेल्या आहेत. त्या ठिकाणी डॉक्टर्सच्या एवढ्या जागा रिक्त असताना तेथील जिल्हा रुग्णालयाला आनंदीबाई जोशी पुरस्कार दिला गेला. ज्या ठिकाणी डॉक्टर्स कमी आहेत, ज्या ठिकाणी सुविधा दिल्या जात नाहीत, सेवेबद्दल विचार केला जात नाही अशा रुग्णालयाला आनंदीबाई जोशी पुरस्कार देण्याची शासनाची पध्दत आहे काय ? त्या ठिकाणी डॉक्टर्सची जी पदे कमी आहेत ती भरण्याचे आपण आदेश देऊनही अद्याप त्याबाबत नियोजन झालेले नाही. ते नियोजन कधी होईल ? त्या ठिकाणची सिटी स्कॅन मशीन बंद आहे. बंद असलेली सिटी स्कॅन मशीन केव्हा चालू होणार ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, सिंधुदुर्ग येथील सिव्हिल हॉस्पिटलला आनंदीबाई जोशी पुरस्कार मिळालेला आहे ही गोष्ट खरी आहे. याची अनेक कारणे आहेत. हे एकमेव हॉस्पिटल असे आहे की, ज्या ठिकाणी राज्यात सर्वात जास्त ऑक्युपंसी रेट आहे. दरवर्षी त्या ठिकाणी सरासरी 90 ते 93 टक्के ऑक्युपंसी असते. त्याचप्रमाणे ते एकमेव असे हॉस्पिटल आहे की, ज्या ठिकाणी हिप रिप्लेसमेंटचे काम होते. त्या ठिकाणी क्लास वन डॉक्टर्सची कमतरता आहे. हा केवळ सिंधुदुर्ग जिल्ह्याचाच प्रश्न नाही तर संपूर्ण राज्याचा प्रश्न आहे. संपूर्ण राज्यामध्ये स्पेशॅलिस्ट डॉक्टर्सची कमतरता आहे. या जिल्ह्यामध्ये ते प्रमाण जास्त आहे. संपूर्ण राज्यामध्ये सर्जन, गायनॉकॉलॉजिस्ट, फिजिशियन्स, ॲनेस्थेटिस्ट, बालरोगतज्ज्ञ यांची कमतरता आहे. राज्यामध्ये 770 स्पेशॅलिस्टची कमतरता आहे हे नाकारु शकत नाही. या जागा क्लास वन ऑफिसर्सच्या आहेत. क्लास टू एमबीबीएस डॉक्टर्स सिंधुदुर्ग येथील हॉस्पिटलमध्ये पूर्ण भरलेले आहेत. त्या ठिकाणी डॉक्टर्सची कोणतीही कमतरता भासणार नाही.

श्री. अरविंद सावंत : डॉक्टर्सच्या 16 पैकी 13 जागा रिक्त आहेत.

...5...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, त्या ठिकाणी 80 बेडचे हॉस्पिटल असून ते 120 बेडचे करण्याची बाब प्रस्तावित आहे. सन्माननीय सदस्य हे 200 बेडच्या हॉस्पिटलवर आधारित आकडेवारी देत आहेत. जो प्रस्ताव आहे तो प्रशासकीय मान्यतेसाठी थांबलेला आहे. 80 बेडच्या हॉस्पिटलला जेवढा स्टाफ लागतो तेवढा पूर्ण स्टाफ सिंधुदुर्गमध्ये आहे. सन्माननीय सदस्यांनी सिटी स्कॅन मशीनच्या बाबतीत प्रश्न विचारला. त्याचे यू.पी.एस., मदर बोर्ड असते ते खराब झालेले आहे. आम्ही कंपनीच्या प्रतिनिधींना बोलावले आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 16:20

(श्री.रणजित कांबळे...)

ही स्वीत्झरलँडमधील कंपनी आहे. त्या कंपनी बरोबर ॲन्युअल मेण्टेनन्स कॉण्टॅक्ट्र केलेले आहे. यूपीएस मदर बोर्डची ऑर्डर दिलेली आहे. 15 ते 20 दिवसात सिटीस्कॅन मशिन पुन्हा सुरु होईल.

डॉ. दीपक सावंत : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सिव्हील हॉस्पिटलला आनंदीबाई जोशी पुरस्कार दिलेला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये आरोग्य सेवेच्या बाबतीत आनंदी आनंद आहे. माननीय मंत्री महोदयांनी फार मोठ्या अभिमानाने 767 पदे महाराष्ट्रामध्ये रिक्त असल्याचे सांगितले. ही पदे भरण्यासाठी मंत्री महोदयांनी काय प्रयत्न केलेले आहेत ? वर्ग-1मध्ये 18 पैकी 15 वैद्यकीय अधिका-यांची पदे रिक्त आहेत. 80 बेडस्च्या जिल्हा रुग्णालयासाठी आवश्यक असलेली सर्व पदे भरलेली आहेत असे मंत्री महोदयांनी सांगितले. माझा प्रश्न असा आहे की, एम.बी.बी.एस. डॉक्टर्स् हे एम.डी.,सर्जन्, स्पेशॅलिस्ट डॉक्टरांचे काम करु शकतात काय ? ते अर्थोपेडिक सर्जरी करु शकतात काय ? सिंधुदुर्ग जिल्हयातील जनता ही जनता नाही काय ? त्यांना चांगली आरोग्य सेवा मिळण्याचा अधिकार नाही काय ? सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जनतेने आरोग्य सेवेसाठी कोल्हापूर आणि गोव्यावा जावे अशी मंत्री महोदयांची इच्छा आहे काय ? गेल्या 6 वर्षापासून सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये फिजिशियन नाही. त्या ठिकाणी फिजिशियन आणि सर्जन डॉक्टरांची किती दिवसात नेमणूक करण्यात येईल ?

श्री. रणजित कांबळे : त्याठिकाणी फिजिशियनची कमतरता आहे. ज्यावेळी एप्रिल-मे महिन्यामध्ये जनरल ट्रान्स्फर होईल त्यावेळी दोन्ही पदे ताबडतोबीने भरण्यात येतील.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझ्याकडे हिवाळी अधिवेशनाचे कार्यवृत्त आहे. हिवाळी अधिवेशनामध्ये नॅट्को रोगासंबंधी लक्षवेधी सूचना विचारण्यात आलेली होती. त्यावेळी सिंधुदुर्ग जिल्हयातील डॉक्टरांची रिक्त पदे 15 दिवसात भरावीत अशा प्रकारचे आदेश सभापती महोदय, आपण दिलेले होते. डॉक्टरांची कमतरता ही सिंधुदुर्ग जिल्ह्यावर अन्याय करणारी आहे असेही त्यावेळी म्हटलेले होते. सभापती महोदय, आपण डॉक्टरांची पदे 15 दिवसात भरण्याचे आदेश दिलेले असतानाही ती पदे आता एप्रिल महिना आला तरी भरलेली नाहीत. त्यावेळी सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये झालेल्या रोगाच्या प्रादुर्भावामुळे 110 माणसे दगावली होती. ही रिक्त पदे ताबडतोबीने भरावीत असे आपण आदेश दिलेले असताना आता मंत्री महोदय सांगतात की, ही पदे महिनाभरामध्ये भरली जातील. सभापती महोदय, आपण दिलेल्या आदेशांचे ज्यांनी पालन केले

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विनोद तावडे....

नाही त्यांना सस्पेण्ड करायला पाहिजे. कोकणातील माणसे ही माणसे नाहीत काय ? सभापती महोदय, आपण दिलेल्या आदेशांचे पालन होत नसेल तर त्याबाबतीत संबंधित मंत्री महोदयांना जबाबदार धरुन त्यांना राजीनामा देण्यास सांगावे किंवा आम्ही तरी यापुढे यासंबंधी प्रश्न विचारणार नाही.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, आपण आदेश दिल्यानंतर त्यावेळी ताबडतोब डॉक्टर्स दिले होते. त्या डॉक्टरांची 11 महिन्यांची टर्म होती. ती त्यांची टर्म संपली....

श्री. विनोद तावडे : डिसेंबर महिन्या पासून पुढे अजून 11 महिने झालेले नाहीत ?

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मला आपले संरक्षण हवे...

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MHM/ 16:25

लक्षवेधी सूचना क्रमांक-5.........

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मी उत्तर देण्यास तयार आहे. सन्माननीय सदस्यांनी मला बोलण्याची संधी द्यावी. सभापती महोदय, तात्पुरत्या स्वरुपात जे डॉक्टर नेमले जातात त्यांची टर्म 11 महिन्याची असते. आपल्या निर्देशानंतर शासनाने ताबडतोब डेप्युटेशनवर सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयात डॉक्टर्स नेमले.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण निर्देश देऊन फक्त 4 महिने उलटले आहेत. 11 महिन्याचा कालावधी संपला कुठे?

**उपसभापती** : जेव्हा त्या डॉक्टरांना अपॉईंट केले त्याच्या पूर्वी त्यांची 7 महिने सेवा झाली असावी.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, गेले कित्येक महिने हा प्रश्न सातत्याने सभागृहात चर्चेला येत आहे. आमच्याकडून सतत सांगितले जाते की, सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयामध्ये डॉक्टर्स कमी आहेत. मी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.कुळकर्णी यांचा आदर राखून बोलत आहे. जिल्हा रुग्णालयाला पारितोषिक मिळाले याचा आम्हाला आनंद वाटतो. परंतु मंत्रीमहोदयांनी शब्द उच्चारला की, रुग्णालयाला ऑक्युपन्सी पाहून पारितोषिक दिले. जिल्हा रुग्णालय म्हणजे काय हॉटेल आहे का? त्याठिकाणी रुग्णांना ट्रिटमेंट मिळाली पाहिजे. सध्या त्या रुग्णालयामध्ये निवासी वैद्यकीय अधिकारी, निवासी वैद्यकीय अधिकारी (चिकित्सा व बाह्यसंपर्क), वैद्यकीय अधिकारी (भेषज), वैद्यकीय अधिकारी (अस्थिव्यंग शल्यचिकित्सा), वैद्यकीय अधिकारी (बधिरीकरण), वैद्यकीय अधिकारी (शस्त्रक्रिया), वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ), वैद्यकीय अधिकारी (बालरोग तज्ञ), वैद्यकीय अधिकारी (क्ष- किरण तज्ञ), वैद्यकीय अधिकारी (मनोविकृती), वैद्यकीय अधिकारी (क्षयरोग चिकित्सा), वैद्यकीय अधिकारी (नेत्रशल्य चिकित्सा), वैद्यकीय अधिकारी (कान, नाक व घसा तज्ञ) ही महत्वाची वर्ग.1 ची एम.डी.ची पदे रिक्त आहेत. यातील एकही तज्ञ डॉक्टर आज त्या जिल्हा रुग्णालयामध्ये कार्यरत नाही. तात्पुरत्या स्वरुपात ट्रान्सफर करुन शासन आमच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम करीत आहे. सभापती महोदय, आपण निर्देश दिले ते निर्देश सुध्दा टेम्परररी आहेत का? त्या निर्देशाप्रमाणे रिक्त असलेल्या 13 डॉक्टरांची नियुक्ती किती दिवसात करणार आहात?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-5.........

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मी यापूर्वी सांगितल्याप्रमाणे संपूर्ण राज्यात वर्ग.1 च्या डॉक्टरांची कमतरता आहे. हे मी नाकारीत नाही.

**उपसभापती** : कितीतरी डॉक्टर उपलब्ध आहेत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी एकदा तरी या जिल्हा रुग्णालयाला भेट दिली आहे का? त्यांनी भेट देण्याचे कबूल केले होते.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, Specialist डॉक्टर वर्ग.1 चे आहेत. वर्ग.2 चे डॉक्टर सुध्दा Specialist असतात. वर्ग.2 मधील डॉक्टर Specialist नाहीत असे नाही. शासनाकडे वर्ग.1 च्या पदांची कमतरता आहे. सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयात 16 पैकी 15 पदे वर्ग.2 च्या Specialistची भरलेली आहेत. मागील वेळी आपण जे निर्देश दिले तेव्हापासून दहा दिवसाच्या आत शासनाने संबंधित डॉक्टरांच्या पोस्टिंग केल्या. सध्या महाराष्ट्रात वर्ग.1 च्या पदांची कमतरता आहे म्हणून शासनाने नियम केला की, Pre P.G. म्हणून 1 वर्ष ग्रामीण भागात काम केले पाहिजे. ते डॉक्टर 11 महिने कॉन्ट्रॅक्टवर काम करीत राहतात.

(नंतर श्री.जुन्नरे....

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे ...

सभापती महोदय, यासंदर्भात आपण जेव्हा आदेश दिले होते त्यावेळी सिंधुदुर्ग जिल्हयात प्रायोरिटीने डॉक्टर्स उपलब्ध करुन देण्यात आले होते. परंतु डॉक्टरांची टर्म संपल्यानंतर डॉक्टर निघून गेले. आता या ठिकाणी नवीन डॉक्टर्स भरलेले आहेत. या ठिकाणी वर्ग 2 चे 15 डॉक्टर्स असून या ठिकाणी वर्ग 1 चे डॉक्टर्स नाहीत. वर्ग 1 च्या डॉक्टरांचे शॉर्टेज आहे. 50 टक्के डॉक्टरांची नेमणूक डायरेक्ट भरतीने करण्यात यावी तसेच 50 टक्के डॉक्टरांची नेमणूक प्रमोशनने करण्यात यावी, परंतु या 50 टक्के भरतीच्या संदर्भात एस.सी., एस.टी. च्या संदर्भात कोर्टाने स्टे दिलेला आहे.

( एकाचवेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उपसभापती** : सिंधुदुर्ग मध्ये 15-20 दिवसात डॉक्टर्स उपलब्ध करुन देण्यात यावेत.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, या ठिकाणी वर्ग 2 चे डॉक्टर्स देण्यात आलेले आहेत. वर्ग 1 च्या डॉक्टरांचे शॉर्टेज आहे. या ठिकाणी फिजिशिअन, सर्जन डॉक्टर्सची दोन पदे त्वरित भरण्यात येतील.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**बाभळी बंधा-याच्या कामासंदर्भात करण्यात येणा-या निवेदनाबाबत**

श्री. हर्षवर्धन पाटील ( संसदीय कार्य मंत्री ) : सभापती महोदय, बाभळी बंधा-याच्या संदर्भात आज 4.00 वाजता सभागृहात निवेदन करावयाचे होते. यासंदर्भात मुख्यमंत्री कार्यालयातून तसेच माहिती व जनसंपर्क कार्यालयातून आंध्रप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी काय वक्तव्य केले आहे याची माहिती उपलब्ध करण्यास वेळ लागत आहे. यासंदर्भातील माहिती गोळा करण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे यासंदर्भात माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, यासंदर्भातील माहिती आज ऐवजी उद्या सभागृहाला सादर केली जाईल. यासंदर्भात आज ऐवजी उद्या निवेदन सभागृहाला सादर करण्यात येईल. यासंदर्भातील वस्तुनिष्ठ माहिती सभागृहासमोर येणे आवश्यक असल्यामुळे आजच्या ऐवजी उद्या निवेदन सभागृहाला सादर करण्यात येईल.

( एकाचवेळी अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आजच सभागृहाला माहिती देण्याचा निर्णय आपल्या दालनात झाला होता.

( एकाचवेळी दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून घोषणा देत असतात.)

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आंध्रप्रदेशच्या मुख्यमुंत्र्यांनी आपल्या मुख्यमंत्र्यांच्या संदर्भात जे वक्तव्य केलेले आहे त्याची ऑथेंटिक माहिती घेण्याचे काम सुरु आहे. ऑथेंटिक माहिती सभागृहासमोर आली पाहिजे अशी राज्य सरकारची स्पष्ट भूमिका आहे.

( एकाचवेळी दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून घोषणा देत असतात.)

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात. )

**उपसभापती** : अशा परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 4.35 वाजता 15 मिनिटांकरिता स्थगित झाली. )

यानंतर श्री.पुरी........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**( सभापतीस्थानी : तालिका सभापती श्री.अरविंद सावंत )**

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात. )

**तालिका सभापती** : अशा परिस्थितीमध्ये सभागृहाचे कामकाज पुढे चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक 04.50 वाजता, 10 मिनिटांसाठी स्थगित झाली. )

-------

नंतर कु.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. पुरी 17.00

**(स्थगितीनंतर )**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझी आपणास अशी नम्र विनंती आहे की, एखादया मुख्यमंत्र्यांचे वक्तव्य आले तर राज्यसरकार म्हणून जबाबदारीने ते तपासून पाहिले हे मी समजू शकतो. विधान सभेचे व विधान परिषदेचे अधिवेशन सध्या सुरु आहे. राज्याचा अवमान होईल या पद्धतीचे वक्तव्य एखाद्या आंदोलनाच्या संदर्भात एखादा मुख्यमंत्री करतो आणि सभागृहाचे कामकाज चालू असताना त्या विषयाबाबतची खात्रीशीर माहिती घेण्यासाठी आपल्याला वेळही मिळत नाही. यातून आपण लोकांना काय संदेश देऊ इच्छितो.? सत्ताधारी पक्षाला काही इतर अडचणी आहेत काय ? सत्ताधारी पक्षाला अजून काही हायकमांडची क्लिअरन्स पाहिजे म्हणून थांबला नाहीत ना ? तसे असेल तर आम्हाला सांगा आम्ही गप्प बसतो.असे काही नाही हे मला मान्य आहे. हा संपूर्ण राज्याच्या अस्मितेचा विषय आहे. त्यामुळे या संदर्भात मी मनापासून प्रामाणिकपणे कोणतेही राजकारण करु इच्छित नाही. सभागृहाचे दिवसभराचे कामकाज होऊनसुद्धा या संदर्भात काहीही विचार झाला नाही असा संदेश महाराष्ट्रातील जनतेला देणे बरोबर नाही.कोठलीही माहिती सहज मिळू शकते परंतु आपल्याला ती मिळविता आली पाहिजे. " बुंदसे गयी वो हौदसे नही आती " असेच मला या ठिकाणी म्हणावेसे वाटते आहे. सकाळी तडफेने बोलणारे सन्माननीय सदस्य आता दिसत नाहीत. माझी आपणास अशी नम्र विनंती आहे की, आपण खरोखर या विषयावर आजच प्रस्ताव घ्यावा. तो प्रस्ताव आजच घेणे महत्वाचे आहे. या विषयावर उद्या रडण्यात काहीही अर्थ नाही.

श्री उल्हास पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी या ठिकाणी मुद्दा उपस्थित करुन आपले मनोगत व्यक्त केलेले आहे त्यांनी व्यक्त केलेल्या राज्याच्या अस्मितेच्या, सन्मानाच्या भावनेशी मी संपूर्णपणे सहमत आहे. यात काहीही दुमत असण्याचें कारण नाही. माझे फक्त एकच म्हणणे आहे की, वृत्तपत्रामध्ये एखादी बातमी आली की, तशीच असते असे नाही मी आपणा सर्वांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, काही वेळेस आपल्या भाषणात सुध्दा आपल्याला जी भावना अभिप्रेत असते ती भावना तशीच वर्तमानपत्रात येईल असे नाही व त्यामुळे त्याचा विपर्यस्त अर्थ काढला जाऊ शकतो. मी आपणास या ठिकाणी एक उदाहरण देऊ

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. पुरी 17.00

श्री. उल्हास पवार....

इच्छितो, गुजराथ राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री नरेंद्र मोदी यांच्या वक्तव्याबाबत आपणच सांगितले की, ते तसे बोलले नाहीत. परंतु त्यांच्या तोंडी तसे वक्तव्य आले. आपणच याबाबतीत खुलासा केला की, ते तसे बोलले नाहीत. त्यामुळे सन्माननीय मुख्यमंत्री यांच्यावर जी टिकाटिप्पणी करण्यात आली आहे त्या विषयी शहानिशा केल्याशिवाय घाईने काही बोलणे योग्य होणार नाही. ते वक्तव्य आपण तपासून घेणे आवश्यक आहे.या प्रकरणी आंध्र प्रदेशचे सन्माननीय मुख्यमंत्री यांनी जर तसे वक्तव्य केले असेल तर त्या वक्तव्याची शहानिशा करुन घेऊन आपण एकमताने त्यांच्या वक्तव्याचा निषेध करु. पण ते जर तसे बोलले नसतील आणि त्याची शहानिशा न करता एखाद्या सुसंस्कृत माणसाबाबत असे वक्तव्य आपण केल्यामुळे त्यामधून काही वेगळा संदेश जनतेमध्ये जाऊ शकतो. हे त्यांच्यावर अन्यायकारक होऊ शकेल.

यानंतर श्री. रोझेकर..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार.........

सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य, श्री.विनोद तावडे यांच्या भावनेशी पूर्णपणे सहमत आहे. जर आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री तसे बोलले असतील तर ते तपासून पाहू आणि तसे निष्पन्न झाले तर निश्चितपणे एकमताने त्यांच्या वक्तव्याचा आपण निषेध करु. नजिकच्या काळात घडलेले एक उदाहरण मी आपल्याला सांगू इच्छितो. गुजराथ राज्याचे मुख्यमंत्री, श्री.नरेंद्र मोदी यांचे विजेसंबंधीचे वक्तव्य वर्तमानपत्रात छापून आले होते व त्याचा उल्लेख सभागृहात झाला होता. त्यावेळी विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनीच असा खुलासा केला होता की, गुजराथ राज्याचे मुख्यमंत्री तसे बोलले नव्हते. हे ताजे उदाहरण आपल्या डोळ्यासमोर असतांना आणि अशा प्रकारचा अनुभव आपण अनेक वेळा घेतला असतांना या ठिकाणी फार मोठी चर्चा करुन काही बोलणे हे आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांवर अन्याय केल्यासारखे होईल. पण ते तसे बोलले असे सिद्ध झाले तर आपण सगळे मिळून त्यांच्या वक्तव्याचा निषेध करु.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा प्रश्न आहे, कुठलाही राजकीय प्रश्न नाही. एक धाडस शेजारच्या राज्यातील माणूस, सर्वसामान्य माणूस नव्हे तर आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री, श्री.चंद्राबाबू नायडू महाराष्ट्र येऊन करतात. बाभळी बंधा-याच्या संदर्भात घोषणा करतात, किंबहुना टोकाची भूमिका मांडतात, बॉम्ब टाकणार एवढयापर्यन्त बोलतात. त्यांच्या यात्रेला त्यांनी 'चैतन्य यात्रा' अशा प्रकारचे नाव दिले आहे आणि आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री त्यांचे समर्थन करतात. आता राहिला प्रश्न तपशिलाचा. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री असे बोलले का ? सुदैवाने इलेक्ट्रॉनिक मिडियामध्ये हे आले आहे, लोकमत व सकाळ या वर्तमानपत्रात बातमी आली आहे. सन्माननीय सदस्य, श्री.उल्हास पवार हे सांगतात त्यामध्येही तथ्य असू शकते. परंतु, सरकारचे कसे चुकते आहे ? सकाळी सरकारने सांगितले की, दोन तासात खुलासा करु. माननीय मंत्री, श्री.अशोक चव्हाण सभागृहात बोलले की, दोन तासात खुलासा करु. आता त्याला साडेचार-पाच तास झाले. आज आपण माहिती तंत्रज्ञान युगात आहोत, जग एवढे जवळ आले आहे आणि दुस-या बाजूला पाच तास उलटून गेले तरी शासनाला माहिती मिळू शकत नाही, ही अत्यंत निषेधार्ह बाब आहे. शासन काही तरी दडपण्याचा प्रयत्न करीत आहे, असा गर्भितार्थ त्यामधून निघतो आहे. काहीही असले तरी हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा प्रश्न आहे. माननीय मंत्री

..2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत..........

महोदयांनी माहिती मिळविण्यासाठी दोन तास मागून घेतले, कोणत्याही चॅनलकडून सी.डी.मागवून माहिती मिळविता आली असती. परंतु, पाच तास झाले तरी अद्याप शासनाला माहिती मिळविता आलेली नाही, याचा मी निषेध करतो. आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांचा निषेध करायचा की नाही यापेक्षा आपल्या शासनाने पाच तासात काय माहिती मिळविली, आपण काय करीत आहोत याबाबत मी तीव्र चिंता व्यक्त करतो. शासन याबाबतीत गंभीर आहे, असे वाटत नाही.

**उपसभापती** : या विषयावर बरीच चर्चा झाली आहे.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, वर्तमानपत्रात तेलगू भाषेतील एका शब्दाचे मराठीकरण केले आहे व कंसामध्ये मूळ तेलगू शब्द दिला आहे. या तेलगू शब्दाचे भाषांतर मला येत नाही. पण मी एक उदाहरण देऊ इच्छितो. मागील काळात 'टाईम्स ऑफ इंडिया' या इंग्रजी वर्तमानपत्रात 'छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास' या शीर्षकाखाली काही मजकूर आला होता. 'शिवाजी महाराजांनी गनिमीकाव्याने युद्ध जिंकले' या मराठी वाक्याचे इंग्रजीत भाषांतर करीत असतांना 'गनिमीकावा' या शब्दातील 'कावा' या शब्दाचे 'काव्य' असे भाषांतर केले होते. त्यामुळे इंग्रजीत हे भाषांतर "because of gruely poetry" असे झाले होते.

**उपसभापती** : मी यासंदर्भात सभागृहाला निदेश देतो की, या विषयावरील चर्चा आता संपली आहे. आज संध्याकाळपर्यन्त किंवा उद्या दिवसभरात शासनाने यासंबंधी सभागृहात निवेदन करावे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात व सभागृहातून बर्हिगमन करतात.)

----------------

यानंतर कुमारी जयश्री...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कृषी व जैवतंत्रज्ञान विभागातील अनुसूचित जाती - जमाती व इतर मागासर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटपात भेदभाव करणे.

**मु.शी.**: कृषी व जैवतंत्रज्ञान विभागातील अनुसूचित जाती - जमाती व इतर मागासर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटपात भेदभाव करणे. यासंबंधी प्रा. बी. टी. देशमुख, सर्वश्री. व्ही . यू .डायगव्हाणे वसंतराव खोटरे, जी.एल. अैनापूरे, दिलीपराव सोनावणे,वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा.बी.टी.देशमुख ( अमरावती विभाग पदवीधर ) : अध्यक्ष महोदय,मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे,अशी विनंती करतो.

" महाराष्ट्र राज्य कृषी शिक्षण व संशोधन परिषदेने ठरवून दिलेल्या प्रमाणकाप्रमाणे कृषी विद्यापीठाशी संलग्न असलेल्या कृषी व जैवतंत्रज्ञान विभागातील अनुसूचित जाती - जमाती व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटपात भेदभाव करणे,कृषी विद्यापीठ विद्यार्थी कृती समिती,अमरावती ( विदर्भ ),महाराष्ट्र यांनी दिनांक 27 फेब्रुवारी,2007 रोजी मा.संचालक ( शिक्षण ) ,समाजल्याण संचालनालय,पुणे यांना विशेष समाजकल्याण अधिकारी,अमरावती यांचेमार्फत निवेदन सादर करुन या भेदभावाविरुध्द दिलेली आंदोलनाची नोटीस,पश्चिम महाराष्ट्रातील अशा महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना प्रत्येकी 43,825 रुपये तर विदर्भातील विद्यार्थ्यांना प्रत्येकी 5,542 रुपये अदा करण्यात आल्यामुळे विदर्भातील या विद्यार्थ्यांमध्ये व एकूणच जनमानसामध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रया "

श्री.धर्मराव बाबा आत्राम ( परिवहन,सामाजिक न्याय,ओबीसी व भटके विमुक्त कल्याण,महिला व बालकल्याण राज्यमंत्री ) : अध्यक्ष महाराज,लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या आहेत. परंतु सभापती महोदय आपल्या अनुमतीने मी निवेदनामध्ये खालील प्रमाणे दुरुस्ती करु इच्छितो. चौथ्या ओळीवर "शासन मान्यताप्राप्त विनाअनुदानित महाविद्यालयात " या ऐवजी "शासन मान्यताप्राप्त अनुदानित महाविद्यालयात" असे वाचावे.

महोदय,मी दुरुस्तीसह निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : दुरुस्तीसह निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आपण सदहेतूने पीठासिन अधिकारी म्हणून आम्हा सदस्यांना अनेकवेळा फक्त दोन तीनच प्रश्न विचारा असे सांगतात परंतु शासनाच्या काही हुशार अधिका-यांनी या ठिकाणी असे निवेदन केलेले आहे आणि त्यामध्ये याची काळजी घेतली आहे की, सदस्यांनी विचारलेल्या किंवा उपस्थित केलेल्या एकाही मुद्दयाचे उत्तर आले नाही पाहिजे म्हणजे सर्वांचा वेळ त्यातील मुद्दयांबाबत माहिती गोळा करण्यात जातो. परंतु हा प्रश्न विदर्भ व मराठवाडयातील अनुसूचित जाती व जमाती तसेच इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या संदर्भातील गंभीर प्रश्न आहे. हा प्रश्न विदर्भातील एकमेव महाविद्यालयाविषयी आहे. निवेदन जरी अधिकारी तयार करीत असले तरीदेखील तांत्रिकदृष्टया निवेदनाची जबाबदारी ही मंत्रिमहोदयांचीच असते. सदस्यांच्या एकाही मुद्दयाला या निवेदनामध्ये उत्तर देण्याता आलेले नाही. कृषी विद्यापीठ विद्यार्थी कृती समिती,अमरावती ( विदर्भ ), महाराष्ट्र यांनी दिनांक 27 फेब्रुवारी,2007 रोजी मा.संचालक ( शिक्षण , समाजकल्याण संचालनालय,पुणे) यांना विशेष समाजकल्याण अधिकारी,अमरावती यांचेमार्फत एक निवेदन सादर केले होते ते शासनाला मिळाले का ? आता प्रश्नही मीच विचारतो आणि या प्रश्नाचे उत्तरही मीच देतो की, सदर निवेदन शासनाला प्राप्त झालेले आहे कारण निवेदन मिळाल्याची पोचपावती माझ्याकडे उपलब्ध आहे. दुर्देव असे आहे की, विदर्भातील या एकमेव महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रत्येकी 5,542 रुपये एवढी रक्कम शिष्यवृत्ती म्हणून अदा करण्यात आली. सन्माननीय सदस्य श्री.गणगणे आपण याकडे जरा लक्ष द्यावे, अशी माझी विनंती आहे. पश्चिम महाराष्ट्रातील अशा महाविद्यांलयातील विद्यार्थ्यांना प्रत्येकी 43,825 रुपये एवढी रक्कम शिष्यवृत्तीच्या नावाखाली अदा करण्यात आली. हा भेदभाव का करण्यात आला, विदर्भ आणि मराठवाडा हे महाराष्ट्राचे भाग नाहीत का ? याबाबत सर्व अधिकृत कागदपत्रे माझ्याकडे आहेत. ही गोष्ट खरी आहे का ? असल्यास,यासंबंधी तक्रार केली गेली आहे, त्यावर शासन किती दिवसात कारवाई करणार आहे ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख साहेबांनी जो मुद्दा या सभागृहामध्ये मांडला तो खरा आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : पश्चिम महाराष्ट्रातील या महाविद्यालयातील विद्यार्थी काय सरकारचे लाडके आहेत ? विदर्भ व मराठवाडयातील विद्यार्थी काय टाकून दिलेले आहेत का ? माझे ठामपणे

XX - 4





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख....

असे म्हणणे आहे व पॉईंटेड प्रश्न आहे की, हे जे एकमेव विदर्भातील महाविद्यालय आहे त्यातील विद्यार्थ्यांना आपण पश्चिम महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांप्रमाणे शिष्यवृत्ती देण्याचे दोन दिवसांमध्ये आदेश निर्गमित करणार आहात का ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : वास्तविक ही योजना आपण सन 2006 व 2007 करिता तयार केली होती. परंतु काही अधिका-यांनी तीन ते चार जिल्हयांमध्ये पूर्ण रक्कम दिलेली आहे, असे या निमित्ताने शासनाला दिसून येत आहे. " Suggetion for action "

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, " Suggetion for action " या लेव्हलवर होत नाही. पश्चिम महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना 43,825 रुपये आणि विदर्भ व मराठवाडयातील विद्यार्थ्यांना 5,542 रुपये ही गोष्ट बरोबर नाही, ही गोष्ट निषेधार्ह आहे. माझा यावर पॉईंटेड असा प्रश्न आहे की, सदर बाबीसंदर्भातील गैरप्रकार शासनाने एकप्रकारे कबूल केलेला आहे. कृषी विद्यापीठ विद्यार्थी कृती समिती,अमरावती ( विदर्भ ), महाराष्ट्र यांनी दिनांक 27 फेब्रुवारी,2007 रोजी मा.संचालक ( शिक्षण , समाजकल्याण संचालनालय,पुणे यांना विशेष समाजकल्याण अधिकारी,अमरावती यांचेमार्फत एक निवेदन सादर केले होते ते निवेदनही आपल्याला मिळालेले आहे. सभापती महोदय, आपणही यामध्ये लक्ष घालावे, अशी माझी विनंती आहे. अजूनही आम्हाला असा अचंबा वाटत आहे की, विदर्भ आणि मराठवाडा हे महाराष्ट्राचे भाग आहेत की नाही. हा भेदभाव होणे, ही अतिशय लाजिरवाणी गोष्ट आहे. माझा असा प्रश्न आहे की, आज, उद्या व परवा विदर्भातील विद्यार्थ्यांना पश्चिम मराष्ट्रातील विद्यार्थ्यांप्रमाणे शिष्यवृत्ती दिली जाईल का ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, होय.

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, यामध्ये विदर्भ व मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र यांच्यामध्ये जी तफावत केली गेलेली आहे, याची चौकशी झाली पाहिजे, ही तफावत कोणाच्या आदेशावरुन झालेली आहे ? यामध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

XX - 5



श्री.धर्मरावबाबा आत्राम : यासंदर्भात चौकशी सुरु करण्यात आलेली आहे,चौकशीचा अहवाल आल्यानंतर ताबडतोबीने कारवाई करण्यात येईल.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधाकर गणगणे : जे लोक यामध्ये दोषी असतील त्यांच्यावर लवकरात लवकर कारवाई झाली पाहिजे.

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, हा इतर मागासवर्गीय व अनुसूचित जमाती व जातीच्या विद्यार्थ्यांचा प्रश्न आहे.

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, चौकशीचा अंतिम अहवाल आल्यानंतर ताबडतोबीने कारवाई करण्यात येणार आहे.

-------

यानंतर श्री.बोरले.....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनबाबत.**

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. आपण मघाशी वन संज्ञा या विषयासंदर्भात शासनाला निदेश दिले होते. आझार मैदानावर लोक बसलेले आहेत. माननीय मंत्री महोदयांनी आझाद मैदानावर जाऊन त्या लोकांची भेट घ्यावी, असे आपण निदेश दिले होते. आझाद मैदानावर बसलेल्या लोकांची भेट घेण्यासाठी माननीय मंत्री महोदय गेले होते काय ? याबाबतची माहिती सभागृहाला मिळालेली नाही. यासंदर्भात शासनाने सभागृहाला माहिती द्यावी, असा माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन आहे.

**उपसभापती** : सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्यांनी या विषयावर आपापल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. माननीय मंत्री महोदयांनी आझाद मैदानावर जाऊन त्या लोकांची भेट घेतलेली नसेल तर काही सन्माननीय सदस्यांनी माझ्याबरोबर यावे, आपण आझाद मैदानावर जाऊन त्यांची भेट घेऊ.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण दिलेल्या निदेशाचे शासन पालन करीत नाही.

**उपसभापती** : माननीय श्री.चंद्रकांत हंडोरे साहेबांनी याबाबतची चौकशी करावी आणि आझ ाद मैदानावर बसलेल्या लोकांची भेट घेण्यासाठी कोणी गेले नसेल तर वन मंत्र्यांना त्या लोकांची भेट घेण्यासाठी पाठवावे.

श्री.चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, होय.

--------

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## विशेष उल्लेख.

**पृ.शी.** : पुणे शहरातील महत्वाच्या ठिकाणांची छायाचित्रे इंटरनेटच्या माध्यमातून आय.एस.आय. संघटनेला पुरविण्यात येणे.

**मु. शी.** : पुणे शहरातील महत्वाच्या ठिकाणांची छायाचित्रे इंटरनेटच्या माध्यमातून आय.एस.आय. संघटनेला पुरविण्यात येणे याबाबत श्री.अरविंद सावंत, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री.अरविंद सावंत यां□ ए□ विशेष उल्ले□ची सूच□ दिली आहे, त्यां□ ती मांडावी.

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

"पुण्यामध्ये दिनांक 9.4.2007 रोजी विशालकुमार हा आय.एस.आय. संघटनेला माहिती पुरवित असल्याच्या कारणावरुन पुणे पोलिसांनी ऑफिशियल सिक्रेट ॲक्ट खाली अटक करुन त्याच्यावर दाखल करण्यात आलेला गुन्हा, श्री.विशालकुमार हा पुणे व परिसरातील महत्वाच्या ठिकाणांची छायाचित्रे घेत असणे, सदर छायाचित्रे इंटरनेटच्या माध्यमातून आय.एस.आय. या पाकिस्तानी गुप्तहेर संघटनेला पाठविण्याचे सिद्ध होणे, पुणे शहरात अलिकडे परदेशी हस्तकांचे मोठया प्रमाणावर वास्तव्य असून तेथील कायदा व सुव्यवस्था धोक्यात आली असून तेथील कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूर करण्याची निंतांत आवश्यकता, त्याबाबत शासनाने काय उपायायोजना केली याबाबत तात्काळ शासनाने निवेदन करावे."

सभापती महोदय, पुणे शहरातील सिंहगडाच्या पायथ्याशी काही तरुणांनी रेव्ह पार्टी केली होती. एका धक्कादायक बातमीसंदर्भात मी सभागृहामध्ये विशेष उल्लेख उपस्थित करीत आहे. श्री.विशालकुमार उपाध्याय नावाच्या मुलाला पुणे पोलिसांनी ऑफिशियल सिक्रेट ॲक्ट खाली अटक केलेली आहे. तो मुलगा हडपसर येथे राहत होता. भांडारकर रस्त्यावरील लॉजमध्ये राहून हा मुलगा पुणे परिसरातील महत्वाच्या ठिकाणांची छायाचित्रे इंटरनेटद्वारे आय.ए.एस. या पाकिस्तानी संघटनेला पाठवित असल्याचे सिद्ध झालेले आहे. केंद्र शासनाच्या गुप्तचर यंत्रणेला आधी याबाबत

..3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत .......

माहिती मिळाली. त्यानंतर केंद्र शासनाच्या गुप्तचर यंत्रणेने महाराष्ट्र शासनाला माहिती कळविली आणि नंतर पोलिसांनी त्या मुलाला पकडले. पुणे शहरामध्ये आय.टी. किंवा इतर व्यवसायामध्ये नोकरी करण्यासाठी परप्रांतीय मोठया प्रमाणावर येत असतात, याबाबत काळजी घेण्याची आवश्यकता आहे. मागच्या वेळी पुणे शहरामध्ये आर.डी.एक्स. आणि दंगलीसंदर्भात एका तरुणाला पकडण्यात आले होते. मुंबईच्या पाठोपाठ पुण्यामध्ये देखील बॉम्बस्फोट होऊ शकतात. श्री.विशालकुमार उपाध्याय हा एकटा नसून त्याच्या बरोबर इतर मंडळी देखील आहे. त्यांना ताबडतोब पकडून याचा छडा लावावा, अशी मी माननीय गृहमंत्र्यांना विनंती करतो. श्री.विशालकुमार उपाध्याय हा एका मुलीच्या प्रेमामध्ये पडलेला आहे. त्या मुलीला भेटण्यासाठी तो पाकिस्तानमध्ये गेला होता. हा मुळचा झारखंडचा आहे. तो पुण्यामध्ये राहतो आणि त्या मुलीला भेटण्यासाठी पाकिस्तानमध्ये जातो. धर्म बदलण्यासाठी तो मौलवीला देखील भेटला होता. हा मुलगा पुणे शहरातील महत्वाच्या ठिकाणांची छायाचित्रे आय.एस.आय. या पाकिस्तानी संघटनेला पाठवित आहे. शासनाने याची ताबडतोब चौकशी करावी, अशी माझी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाला विनंती आहे.

-------

(यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मेरीटाईम बोर्ड तसेच त्यांच्या अखत्यारितील कार्यालयातील पदांचा आढावा.

**मु.शी.**: मेरीटाईम बोर्ड तसेच त्यांच्या अखत्यारितील कार्यालयातील पदांचा आढावा या विषयावर श्री.परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.परशुराम उपरकर (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड, मुंबई तसेच त्यांच्या अखत्यारितील कार्यालयातील पदांचा आढावा (नवीन प्रशासकीय रचना) महाराष्ट्र शासन गृह विभाग यांच्याकडे शासन निर्णय क्रमांक इपीटी/001/प्र.क्र.141/बंदरे 2/मंत्रालय/मु.32 दिनांक 19.10.2006 च्या शासन निर्णयाप्रमाणे मंजूर झ ालेली असून त्याची अंमलबजावणी शासन निर्णयाच्या दिनांकापासून करावयाची होती. परंतु ती अद्यापपर्यंत करण्यात आलेली नाही, किंबहुना ती लागू करण्याबाबत मुख्यालय, महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड मुंबई (बेलार्ड इस्टेट) यांचेकडून टाळाटाळ होत असणे, सदर शासन निर्णयानुसार नवीन प्रशासकीय रचना अंमलात आणण्यास तीन महिने उलटून गेले तरी आजतागायत अंमलात आलेली नाही. तसेच मंजूर पदापैकी काही वरिष्ठ अधिकाऱ्यांची पदे भरण्यात आली आहेत ती कोणत्या आधारे भरण्यात आलेली आहेत, याबाबत शासनाने निवेदन करावे".

----------

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: रायगड जिल्हयातील सासवणे येथील शासकीय अध्यापक महाविद्यालयाची झालेली दुरावस्था

**मु.शी.**: रायगड जिल्हयातील सासवणे येथील शासकीय अध्यापक महाविद्यालयाची झालेली दुरावस्था या विषयावर श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.जयंत प्र.पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" शासन यंत्रणेचे दुर्लक्ष आणि कर्मचाऱ्यांची अनास्था यामुळे रायगड जिल्हयातील अलिबाग तालुक्यातील सासवणे येथे ऐतिहासिक वास्तूतील शासकीय अध्यापक विद्यालयाची दुरावस्था झाली आहे. विद्यार्थ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून सुविधांअभावी मुलींची कुचंबणा होत आहे. नवी पिढी घडविणारे भावी शिक्षक अशा वास्तूत शिक्षण घेत आहेत.

स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्रप्रेमी युवक घडविण्यासाठी साडेतीन एकर जागेत बांधलेली ही वास्तू कोकणस्थ वैश्य समाज संस्थेने 1949 मध्ये शासनास शैक्षणिक कार्यासाठी दान दिली, महात्मा गांधी देखील काही काळ या इमारतीत वास्तव्य करुन होते. सध्या 64 मुले व 35 मुली शिक्षण घेत आहेत.

शाळागृह, वसतिगृह अशा स्वतंत्र इमारती आहेत. परंतु त्यांची अवस्था दयनीय झाली आहे. खिडक्या तावदाने, दरवाजे तुटलेले आहेत. पाणी वेळेवर मिळत नाही. अशुध्द पाण्यामुळे त्वचारोग पसरतात, साधे प्रसाधनगृहही नाही. एप्रिलपर्यंत 30 मुली येथे राहात होत्या परंतु इमारतींची दुरावस्था व असुविधेमुळे मुलींचे वसतिगृह बंद करण्यात आले.

ही अवस्था अशीच राहिली तर येत्या काही वर्षात विद्यार्थीसंख्या घटून विद्यालय बंद पडण्याची भिती व्यक्त होत आहे. तरी याकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी हा विशेष उललेख करीत आहे".

-----

.....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**:थम्स अप शीतपेयाच्या जाहिरातीमुळे लहान मुलांवर होणारा विपरित परिणाम

**मु.शी.**: थम्स अप शीतपेयाच्या जाहिरातीमुळे लहान मुलांवर होणारा विपरित परिणाम या विषयावर श्रीमती सुधा जोशी, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी, वि.प.स. यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती सुधा जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

" सध्या दूरदर्शनवर थम्स अप शीतपेयाची जाहिरात दाखवित असताना लहान मुलांच्या मनावर विपरीत परिणाम होईल असे दाखविले जात आहे. या जाहिरातीतील नायक बहुमजली इमारतींवरुन टप्प्याटप्प्याने उड्या मारत रस्त्यावरुन जाणाऱ्या थम्स अप च्या गाडीतून बाटली घेतो असे चित्तथरारक दृश्य सतत दाखविले जात आहे. मोठया चवीने लहान मुले ही जाहिरात बघतात. लहान मुलांचे वय हे अनुकरण करणारे असते. अशा चित्तथरारक दृश्यांचे त्यांना विशेष आकर्षण असल्याने आपणही त्यांचे अनुकरण करावे असे त्यांना वाटते. यापूर्वी शक्तीमान कार्यक्रमामध्ये शक्तीमानच्या अचाट कृती दाखविल्या जायच्या. शक्तीमानचे अनुकरण करुन मुलांच्या प्राणावर बेतले. तसेच या थम्स अप जाहिरातीमुळेसुध्दा विपरीत परिणाम होण्याची दाट शक्यता असल्यामुळे त्वरीत सदर जाहिरातीवर बंदी आणावी अशी विनंती मी या सभागृहात विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे".

---------

.....4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबईतील साऊथ इंडियन को-ऑप.बँकेच्या आर्थिक देवाणघेवाणीवर रिझर्व्ह बँकेने बंदी घातल्याने हजारो नागरिकांच्या अडकलेल्या ठेवी.

**मु.शी.**: मुंबईतील साऊथ इंडियन को-ऑप.बँकेच्या आर्थिक देवाणघेवाणीवर रिझर्व्ह बँकेने बंदी घातल्याने हजारो नागरिकांच्या अडकलेल्या ठेवी या विषयावर श्री.मधुकर सरपोतदार, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार, वि.प.स. यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.मधुकर सरपोतदार (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" मुंबईतील साऊथ इंडियन को-ऑप.बँक ही 9 ऑगस्ट 2004 पासून तिच्या आर्थिक देवाण घेवाणीवर भारतीय रिर्झव्ह बँकेने घातलेली बंदी, सदर बँकेत हजारो ज्येष्ठ नागरिकांनी ठेवलेल्या ठेवी, सदर ठेवीवरील व्याज व मुद्दलही गेली तीन वर्षे ठेवीदारांना मिळत नाही. त्यामुळे त्यांची होणारी उपासमार, सदर बँकेतील कोटयावधी रुपयांचा आर्थिक घोटाळा करणारे पदाधिकारी पोलीस कारवाईच्या बाहेर असून त्यांच्यावर अफरातफरीची जबाबदारी निश्चित करतानाही होत असलेला विलंब, मध्यंतरी साऊथ इंडियन बँक ही अन्य बँकेत विलीन होणार अथवा कसे याबाबत सहकार विभाग मूग गिळून गप्प बसल्याने बँकेची सद्यस्थिती काय आहे, ठेवीदारांचे पैसे मिळणार की नाही याबाबत हजारो ठेवीदारात निर्माण झालेला संभ्रम, साऊथ इंडियन बँक सुरु होणार अथवा नाही याबाबत हजारो ठेवीदारांना दिलासा देण्यासाठी वस्तुनिष्ठ तात्काळ निवेदन करावे, अशी माझी सहकार खात्याला विनंती आहे".

---------

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : सर जे.जे.कॉलेज ऑफ आर्किटेक्ट या कॉलेजच्या प्राचार्यपदी मान्यताप्राप्त पदवी नसलेल्या व्यक्तीची झालेली नेमणूक.

**मु.शी.** : सर जे.जे.कॉलेज ऑफ आर्किटेक्ट या कॉलेजच्या प्राचार्यपदी मान्यताप्राप्त पदवी नसलेल्या व्यक्तीची झालेली नेमणूक या बाबत श्री.विनोद तावडे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

---

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सर जे.जे.कॉलेज ऑफ आर्किटेक्ट या कॉलेजच्या प्राचार्यपदी नियुक्ती देताना प्रा. राजन लकुले यांनी ऑनलाईन पीएच.डी. पदवी घेतली असल्याचे विद्यापीठाला कळवून राज्यातील सदर नावाजलेल्या महाविद्यालयावर प्राचार्यपदी नेमणूक करून घेतली आहे. या ॲशवूड युनिव्हर्सिटीच्या पदवीला यु.जी.सी. व ए.आय.सी.टी.ई. या संस्थेची मान्यता नसतानाही सदर प्राचार्य या पदावर आजपर्यंत रूजू आहेत. या संदर्भात कौन्सिल ऑफ आर्किटेक्चरचे रजिस्टार श्री.विनोद कुकार यांनी दिनांक 6 ऑक्टोबर, 2006 रोजी आझाद मैदान पोलीस स्टेशन येथे फौजदारी कारवाई करण्याबाबतची तक्रार दाखल केली आहे. मुंबई विद्यापीठांतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयांसाठी प्राचार्य पदी नियुक्त होणाऱ्या व्यक्तीला मान्यताप्राप्त पीएच.डी. पदवी घेण्याचे अनिवार्य असताना सदर महाविद्यालयातील प्राचार्यांनी मान्यता नसलेली पीएच.डी.पदवी घेतल्यानंतरही त्याची योग्य शहानिशा न करता तसेच कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर यांनी केलेल्या तक्रारीची दखल न घेता मुंबई विद्यापीठाने त्यांना सदर पदावर नियुक्त केले आहे, ही गंभीर बाब आहे. तसेच या संदर्भात विद्यापीठाच्या बोर्ड ऑफ स्टडीज या समितीने या डॉक्टरेट पदवीची प्राचार्य पदासाठी आवश्यकता नसल्याचे नमूद केले आहे. जे.जे.स्कूल ऑफ आर्किटेक्ट ही अत्यंत प्रतिष्ठेची संस्था आहे. या संस्थेमधून निर्माण होणारे विद्यार्थी हे प्रामुख्याने बांधकाम क्षेत्रात तज्ज्ञ म्हणून काम करतात. ज्याचा संबंध सामान्य जनतेच्या दैनंदिन जीवनाशी अत्यंत जवळचा आहे. अशा संस्थेचे प्राचार्य मान्यताप्राप्त नसलेली पदवी घेऊन प्राचार्य पदावर कार्यरत असणे हे मुंबई विद्यापीठाच्या दृष्टीने अयोग्य आहे. त्या संबंधात कुलगुरूं बरोबर एक संयुक्त बैठक झाली असताना याबाबत विभागीय चौकशी करण्याची कारवाई केली

...... 3ए 2 ...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. तावडे .....

जाईल असे सांगण्यात आले होते. पण त्यानंतर म्हणजे 4 सप्टेंबर 2006 पासून आज पर्यंत या संबंधात कोणतीही कारवाई केली गेली नाही. याबद्दल विद्यापीठाचा काय हेतू आहे हे लक्षात येत नाही. तेव्हा या संदर्भात शासनाने त्वरित चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी या विशेष उल्लेखाद्वारे मी करीत आहे.

***

..... 3ए 3 ...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मुंबईतील सर्वच शासकीय रूग्णालयात भूलतज्ज्ञांची कमतरता असणे.

**मु.शी.** : मुंबईतील सर्वच शासकीय रूग्णालयात भूलतज्ज्ञांची कमतरता असणे याबाबत श्री.संजय दत्त,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

--

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विशेष उल्लेखाची सूचना करीत आहे. मुंबई शहरातील सर्वसामान्य व गोरगरीब जनतेचा शासकीय रूग्णालय हाच मोठा आणि महत्त्वाचा आधार आहे. कारण त्यांना खाजगी रूग्णालयांमध्ये उपचार घेणे परवडणारे नाही. असे असताना मुंबईतील सर्व शासकीय रूग्णालयांमध्ये ॲनेस्थेसिस्ट म्हणजेच भूलतज्ज्ञांची मोठ्या प्रमाणात कमतरता निर्माण झालेली आहे. परिणामी जीटी रूग्णालय, जे.जे.रूग्णालय, कामा रूग्णालय, सेंट जॉर्जेस रूग्णालय या शासकीय रूग्णालयांतील ऑपरेशन थिएटर्स आठवड्यातून दोन दिवस बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. या शासकीय रूग्णालयांतून दरदिवशी सरासरी 150 शस्त्रक्रिया होत असताना गेल्या 5 दिवसांमध्ये केवळ 25 शस्त्रक्रिया झालेल्यो आहेत. तेव्हा या भूलतज्ज्ञांच्या कमतरतेमागील कारणे शोधून त्याबाबत तातडीने तोडगा काढण्याची आवश्यकता निर्माण आज झालेली आहे. म्हणून या संबंधात मी हा विशेष उल्लेख करीत आहे.

***

....... 3ए 4 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : सेवानिवृत्त शिक्षकांना वेळेवर निवृत्तीवेतन मिळत नसणे.

**मु.शी.** : सेवानिवृत्त शिक्षकांना वेळेवर निवृत्तीवेतन मिळत नसणे याबाबत श्री.प्रतापराव सोनवणे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

---

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.प्रतापराव सोनवणे यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. प्रतापराव सोनवणे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विशेष उल्लेख करीत आहे.

ज्या शिक्षकांनी नागरिक घडविण्यासाठी, नवीन पिढीला सुसंस्कृत बनविण्यासाठी आपली हयात घालविली, समाजासाठी ज्यांचे मोठे योगदान आहे अशा सेवानिवृत्त शिक्षकांना आज वृद्धापकाळात अनेक प्रश्नांना, अनेक व्याधींना सामोरे जावे लागत आहे. दैनंदिन गरजा भागविण्यासाठी, उपचारासाठी लागणाऱ्या पैशांसाठी त्यांना उधार पैसे मागत फिरावे लागते. त्यांच्या न्याय्य मागण्यांची पूर्तता शासनाकडून होत नाही. ही अत्यंत क्लेषदायक बाब असून शासनाला ती लांछनास्पद गोष्ट आहे. सभापती महोदय, सेवानिवृत्त शिक्षक त्यांच्याए विविध समस्या सोडविल्या जात नाहीत म्हणून सत्याग्रहाच्या तयारीत आहेत अशी माहिती सेवानिवृत्त संघटनेचे अध्यक्ष श्री.बाळासाहेब देशमुख यांनी नाशिक येथे नुकतीच दिली आहे. या सेवानिवृत्त शिक्षकांचे काही प्रलंबित प्रश्न आहेत. सेवानिवृत्तांचे निवृत्तीवेतन महिन्याच्या 5 तारखेच्या आत अदा करावे असा शासनाचा जी.आर. असूनही प्रत्यक्षात 15 ते 20 तारखेपर्यंत त्यांना निवृत्तीवेतन मिळत नाहीत. सन 1986 ते 1996 च्या दरम्यान सेवानिवृत्त ग्रेड पाच मुख्याध्यापकांना एक जादा वेतनवाढ देण्याचा जीआर निघालेला असूनही त्याची कार्यवाही होत नाही. सन 1986 च्या अगोदर ज्यांची नोकरी सलग 18 वर्षे झाली आहेत त्यांच्या वेतनश्रेणीत वाढ करण्याचा जीआर निघालेला असूनही त्याची कार्यवाही झालेली नाही. तसेच अंश राशीकरणाची जादा कापलेली रक्कम त्वरित परत मिळाली पाहिजे ही त्यांची एक प्रमुख मागणी आहे. शासनाने याबाबतीत गांभीर्याने लक्ष घालावे व सेवानिवृत्तांचे विविध प्रश्न तातडीने सोडवावेत आणि त्यांच्यावर आंदोलन करण्याची, सत्याग्रह करण्याची वेळ येऊ देऊ नये अशी मागणी मी या विशेष उल्लेखद्वारा करीत आहे.

****

( यानंतर श्री. सरफरे .....3बी 1 ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 289 अन्वये प्रस्तावावर करावयाच्या निवेदनासंबंधी**

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी सकाळी नियम 289 अन्वये प्रस्ताव मांडला होता. कॉंग्रेसच्या गुंडांनी शिवसेनेच्या नगरसेवकांना मारहाण केली व त्यांच्यावर हल्ला केला. त्या आरोपींना अद्यापि पकडण्यात आले नाही. यासंबंधी शासनाने संध्याकाळपर्यंत निवेदन करावे असे माननीय सभापतींनी निर्देश दिले आहेत. आता संध्याकाळचे साडे पाच वाजले असल्यामुळे शासनाकडून निवेदन होणे अपेक्षित आहे. त्यामुळे माननीय गृहमंत्र्यांना सभागृहामध्ये ताबडतोबीने बोलावून यासंबंधी निवेदन झाले पाहिजे.

**उपसभापती** : माननीय सभापतींनी दिलेले निर्देश शासनाने अंमलात आणावेत अशाप्रकारची सूचना मी शासनास करीत आहे.

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, होय.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कामकाज पत्रिकेमधील बाब क्र. आठ बाबत**

**उपसभापती** : आजच्या सभागृहाच्या कामकाजाच्या पत्रिकेतील बाब क्रमांक आठ वरील नियम 260 अन्वये प्रस्तावावर उद्या चर्चा घेण्यात येईल.

----

**पृ.शी.**: वाढत्या शहरीकरणामुळे कचऱ्याची विल्हेवाट करण्याचा उग्र होत असलेला प्रश्न

**मु.शी.**: वाढत्या शहरीकरणामुळे कचऱ्याची विल्हेवाट करण्याचा उग्र होत असलेला प्रश्न या विषयावर सर्वश्री मुझफ्फर हुसेन, सुधीर सावंत, भास्कर जाधव, राजन तेली, सर्वश्रीमती सुधा जोशी, मंदा म्हात्रे, श्री. संजय दत्त यांचा प्रस्ताव

श्री. मुझफ्फर हुसेन (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो.

"राज्यात मोठ्या प्रमाणात होणारे शहरीकरण, परिणामी नियोजनाअभावी शहरात निर्माण झालेल्या असुविधा, मुंबई, ठाणे, कोल्हापूर, सोलापूर, नागपूर या शहरातील कचऱ्याची विल्हेवाट करण्याचा उग्र होत असलेला प्रश्न, शहराच्या ठिकाणी डम्पिग ग्राऊंडसाठी जागेची उपलब्धता नसणे, जी डम्पिंग ग्राऊंड अस्तित्वात आहेत त्यांची साठवण क्षमता संपलेली असल्याने कचऱ्याचे डोंगर उभे असून मुंबईतील गोराई, मुलुंड, मालाड या भागात प्रदूषणामुळे मानवी शरीरावर विपरित परिणाम होत असणे, त्यामुळे प्रदूषण व निर्माण होणाऱ्या विविध वायुमुळे गॅसेसमुळे इलेक्ट्रॉनिक वस्तू वा संगणकावर ते परिणाम होत असून वेळोवेळी बंद पडत असल्याचे नुकत्याच एका पाहणीतून निदर्शनास येणे, शहरात निर्माण होणारा ओला, सुका कचरा, इलेक्ट्रॉनिक कचरा, वैद्यकीय साहित्यातून निर्माण होणारा कचरा नष्ट करण्यासाठी अथवा त्यावर प्रक्रिया करण्यासाठी कोणतीच यंत्रणा नसणे, सतत पडत असणारा कचरा उचलला न गेल्याने त्यावर उपजिविका

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुझफ्फर हुसेन...

करणाऱ्या प्राणी, कुत्रे यांची वाढत असलेली संख्या, या पाळीव प्राण्यांच्या हल्ल्याने नागरीकांचे होत असलेले मृत्यू, कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी प्रभावी यंत्रणा राबविण्यासाठी करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, घनकचरा व्यवस्थापनासंबंधीच्या चर्चेला सुरुवात करण्यापूर्वी माझी शासनाला विनंती आहे की, शासनाने या चर्चेचे गांभीर्य लक्षात घेऊन चर्चेमध्ये उपस्थित करण्यात आलेल्या मुद्दयांबाबत ठोकळेबाज उत्तर न देता ठोस उपाय योजना करण्याच्या दृष्टीने कारवाई करावी. व तशाप्रकारचे निवेदन शासनाने करावे अशी माझी शासनाला विनंती आहे.

**(सभापतीस्थानी मा. तालिका सभापती श्री. उल्हास पवार)**

सभापती महोदय, घनकचरा व्यवस्थापनाच्या संदर्भात शासनाने एक चांगली भूमिका स्वीकारुन या विषयामध्ये खूप मोठे काम करण्याचा प्रयत्न केला आहे. घनकचरा व्यवस्थापन म्हटल्यानंतर आपल्या नजरेसमोर फक्त कचरा येतो. परंतु या कचऱ्यामधून जो गॅस बाहेर निघतो त्यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडतो. याचे गंभीर परिणाम आपल्याला भोगावे लागतात. त्या अनुषंगाने चर्चेच्या माध्यमातून काही मुद्दे उपस्थित करण्याचा मी प्रयत्न करणार आहे. सभापती महोदय, अठराव्या शतकामध्ये जगामधील शहरीकरण फक्त अडीच टक्के होते. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला शहरीकरणामध्ये वाढ होऊन ते दहा टक्क्यापर्यंत पोहोचले. १९८५ मध्ये ते ४१ टक्के होते आणि २००५ मध्ये जगाच्या तुलनेत ५२ टक्के शहरीकरण झाले आहे. १९६१ साली आपल्या देशातील शहरीकरणाचे प्रमाण १७.९७ टक्के होते, १९७१ मध्ये ते १९.९१ टक्के होते.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसेन (पुढे सुरू...

सन 1981 साली 23.34 टक्के, 1991 साली 27.78 टक्के शहरीकरण देशाच्या पातळीवर झ ाालेले आहे. 1991 साली देशाची लोकसंख्या 84 कोटी 63 लाख 2 हजार 668 इतकी होती, सन 2001 साली ती 100 कोटी 27 लाख 15 हजार 207 झाली. आता 1991 साली महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या 7 कोटी 89 लाख 37 हजार 187 होती, सन 2000-01 मध्ये ही लोकसंख्या 9 कोटी 67 लाख 52 हजार 247 इतकी झाली. यामध्ये महाराष्ट्राचे शहरीकरण हे 46.41 टक्के इतके झाले. शहरीकरणाची ही टक्केवारी भारत देशात सर्वात जास्त आहे. जगाच्या पाठीवर 19 व्या शतकाच्या सुरूवातीला जो एनर्जीचा वापर होत होता, त्यामध्ये कोल 90 टक्के, लाकूड 9 टक्के आणि इतर 1 टक्के असे प्रमाण होते. त्याचा वापर होत असताना 1980 साली ऑईलचा वापर 40 टक्के, कोळशाचा 33 टक्के, लाकूडाचा 4 टक्के , वेस्ट 2 टक्के, हाईड्रो इलेक्ट्रीकचा वापर 2 टक्के, नॅचरल गॅसचा वापर 18 टक्के, न्युक्लीअर एनर्जीचा वापर 1 टक्के झाला. 2005 साली ऑईल, कोळसा, नॅचरल गॅसचा वापर करण्यामध्ये खूप मोठी वाढ झाली. या सर्व बाबीमुळे बिघडलेल्या पर्यावरणामुळे जगामध्ये ग्लोबल वार्मिगची फार मोठी समस्या निर्माण झाली आहे. याबाबत इंटर गव्हर्नमेंट पॅनेल चेन यांनी तयार केलेल्या अहवालानुसार वॉर्मिंगचा परिणाम गरीब व मागासलेल्या देशामध्ये सर्वात जास्त होणार आहे. पर्यावरणाचा समतोल बिघडल्याची अनेक कारणे आहेत त्यामध्ये वाढते शहरीकरण, औद्योगिकरण, ग्रीन हाऊसेस, गॅसेस बर्निंग, एनर्जी निर्माण करण्याकरिता वापरण्यात येणारे इंधन, गेसेस त्याचबरोबरल पेट्रोलियम प्रोडक्ट यामुळे निर्माण होणारा कार्बनडाय ऑक्साईड, कार्बन मोनोऑक्साईड यामुळे मानवी आरोग्याला गंभीर धोका निर्माण झालेला आहे.

सभापती महोदय, 1992 साली भारतीय घटनेमध्ये 74 वी घटना दुरूस्ती झाली. या दुरूस्तीनुसार घटनेला 12 वी सूची जोडली. त्या सूचीनुसार घनकचरा व्यवस्थापनाची जबाबदारी नागरी स्वराज्य सस्थेकडे सोपविण्यात आली. तसेच महानगरपालिका, नगरपालिका कायद्याप्रमाणे घनकचरा व्यवस्थापनाची जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात आली. 1994 च्या जवळपास सुरतमध्ये प्लेगची साथ आलेली होती, याची सर्वांना कल्पना आहे. देशात सर्वात मोठी प्लेगची साथ सुरतमध्ये झालेली होती. त्याचा परिणाम संपूर्ण देशामध्ये पहायला मिळाला, त्याचे पडसाद देशामध्ये, समाजामध्ये उमटले होते...

यानंतर श्री.बरवड....

श्री. मुझफ्फर हुसेन.....

हे सर्व आपल्या नजरेसमोर आहे. या अनुषंगाने श्रीमती अल्मित्रा पटेल यांनी सर्वोच्च न्यायालयामध्ये एक याचिका दाखल केली होती. त्या अनुषंगाने सर्वोच्च न्यायालयाने बर्मन समितीची स्थापना केली. बर्मन समितीने घनकचरा व्यवस्थापनाच्या बाबतीत संपूर्ण देशाच्या परिस्थितीचा अहवाल तयार केला आणि तो अहवाल सर्वोच्च न्यायालयाला सादर केला. त्या अहवालाच्या अनुषंगाने सर्वोच्च न्यायालयाने केंद्र शासनाला डायरेक्शन्स दिल्या आणि त्या डायरेक्शसच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाने नागरी घनकचरा नियम, 2000 तयार केले. त्याला म्युनिसिपल सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट ॲण्ड हॅंडलिंग रुल्स, 2000 असे म्हटले जाते. या नियमामध्ये घनकचऱ्याची विल्हेवाट कशी लावावी, ते कसे गोळा करावे तसेच फक्त घरगुती कचराच नाही तर बायोमेडिकल वेस्ट, इंडस्ट्रियल वेस्ट गोळा करण्याची पध्दत आणि अगदी सुरुवातीपासून म्हणजे कचरा निर्माण होतो तेव्हापासून तर त्याचा शेवट शास्त्रीय पध्दतीने कसा करावयाचा, ते कसे गोळा करावयाचे यासाठी कशी यंत्रणा उभी करावयाची, त्याला निधी कसा उपलब्ध करुन द्यावयाचा या सर्व बाबतीत या रुल्समध्ये उल्लेख आहे. बर्मन समितीने अहवाल सादर करीत असताना त्या अहवालामध्ये महाराष्ट्रातील 40 "अ" वर्ग शहरांचा उल्लेख केलेला आहे. त्या अहवालानुसार या नियमांची अंमलबजावणी सन 2003 पर्यंत करण्याची सक्ती राज्यातील 40 "अ" वर्ग शहरांना केली होती. या नियमांच्या अनुषंगाने राज्य शासनाने वेळोवेळी घनकचरा व्यवस्थापनाचे आदेश स्थानिक स्वराज्य संस्थांना दिलेले आहेत. सन 2001 पासून राज्य शासनाला केंद्र शासनाकडून दरवर्षी सुमारे 158 कोटी रुपयांचे अनुदान मिळालेले आहे. आजपर्यंत राज्य शासनाने ते अनुदान सर्व स्थनिक स्वराज्य संस्थांना दिलेले आहे. या वर्षी सुध्दा शासनाने एकूण 40 कोटी रुपयांचे अनुदान 27 डिसेंबर, 2006 ला जी. आर. काढून वितरित केलेले आहे. केंद्राच्या बाराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार पुढील पाच वर्षासाठी म्हणजे सन 2005 ते 2010 पर्यंत प्रत्येक वर्षी 158 कोटी रुपये राज्य शासनाला अनुदानाच्या रुपाने प्राप्त होणार आहेत आणि प्राप्त झालेल्या अनुदानापैकी 56 टक्के अनुदान घनकचरा व्यवस्थापनासाठी खर्च करावयाचे आहेत. खरे म्हणजे राज्य शासन अभिनंदनास पात्र आहे. केंद्र सरकारने जी घटना दुरुस्ती केली, जे नियम तयार केले त्या सर्व

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

श्री. मुझफ्फर हुसेन .......

नियमांची अंमलबजावणी करण्याच्या बाबतीत वेळोवेळी जी.आर. काढून, परिपत्रके काढून, आदेश काढून वेगवेगळ्या पध्दतीने राज्य शासनाने निश्चितपणे यामध्ये पुढाकार घेतलेला आहे. जी काही कमतरता आहे त्याबाबत मी माझ्या भाषणात नंतर सांगणार आहे. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर अंमलबजावणी यंत्रणा कशी चुकलेली आहे ते मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, शासनाने सन 2002 मध्ये सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट सेलची निर्मिती केली. त्या सेलचे सिनियर सल्लागार म्हणून आय.ए.एस. अधिकारी नेमले. त्या ठिकाणी राज्य शासनाने अतिशय कार्यक्षम आणि चांगल्या अधिकाऱ्याची नेमणूक केली. त्या सेलची जबाबदारी काय होती आणि काय आहे ? विशेषत: स्थानिक स्वराज्य संस्थांना मार्गदर्शन करणे, याबाबतीत प्रोजेक्ट तयार करणे, त्याला मंजुरी देणे, त्याची अंमलबजावणी करणे, त्याबाबतीत प्रशिक्षण देणे, सल्ला देणे इत्यादी जबाबदाऱ्या होत्या. शासनाने फक्त सेलचीच निर्मिती केली असे नाही तर त्या सेलला काम करण्याकरिता निधी सुध्दा उपलब्ध करुन दिलेला आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 17:45

(श्री. मुझफ्फर हुसेन...

हा सेल काम करण्याचे प्रयत्न करीत आहे. शासन एवढ्यावरच थांबलेले नाही तर अधिका-यांना देखील प्रशिक्षण दिलेले आहे. या घनकचरा व्यवस्थापनाच्या संदर्भात शासनाने सन 2002मध्ये 10 अधिका-यांना अमेरिकेला प्रशिक्षणाला पाठविले. दोन चिफ ऑफिसर्स्ना जर्मनीला 1 वर्षाकरिता प्रशिक्षणासाठी पाठविले, 18 चिफ ऑफिसर्स्ना श्रीलंकेमध्ये प्रशिक्षणासाठी पाठविले. सभापती महोदय, मी देखील श्रीलंकेतील कोलंबो येथे जाऊन आलो आहे. श्रीलंकेमध्ये घनकच-याचे व्यवस्थापन अतिशय चांगल्या पध्दतीने केले जाते. आता प्रश्न असा उपस्थित होतो की, आपण ज्या ज्या अधिका-यांना परदेशामध्ये प्रशिक्षणासाठी पाठविले त्या अधिका-यांचा राज्य शासन आज कोणता उपयोग करुन घेत आहे ? या संदर्भात राज्य शासनाने राज्यातील सर्व महसुली विभागामध्ये कार्यशाळा आयोजित केल्या होत्या. त्यामध्ये जिल्हाधिकारी आणि आयुक्त यांचाही समावेश होता. त्याचप्रमाणे राज्य शासनाने प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली एक सॉलिड वेस्ट मॅनेजमेंटसाठी दिनांक 26.8.2003 च्या शासन निर्णयानुसार एक समिती नेमलेली होती. तसेच दिनांक 2.9.2003च्या शासनादेशान्वये जिल्हाधिका-यांना डम्पिंग ग्राऊंडसाठी जागा उपलब्ध करुन देण्याचे अधिकार दिलेले आहेत. दिनांक 20.2.2004च्या शासन निर्णयानुसार प्रत्येक आमदाराला घनकचरा व्यवस्थापनाच्या संदर्भात 10 लाख रु. खर्च करण्याची परवानगी दिलेली आहे. या घनकचरा व्यवस्थापनाच्या संदर्भात शासनाने मोठया प्रमाणावर पुढाकार घेऊन या कामाला चालना देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे. असे असतानाही राज्यामध्ये घनकचरा व्यवस्थापनाच्या संदर्भातील परिस्थिती चांगली नाही. महाराष्ट्र राज्यामध्ये एकूण 22 महानगरपालिका, 222 नगरपालिका, 33 जिल्हा परिषदा, 339 पंचायत समित्या आणि 27946 ग्रामपंचायती आहेत. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत राज्यातील जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती आणि नगरपालिकांनी फार चांगली कामे केलेली असून काहींना पारितोषिकेही मिळालेली आहेत. इतके असूनही राज्यामध्ये डम्पिंग ग्राऊंडच्या बाबतीत झालेले काम निराशाजनक आहे. राज्याच्या एकूण लोकसंख्यापैकी 42.40 टक्के जनता ही नागरी भागात रहाते. म्हणजे 2 कोटी 90 लाख लोक हे शहरात म्हणजे महानगरपालिकांच्या क्षेत्रात राहातात. 1 कोटी 30 लाख लोक हे नगरपालिकांच्या क्षेत्रात राहातात. या शहरी भागात दररोज

...2..

(श्री. मुझफ्फर हुसेन...

16 हजार 872 मे.टन म्हणजे 1 कोटी 68 लाख 872 हजार किलो कचरा या शहरातून निर्माण होतो. या घनकचरा व्यवस्थापनासाठी सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट रुल्स आणि सेल तयार केलेले आहेत. त्यांच्याकडून पर कॅपिटा जनरेशन ऑफ वेस्ट संबंधीची माहिती मी घेतलेली आहे. 1 ते 5 लाख लोकसंख्या असलेल्या भागामध्ये पर कॅपिटा वेस्ट 200 ग्रॅम आहे. 5 ते 10 लाख लोकसंख्या असलेल्या भागामध्ये हे प्रमाण 250 ग्रॅम आहे. 10 ते 15 लाख लोकसंख्येच्या भागामध्ये हे प्रमाण 270 ग्रॅम आहे, 20 ते 50 लाख लोकसंख्या असलेल्या भागामध्ये हे प्रमाण 350 आणि 50 लाखाच्या वरील लोकसंख्या असलेल्या भागामध्ये जनरेशन ऑफ पर कॅपिटा वेट हे 500 ग्रॅम आहे. सॉलिड वेस्ट मॅनेजमेंटकडे ही आकडेवारी उपलब्ध आहे. राज्याच्या ग्रामीण भागाचा नगरविकास खात्याशी संबंध येत नसला तरी एकूणच राज्याची चर्चा या ठिकाणी मी करीत आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MHM/ 17:50

श्री.मुझफ्फर हुसेन.............

म्हणून ग्रामीण भागात किती कचरा निर्माण होतो त्याबाबत कोणतेही इनिशिएटिव्ह घेतलेले नाही असे चित्र आहे. 15 हजार मे.टन राज्याच्या उर्वरित ग्रामीण भागात कचरा निर्माण होतो. राज्यातील वर्ग.1 शहरांमध्ये 15 ते 20 टक्के लोक झोपडपट्टयांमध्ये राहतात. दररोज जमा करण्यात येणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण पाहता झोपडपट्टी भागातील 100 टक्के कचरा वाहून नेला जात नाही. तेथील कचरा गटारे व नाल्यांमध्ये साचलेला असतो. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना पावसाळा सुरु होण्यापूर्वी झोपडपट्टी भागातील गटारे, नाले साफ करण्याची विशेष मोहीम हाती घ्यावी लागते व या कामासाठी लक्षावधी रुपयांची रक्कम खर्ची पडते. शहरांच्या काही भागात कचरा जमा करण्यासाठी कचरा पेट्या ठेवल्या जातात. त्या पेट्यांची क्षमता कमी असल्याने त्यांच्या भोवती कचरा पडलेला असतो. अशा ठिकाणी मोकाट कुत्री अन्नपदार्थ खाण्यासाठी जमलेली असतात. ती कुत्री रस्त्यावरुन येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांना, विशेषतः लहान मुलांना चावतात. राज्याच्या 22 महानगरपालिकांकडून मोकाट कुत्र्यांची संख्या व निर्बीजीकरण केलेल्या कुत्र्यांची माहिती मागविली असता फक्त 15 महानगरपालिकांनी अंदाजे माहिती दिली. ती माहिती मी सभागृहाच्या माहितीसाठी वाचून दाखवितो. नाशिक महानगरपालिका क्षेत्रात मोकाट कुत्र्यांची संख्या 36000 व निर्बीजीकरण केलेल्या कुत्र्यांची संख्या शून्य आहे. जळगाव महानगरपालिका क्षेत्रात मोकाट कुत्र्यांची संख्या 36000 व निर्बीजीकरण केलेल्या कुत्र्यांची संख्या शून्य आहे. महानगरपालिका क्षेत्रात मोकाट कुत्र्यांची संख्या 36000 व निर्बीजीकरण केलेल्या कुत्र्यांची संख्या शून्य आहे. जळगाव महानगरपालिका क्षेत्रात मोकाट कुत्र्यांची संख्या 10000 व निर्बीजीकरण केलेल्या कुत्र्यांची संख्या 32 आहे. अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रात मोकाट कुत्र्यांची संख्या 9000 व निर्बीजीकरण केलेल्या कुत्र्यांची संख्या शून्य आहे. नांदेड महानगरपालिका क्षेत्रात मोकाट कुत्र्यांची संख्या 3500 व निर्बीजीकरण केलेल्या कुत्र्यांची संख्या शून्य आहे. अमरावती महानगरपालिका क्षेत्रात मोकाट कुत्र्यांची संख्या 3500 व निर्बीजीकरण केलेल्या कुत्र्यांची संख्या शून्य आहे. अकोला महानगरपालिका क्षेत्रात मोकाट कुत्र्यांची संख्या 2200 व निर्बीजीकरण केलेल्या कुत्र्यांची संख्या शून्य आहे. नागपूर महानगरपालिका क्षेत्रात मोकाट कुत्र्यांची संख्या 34000 व निर्बीजीकरण केलेल्या कुत्र्यांची संख्या 3243 आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात मोकाट कुत्र्यांची संख्या 8000 व निर्बीजीकरण केलेल्या कुत्र्यांची संख्या 7563 आहे.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसेन............

म्हणजे माहिती देताना सुध्दा किती वैचारिक दृष्टीने विचार करुन 8000 पैकी 7500 कुत्र्यांचे निर्बीजीकरण केले. कोणी म्हणतो आम्ही निर्बीजीकरण केलेलेच नाही. सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका क्षेत्रात मोकाट कुत्र्यांची संख्या 9000 व निर्बीजीकरण केलेल्या कुत्र्यांची संख्या 990 आहे. कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रात मोकाट कुत्र्यांची संख्या 2000 व निर्बीजीकरण केलेल्या कुत्र्यांची संख्या शून्य आहे. भिवंडी-निजामपूर महानगरपालिका क्षेत्रात मोकाट कुत्र्यांची संख्या 9000 व निर्बीजीकरण केलेल्या कुत्र्यांची संख्या 4800 आहे. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात मोकाट कुत्र्यांची संख्या 42000 व निर्बीजीकरण केलेल्या कुत्र्यांची संख्या 830 आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मोकाट कुत्र्यांची संख्या 10200 व निर्बीजीकरण केलेल्या कुत्र्यांची संख्या 3852 आहे. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील मोकाट कुत्र्यांच्या संख्येची माहिती उपलब्ध नाही. परंतु निर्बीजीकरण केलेल्या कुत्र्यांची संख्येची माहिती 2200 आहे. धुळे महानगरपालिकेने दोन्ही बाबतीत माहिती दिलेली नाही. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने दोन्ही बाबतीत माहिती दिलेली नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेने उत्तर दिले की, अंदाजे 5 लाख मोकाट कुत्र्यांची संख्या असून त्यापैकी निर्बीजीकरण केलेल्या कुत्र्यांची संख्या अंदाजे 82600 इतकी आहे. माझ्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार या महानगरपालिका क्षेत्रात एकूण 6,17,400 मोकाट कुत्र्यांची संख्या असून त्यापैकी 1,06,110 कुत्र्यांचे निर्बीजीकरण करण्याचे काम आजपर्यंत करण्यात आलेले आहे.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुझफ्फर हुसेन....

यामुळे कुत्रे चावण्याचे प्रमाण वाढले असून कुत्रे चावून माणसे मृत्युमुखी पडण्याच्या संख्येतही लक्षणीय वाढ झालेली आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासन मोकाट कुत्र्यांच्या संदर्भात कोणती उपाययोजना करणार आहे असा प्रश्न निर्माण झालेला आहे. सभापती महोदय, मागील काही दिवसापूर्वी मी आणि सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी मोकाट कुत्र्याच्या संदर्भात एक लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. त्यावेळी शासनातर्फे सांगण्यात आले होते की, "या बाबतीत केंद्रशासनाने कायदा केलेला असल्यामुळे यासंदर्भात आम्हाला काही करता येणार नाही. कुत्र्यांच्या निर्बीजीकरणाच्या कामाला हात घातल्यामुळे आता खूप चांगले चित्र आपल्या समोर येईल" परंतु सभापती महोदय, कुत्र्यांचे निर्बीजीकरणाचे काम कशा पध्दतीने सुरु आहे याची आपल्याला कल्पना आहे. केंद्रशासनाने निर्बीजीकरणाच्या संदर्भात कायदा केला असला तरी त्या कायद्याचा, जर आपल्याला त्रास होत असेल, जनतेला त्रास होत असेल तर अशा कायद्यामध्ये सुधारणा करण्याच्या संदर्भात राज्यशासनाने केंद्रशासनाकडे पाठपुरावा केला पाहिजे, केंद्रशासनास कायदा बदलविण्यास भाग पाडले पाहिजे. या सदनामध्ये कायदा बनविण्याचे काम केले जाते. हे सदन म्हणजे कायदा बनविण्याचे मंदिर आहे. कुत्रा चावल्यामुळे एकूण किती माणसे मेली याची ऑथेंटीक माहिती माझ्याकडे नाही परंतु केंद्रशासनाने कुत्र्यांचे निर्बीजीकरणाचा कायदा केल्यामुळे रेबीजच्या औषधांवर किती खर्च झाला याची माहिती माझ्याकडे आहे. संपूर्ण देशभरात केंद्रशासनाचा कायदा नव्हता तेव्हा रेबीजची 200 कोटी रुपयांची औषधे विकली जात होती परंतु केंद्रशासनाने निर्बीजीकरणाचा कायदा केल्यामुळे संपूर्ण देशात रेबीजची औषधे 1500 कोटी रुपयांच्यावर विकली गेली. रेबीजची औषधे स्थनिक स्वराज्य संस्था, महानगर पालिका, नगरपरिषदा तसेच राज्यशासनामार्फत उपलब्ध करुन दिली जातात किंवा खाजगीमध्ये सुध्दा उपलब्ध करुन दिली जातात. सभापती महोदय, इ टीव्हीवर 4 दिवसापूर्वी बातमी होती की, एका व्यक्तीला कुत्रा चावल्यामुळे त्या व्यक्तीला हॉस्पिटलमध्ये भरती करण्यात आले परंतु त्या हॉस्पिटलमध्ये रेबीजचे औषध नसल्यामुळे सदर व्यक्तीवर उपचार करण्यात आले नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे बजेट एखाद्या छोटया राज्यापेक्षाही मोठे आहे. अशी परिस्थिती असतांना मुंबईमधील पसरलेल्या कच-यावर मोकाट कुत्र्यांचे कसे साम्राज्य आहे यासंदर्भात वर्तमानपत्रात फोटो छापून येत असतात तसेच यासंदर्भात

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुझफ्फर हुसेन....

अग्रलेख सुध्दा येत असतात. मी राज्यातील 22 महानगरपालिकांकडून डम्पिंग ग्राऊंडच्या संदर्भात तसेच डम्पिंग ग्राऊंडच्या संदर्भात केंद्रशासनाचे नॉर्म्स काय आहेत यांची माहिती उपलब्ध करुन घेतली आहे. काही महापालिकांनी या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. महापालिका कडून माझ्याकडे जी काही माहिती आलेली आहे ती माहिती मी आपल्या समोर ठेवत आहे. धुळे महानगरपालिकेला डम्पिंग ग्राऊंड आहे परंतु डम्पिंग ग्राऊंड केंद्रशासनाच्या नियमानुसार नाही. जळगाव महानगरपालिकेला डम्पिंग ग्राऊंड नाही तसेच ते डम्पिंग ग्राऊंड केंद्रशासनाच्या नियमानुसार नाही. अहमदनगर महानगरपालिकेला डम्पिंग ग्राऊंड आहे परंतु ते डम्पिंग ग्राऊंड केंद्रशासनाच्या नियमानुसार नाही. नांदेड महानगरपालिकेला डम्पिंग ग्राऊंड आहे परंतु ते डम्पिंग ग्राऊंड केंद्रशासनाच्या नियमानुसार नाही. अमरावती महानगरपालिकेला डम्पिंग ग्राऊंड आहे परंतु हे डम्पिंग ग्राऊंड सुध्दा केंद्रशासनाच्या नियमानुसार नाही. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला डम्पिंग ग्राऊंड आहे परंतु डम्पिंग ग्राऊंड केंद्रशासनाच्या नियमानुसार नाही.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसेन.............

भिवंडी महानगरपालिका -डम्पींग ग्राऊंड आहे, परंतु ते केंद्र सरकारच्या नियमानुसार नाही. कल्याण-डोंबिवली महानगरपालिका- डम्पींग ग्राऊंड आहे, केंद्र सरकारच्या नियमानुसार नाही. उल्हासनगर महानगरपालिका - डम्पींग गाऊंड नाही. मीरा-भाईंदर महानगरपालिका - डम्पींग ग्राऊंड आहे, केंद्र सरकारच्या नियमानुसार नाही. सांगली-मिरज महानगरपालिका - डम्पींग ग्राऊंड आहे, केंद्र सरकारच्या नियमानुसार नाही.

सभापती महोदय, मीरा-भाईंदर महानगरपालिका माझ्या क्षेत्रातील आहे. मीरा-भाईंदर येथे डम्पींग ग्राऊंड होऊ नये म्हणून तेथील स्थानिक लोकांचा विरोध होता, राजकीय हस्तक्षेप होत होता. परंतु चार वर्षाच्या संघर्षानंतर तेथे डम्पींग ग्राऊंड झालेले आहे. पोल्यूशन कंट्रोल बोर्डाने प्रायोगिक तत्वावर 250 टन धन कचऱ्यास मंजुरी देणे आवश्यक आहे. परंतु आम्हाला फक्त 50 टन घटकचऱ्यास मंजुरी दिली. सॉलीड वेस्ट मॅनेजमेंटच्या नियमानुसार त्वरित परवानगी देणे आवश्यक आहे. मीरा-भाईंदर येथे जवळपास 500 टन घनकचरा निघत आहे. आम्ही मोर्चा काढल्यानंतर आयुक्तांनी डम्पींग ग्राऊंडच्या कामास सुरुवात केली. आता साधारणत: 75 हेक्टरक्षेत्रावर हे डम्पींग ग्राऊंड होत आहे. त्याचे काम जून पर्यंत पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे. परंतु आता एम.टी.डी.सी.ने सांगितले आहे की, हा विभाग स्पेशल टयुरिझम झोन घोषित झालेला आहे. त्यामुळे तेथे डम्पींग ग्राऊंड करता येणार नाही. परंतु नगर विकास विभागाने डी.सी.रुलमधील 37 खाली मीरा-भाईंदर येथील काही भाग डम्पींग ग्राऊंडसाठी आरक्षित केलेला आहे. त्यामुळे एम.टी.डी.सी. आता हा प्रश्न का निर्माण करीत आहे, याठिकाणी असलेला डम्पींग ग्राऊंड बंद करायचा आहे काय ?

सभापती महोदय, सांगली महानगरपालिका- डम्पींग ग्राऊंड आहे, केंद्राच्या नियमानुसार नाही. अकोला महानगरपालिका - डम्पींग ग्राऊंड आहे, केंद्राच्या नियमानुसार नाही. नागपूर महानगरपालिका - डम्पींग ग्राऊंड आहे, केंद्राच्या नियमानुसार नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसेन.............

सभापती महोदय, मागील एक वर्षापासून 22 महानगरपालिकांकडून ही माहिती मिळविण्यासाठी मी सातत्याने पाठपुरावा करीत आहे. विधानपरिषदेचा एक सदस्य माहिती मागवीत आहे आणि आपण माहिती देऊन त्यांच्यावर उपकार करीत आहोत अशा पध्दतीने मला माहिती देण्यात आली. औरंगाबाद,सोलापूर, पुणे, ठाणे, या महानगरपालिकांना माझ्या पत्रांना उत्तरे देण्यास वेळ मिळाला नाही. मी नवी मुंबई महानगरपालिकेकडे 22 मुद्यांच्या संदर्भात माहिती मागविली होती. त्यांनी मला पत्राद्वारे कळविले की, "उपरोक्त विषयाच्या संदर्भात आपण मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक 9 ची माहिती आरोग्य विभागाशी संबंधित आहे. सदर माहिती खालीलप्रमाणे आहे. "......42 हजार कुत्रे असून त्यापैकी 830 कुत्र्यांचे निर्बिजीकरण करण्यात आलेले आहे. मी 22 प्रश्नांच्या संदर्भात माहिती मागितली होती त्यापैकी फक्त एक प्रश्नांची माहिती दिलेली आहे, अशी परिस्थिती आहे.

सभापती महोदय, बृहन्मंबई महानगर पालिकेच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर ती देशातील सर्वात मोठी महानगरपालिका आहे. या महानगरपालिकेचे उत्पन्न एका लहान राज्याच्या बरोबरीचे आहे. मुंबई हे जागतिक दर्जाचे शहर आहे. या शहरातील मुलुंड, गोराई आणि देवनार येथे कचरा भूमीभरणासाठी टाकला जातो. हे भूमीभरण शास्त्रोक्त पध्दतीने आणि नियमानुसार नाही. गोराई येथील डम्पींग ग्राऊंड सीआरझेडने बाधित असून मार्शी लँड आहे. तेथे अंदाजे 20 लाख मेट्रीक टन कचऱ्याचा साठा पडून आहे. त्या कचऱ्यावर कोणतीही प्रक्रिया केलेली नाही. माननीय उच्च न्यायालयाने गोराई येथील 20 लाख टन कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी National Environmental Engineering Institute व Solid Waste Expert यांची नियुक्ती केली होती. त्यांनी केलेल्या सुचनांची अंमलबजावणी न करता मुंबई महानगरपालिकेने I.S.L.F.S ( Infrastructure Leasing and Financial Support ) या आर्थिक व्यवहार करणाऱ्या एका कंपनीला कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचे काम दिलेले आहे.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसेन....

उपलब्ध असलेल्या माहितीनुसार मुलूंड येथे असलेला कचरा त्यावेळी एमएसडब्ल्यू बायो-मिथोनेल प्रकल्प करण्यासाठी योजना विचाराधीन आहे. ही योजना उत्तर प्रदेश राज्यातील लखनौ शहरामध्ये यशस्वी झालेली नाही. चिंचोली-गोरेगांव येथे सन 1990 ते 2001 पर्यंत अंदाजे 26 लाख टन कचरा टाकण्यात आला. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार त्याठिकाणचे डम्पिंग ग्राऊंड अनसायटींग पध्दतीने बंद करण्यात आले होते. या कच-यावर कोणत्याही प्रकारची प्रक्रिया करण्यात आलेली नाही. Municipal Solid Waste Management And Handling Rules 2000 मध्ये डम्पिंग ग्राऊंड कसे असावे, याबाबतचे नियम दिलेले आहेत. विशेषत:, लोकवस्तीपासून डम्पिंग ग्राऊंड हे दूर असावेत, ते पाण्याच्या स्त्रोतापासून, वेस्ट लॅण्डपासून दूर असले पाहिजेत. त्याचप्रमाणे डम्पिंग ग्राऊंडच्या सभोवती न विकास क्षेत्र राखून ठेवले पाहिजे, अशाप्रकारचे नियम त्यामध्ये आहेत. परंतु डम्पिंग ग्राऊंडच्याभोवती मागील काही वर्षात केंद्र सरकारच्या नियमांचा भंग करुन मोठया प्रमाणत विकास कामे झालेली आहेत. त्यामुळे या परिसरात राहत असलेल्या रहिवाशांमध्ये मोठयाप्रमाणात आजार होत असल्याचे दिसून आल्यावर नॅशनल सॉलिड वेस्ट असोसिएशन ऑफ इंडिया यांनी कारणे शोधली असता, त्यांनी असा निष्कर्ष काढला की, ही परिस्थिती त्या परिसरामध्ये असलेल्या डम्पिंग ग्राऊंडमुळे झाली असून त्यातून आरोग्याला घातक असे गॅसेस तयार होत आहेत. त्यातून सल्फरडाय ऑक्साईड, ऑक्साईड नायट्रोजन, कॉर्बनडाय ऑक्साईड, हायड्रोजन सल्फर, मिथेल अशाप्रकारचे आरोग्यास अपायकारक गॅसेस बाहेर पडत आहेत. ही माहिती नॅशनल सॉलिड वेस्ट असोसिएशन ऑफ इंडियाने दिलेली असून ही केंद्र शासनाची ॲप्रुव्हर्ड असलेली एजन्सी आहे. अशाप्रकारची डम्पिंग ग्राऊंडची स्थिती मुंबईमध्येच आहे अशात भाग नाही, राज्यातील सर्व डम्पिंग ग्राऊंडची अशीच स्थिती आहे. महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने दिनांक 26 ऑक्टोबर, 2006 च्या शासन निर्णयाने महापालिका व नगरपालिका क्षेत्रातील घणकचरा विल्हेवाटीसंबंधी कालबध्द कार्यक्रम ठरवून दिलेला होता. तो कालावधी संपण्यास एकच दिवस उरलेला आहे. मग, याठिकाणी भूमी भरण्याचा प्रकल्प कसा पूर्ण होणार ? केंद्र सरकारने तयार केलेल्या नियमांतील तरतुदीनुसार घणकचरा व्यवस्थापन करणे बंधनकारक आहे. या नियमातील कलम 15 मधील तरतुदीचा भंग केलेल्या

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसेन....

संबंधीत अधिकाऱ्यास 5 वर्षांचा कारवास अथवा एक लाख रुपये दंड अथवा दोन्ही शिक्षा विहित करण्यात आलेल्या आहेत. राज्यात ज्या अधिकाऱ्यांनी केंद्र सरकारच्या आणि राज्य शासनाच्या आदेशाचे पालन केले नाही...

नंतर कु.गायकवाड...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुझफ्फर हुसेन .....

अशा अधिकाऱ्यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे, असा प्रश्न मी या ठिकाणी उपस्थित करीत आहे. चिंचोली, गोरेगाव येथे घनकचऱ्यावर कोणत्याही प्रकारची प्रकिया न करता तसेच बफर झोन ठेवण्याचे बंधन न पाळता तेथे अनेक विकास कामांना शासनाकडून परवानगी दिलेली आहे.या बफर झोन संबंधात व चालू असलेल्या बांधकामासंबंधात शासन काय कारवाई करणार आहे ? केंद्रीय शासनाच्या नियमांचे उल्लंघन करुन बफर झोनमध्ये विकास कामांना ज्या अधिकाऱ्यांनी मंजूरी दिलेली आहे अशा सर्व अधिकाऱ्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ? या संपूर्ण घनकचऱ्याच्या व्यवस्थापनाच्या संदर्भात ज्या स्थानिक स्वराज्य संस्थां व अधिकाऱ्यांनी कामे केलेली नाही, असे जे अधिकारी दोषी आहेत, त्यांच्यावर शासन कारवाई करणार आहे की नाही, असा प्रश्न मी या सभागृहात उपस्थित करु इच्छितो. सभापती महोदय आपण मला या सदनात बोलण्याची संधी दिली,त्यामुळे या विषयावर मी प्रकाश टाकू शकलो. याबाबत आपले धन्यवाद व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले ): सभापती महोदय, श्री. मुझफ्फर हुसेन यांनी अस्खलित मराठी भाषेमध्ये भाषण करुन आपला विषय मांडला, त्याबाबत मी त्यांचे मनापासून आभार व्यक्त करतो व अभिनंदन करु इच्छितो. काँग्रेसचे सदस्य सुध्दा अभ्यासपूर्ण विचार व्यक्त करु शकतात, हे त्यांनी दाखवून दिले आहे. इतर सदस्यांनी देखील असाच प्रयत्न करावा. श्री. मुझफ्फर हुसेन यांनी जे मुद्दे मांडले, त्याचा गाभा अत्यंत महत्वाचा आहे. हा विषय सभागृहात मांडण्याच्या मागे सरकारला दोष देण्याऐवजी सरकारने उपाययोजना न करण्याची कारणे शोधणे, असा श्री. मुझफ्फर हुसेन यांचा उद्देश होता. आपण आम्हाला संपूर्ण महाराष्ट्रात फिरवून आणले व राज्यामध्ये किती कचरा निर्माण झाला आहे, त्याचे दर्शनच आम्हाला घडविले. सन्माननीय सदस्यांनी धनकचऱ्याच्या संदर्भात विषय मांडतांना कचऱ्यावर उपजीविका करणाऱ्या प्राणी, भटके कुत्रे यांची वाढत असलेल्या संख्या या विषयी देखील त्यांनी काही चांगले मुद्दे मांडले.

यानंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते......

विषयाचे गांभीर्य एवढयाकरिता मांडतो आहे की, मागे या विषयावर आपण चर्चा केली होती, मुंबईच्या संदर्भात देखील हा विषय विस्तृतपणे मी मांडला होता. कचरा हा विषय असा आहे की, जेथे माणसे आहेत, प्राणी आहेत तेथे कचरा आहे. कच-याची विल्हेवाट कशी लावावी ? माणसे असून आपण ती लावू शकत नाही, हा त्यातील महत्वाचा भाग आहे. 'वाईल्ड ॲनिमल' म्हणून एक दूरचित्रवाणीचे चॅनल आहे. त्यामध्ये एक सुंदर घटना दाखविली होती. एक रानरेडा असतो, त्याची वाघाकडून शिकार केली जाते. शिकार केल्यानंतर पहिल्या दिवशी तो वाघ रक्त पितो, दुस-या दिवशी थोडे मांस खाण्यासाठी येतो, बाकी तसेच सोडून देतो. त्या रानरेडयाचे वजन 2000 किलोग्रॅम एवढे प्रचंड असते. त्यांनी पुढे निसर्गाचा चमत्कार त्यामध्ये सांगितला होता. ही फिल्म बनविण्याचा महत्वाचा उद्देशच हा होता की, एवढया मोठया वजनाच्या रानरेडयाची 32 तासामध्ये फक्त हाडे शिल्लक राहतात, बाकी सर्व साफ होते. हे निसर्गाचे नियोजन त्यांनी त्यामध्ये दाखविले आहे. पहिल्यांदा वाघ शिकार करतो, त्याला पाहिजे तेवढे खातो बाकी सोडून देतो. नंतर मग जंगलातील इतर प्राणी कोल्हे, कुत्रे लचके तोडतात. जमिनीमध्ये असलेल्या सर्वात बारीक मुंगींएवढा प्राणी कुठले मांस खातो, कुठले अवयव खातो हे सर्व त्यामध्ये दाखविले आहे. मुंगी, जीव-जंतु, मोठे प्राणी सर्व त्या रानरेडयाचे मांस खाऊन सांगाडा फस्त करतात, त्यामुळे पर्यावरण बिघडत नाही, असा हा निसर्गाने त्यांच्यात नियम घालून दिला आहे. 32 तासामध्ये प्रचंड वजनाच्या रानरेडयाची विल्हेवाट लावण्याचे नियोजन निसर्गानेच केले आहे. जे नाशवंत असते ते नष्ट करण्याचे प्रयोजन निसर्गानेच केले आहे. पण आपल्याला जे निसर्गाने शिकविले आहे ते आपण शिकलो नाही. मुंबई शहराचा विचार केला तर तोच महत्वाचा विषय ठरतो. मी अकोट शहराबद्दल बोलणार आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य, श्री.सुधाकर गणगणे, माझे मित्र बसले आहेत. ते त्या ठिकाणी ये-जा कशी करतात ? असा आम्हाला प्रश्न पडतो.

सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये प्रति दिवस 450 ते 500 टन एवढा प्रचंड कचरा निर्माण होतो. एवढया कच-याची विल्हेवाट लावणे म्हणजे काय ? उचलायचा आणि डंम्पिंग ग्राऊंडवर टाकायचा. 10 नगरपालिकांची एकत्रित अर्थसंकल्पिय तरतूद नाही एवढी नुसती सॉलिड

..2........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

11-04-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 3K-2

SRR/ SBT/ MHM/ 18:15

श्री.दिवाकर रावते.............

वेस्ट मॅनेजमेंटसाठी मुंबई महानगरपालिकेची अर्थसंकल्पिय तरतूद असते. मोठया गाडया, कर्मचारी यासाठी नेमलेले आहेत. किंबहुना आमच्या उपसभापतींवर आसूड ओढणा-या एका नेत्यांची या क्षेत्रात फार मोठी कामगार संघटनेची शक्ती आहे. तरी मुंबई साफ होत नाही. कच-याला शिस्त कोणी लावायची, कशी लावयाची ? हे मुंबईसाठी अतिशय कठीण प्रश्न बनले आहेत. यात महत्वाचे असे आहे की, जे कर भरतात ते शिस्त पाळतात. जुन्या इमारती असो, ब्लॉक सिस्टिमच्या इमारती असो, सहकारी सोसायटया असो, मोठया कॉलनीज असो, या सर्वांचा कचरा पद्धतशीरपणे, व्यवस्थितरितीने निघून जाईल, असे व्यवस्थापन स्वत: राहणा-यांनीच जोपासले आहे, पाळलेले आहे. परंतु, 60 टक्के झोपडपट्टी असलेल्या या शहराला बकालपणा निर्माण झाला आहे तो कसा घालवायचा, हा चिंतेचा भाग आहे. आकडेवारीनिशी 450 ते 500 टन कचरा मुंबई शहराचा आहे असे मी ज्यावेळी म्हणतो, त्याचा अर्थ, जो दृष्य कचरा जमा झालेला असतो तो रोजच्या रोज वाहून नेला जातो, त्यासाठी संपूर्ण यंत्रणा कामी लागलेली असते, प्रत्येक वॉर्ड आहे, नियंत्रण आहे, नियोजन आहे, आकडेवारी आहे, नोंदणी आहे, डंम्पिंग ग्राऊंडवर एकूण किती लॉ-या आल्या या सर्वांची नोंद होते. परंतु, झोपडपट्टयांच्या माध्यमातून जो कचरा निर्माण होतो तो मोजला जात नाही, अशी अवस्था आहे व ते या शहराचे दुर्दैव आहे. मला खेदाने सांगावेसे वाटते की, झोपडपट्टयांच्या माध्यमातून तयार होणारा जास्तीत जास्त कचरा नाल्यांमध्ये असतो.

यानंतर कुमारी जयश्री.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ SBT/ MHM/ प्रथम श्री.रोझेकर....... 18:20

श्री.दिवाकर रावते.......

त्यापैकी मिठी नदीमध्ये किती कचरा असतो,या कच-याच्या विल्हेवाटी करिताही प्रयत्न होणार, असे म्हटले गेले होते परंतु त्याची अंमलबजावणी सरकारकडून झालेली नाही. या कच-यातून निर्माण झालेल्या भूमिवर होणा-या बेकादेशीर बांधकामातूनच जास्तीत जास्त कचरा येतो व तो तेथे तसाच साचत राहतो. या मिठी नदीने व्यापलेल्या जागेतून 450 - 500 टन कचरा रोज मुंबईमध्ये निघतो. याविषयी आजच या सभागृहामध्ये एक लक्षवेधी आली होती. या मुंबई शहराच्या कच-याच्या माध्यमातून अनेक अशा एन.जी.ओज,म्हणजे स्वयंसेवी संस्था पोसल्या जात आहेत आता त्या नक्की कोणत्या मार्गाने निधी उभा करतात किंवा कोणत्या पध्दतीने भक्कम निधी उपलब्ध करुन घेतात, हे मलाही माहीत नाही परंतु त्या प्रचंड निधी प्राप्त करतात. या शहरामध्ये प्लॅस्टिकपासून निर्माण होणारा कचरा हा विषयही अतिशय गंभीर आहे. मी मागच्या वेळेला या सभागृहामध्ये हा विषय मांडला होता व त्यावर गहन अशा प्रकारची चर्चादेखील घडली होती परंतु आपण त्यावर अद्यापही काही अंमलबजावणी केलेली नाही म्हणजे सरकार फक्त या सभागृहामध्ये निरनिराळया विषयावर होणारी चर्चा ऐकतच असते का ? यावर मला जास्त बोलावयाचे नाही. त्यावेळी मी सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट ही जागतिक पातळीवर कशा पध्दतीने केली जाते, ती भूमिका मी मांडली होती. आता मी ते सर्व सांगत बसत नाही, आताही मी ती माहिती तास अन् तास या सभागृहामध्ये देऊ शकतो पण याबाबत मला किती ज्ञान आहे, हे सांगण्यासाठी मी या ठिकाणी उभा नाही माझी व या शहरवासियांची अडचण , महाराष्ट्राची अडचण मला जेवढी थोडीफार जमेल तेवढी मी या सभागृहामध्ये मांडण्याकरिता उभा आहे. सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी या ठिकाणी हा प्रस्ताव आणला त्याबद्दल मी त्यांचे या ठिकाणी अभिनंदन करतो, ते ज्या शहरातून या ठिकाणी आमदार म्हणून निवडून आलेले आहेत त्या शहरातील एका चौकाला दिवंगत विधानपरिषद सदस्य डॉ.श्रीकांत जिचकार यांचे नाव दिलेले आहे, हे ऐकून मला खूप बरे वाटले की, एका शहरातील छोटया कोप-याला का होईना पण डॉ.जिचकारांचे नाव दिलेले आहे. नागपूर शहरामधील एका रस्त्याला देखील डॉ.जिचकार यांचे नाव देण्याचा प्रस्ताव काही दिवसांपूर्वी विचाराधीन होता, असे मी ऐकले होते. डॉ.जिचकारांच्या रुपाने महाराष्ट्रातील विद्वत्ता गेली, ते कोणत्या पक्षातील होते, याच्याशी मला काहीही देणेघेणे नाही. डॉ.जिचकारांचे नाव असलेला चौक ज्या शहरात आहे त्या शहराला ही व्यथा का या सभागृहात मांडावी लागली ? मुंबई शहरामध्ये

3L - 2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते......

अतिवृष्टी झाल्यानंतर नालेसफाईचे कॉण्ट्रॅक्ट दिले जाते, याबाबत चर्चा वर्तमानपत्रातून नेहमी होत असते. कोटयवधी रुपयांचे हे कॉण्ट्रॅक्ट असते. जो कचरा यंत्रणेमधून किंवा सिस्टममधून वाहून जात नाही तो मुंबईमधील नाल्यांमध्ये साचून राहतो व तोच कचरा काढण्यासाठी कॉण्ट्रॅक्ट दिले जातात. ही मुंबई चारही बाजूने समुद्राने वेढलेली आहे. निसर्गातून दोन गोष्टी अशा निर्माण झालेल्या आहेत, पहिली गोष्ट म्हणजे तुमचे आमचे पोट हे स्वत:जवळ कधीच काही ठेवत नाही, ते सतत टाकतच असते आणि दुसरी गोष्ट म्हणजे समुद्राचेही तसेच असते. समुद्राच्या पोटामध्ये काहीच राहत नाही, समुद्र हा आतून शुध्द असतो. समुद्राच्या बाहेर किना-यापाशी इतका कचरा आलेला असतो की, त्याची कशी विल्हेवाट लावावयाची हा प्रश्न निर्माण होतो. परंतु या प्रश्नाबाबत श्री.प्रमोद नवलकरांचे कौतुक करावेसे वाटते कारण त्यांनी गिरगावं चौपाटी स्वच्छ करुन दाखविली आणि माणसाने जर मनापासून एखादी गोष्ट करावयाचीच असे ठरविले तर ती करुन दाखविता येते, अशा प्रकारे श्री.प्रमोद नवलकर यांनी अशक्य गोष्ट शक्य करुन दाखविलेली आहे. आता आपण गिरगाव चौपाटीवर केव्हाही गेलात तरी गिरगावं चौपाटी लख्खच दिसेल. परंतु मुंबईच्या इतर व समुद्रकिनारी इतके प्लॅस्टिक पाहून आपल्या मनामध्ये असा विचार येतो की, एवढे प्लॅस्टिक येथे येते कोठून ? या प्लॅस्टिकमुळे दोन वर्षापूर्वी मुंबईची इतकी भयंकर परिस्थिती निर्माण झाली होती की, पंतप्रधानांपासून अख्खा देश हादरला होता की, मग मुंबईचे काय हाल झाले असतील ? त्यानंतर प्लॅस्टिकवर बंदी आणली गेली. या प्लॅस्टिक बंदीकरिता मी या सभागृहामध्ये एक विधेयक आणले होते त्या विधेयकाचा सन्मान ठेवून आपण प्लॅस्टिकवर बंदीही आणली परंतु ती अंमलात आली का, हा खरा महत्वाचा प्रश्न आहे. मागच्या वेळेला जेव्हा हा प्रश्न या सभागृहामध्ये आला होता तेव्हा शासनाने उत्तर म्हणून थापा मारल्या होत्या. परंतु आता याचे योग्य उत्तर माननीय मंत्रिमहोदयांना द्यावेच लागेल आता या ठिकाणी सरकारने प्रत्येक वेळेला थापा मारलेल्या चालणार नाहीत, मी हे फार जबाबदारीने शब्द वापरत आहे. सन 1995 पर्यंतच्या झोपडया कायम करण्यात येतील, असा कायदा करण्यात आला भलेही हा कायदा आमच्यामुळे किंवा तुमच्यामुळे,कोणामुळेही झाला असेल. आता सन 2000 पर्यंतच्या झोपडपट्टयांचा प्रश्न शासनाने अद्यापपर्यंत प्रलंबित ठेवलेला आहे, ही परिस्थिती फार विचित्र आहे. It is a mis-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

management याबाबतीतील त्या दिवशीचे माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तर हे अव्यवस्थेचे हे एक मुर्तिमंत उदाहरण आहे.

यानंतर श्री.बोरले.....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .......

कोर्टाने तुम्हाला मान्यता दिलेली नाही. शासनाने निर्णय घ्यायचा असतो. शासनाने घेतलेला निर्णय योग्य की अयोग्य हे कोर्ट ठरवित असते, हे मी नवीनच एकतो आहे. ही सरकारची कोणती पद्धत आहे ? सरकार निर्णय घेते. सरकारने घेतलेला निर्णय योग्य की अयोग्य हे कोर्ट ठरवित आहे ? सन 2000 पर्यंतच्या झोपडया तुम्हाला कायदेशीर करावयाच्या होत्या. निवडणुकीच्या जाहीरनाम्यामध्ये तुम्ही लोकांना आश्वासन दिले होते. कोर्ट याला मान्यता देईल किंवा देणारही नाही. सभागृहामध्ये सदनिकांच्या संदर्भातील विधेयकावर चर्चा होणार आहे. सदनिकांच्या संदर्भातील कोर्टाचे जजमेंट मी सभागृहामध्ये वाचून दाखविणार होतो. मागच्या चार अधिवेशनांमध्ये मुंबईच्या प्रश्नावर सभागृहामध्ये चर्चा उपस्थित करण्यात आली होती. मुंबईतील बेकायदा झोपडया पाडण्यासंदर्भातील प्रश्न होता, त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी असे सांगितले होते की, ज्या बेकायदेशीर झोपडया बांधल्या जातील त्या पाडल्या गेल्या नाहीत तर त्या त्या विभागातील संबंधित अधिका-यांवर आम्ही कारवाई करु. हे वाक्य रेकॉर्डवर आहे. पोलीस आणि त्या विभागातील वॉर्ड ऑफिसरला जबाबदार धरले जाईल, असे सांगण्यात आले होते. शासनाने त्या विभागातील अधिका-यांना आणि पोलीस अधिका-यांना जबाबदार धरुन त्यांच्यावर कारवाई करावी. परवाच्या वर्तमानपत्रामध्ये एक बातमी आली होती. नगर विकास विभागाचे अधिकारी गॅलरीमध्ये बसलेले आहेत. त्यांच्याकडून माननीय नगर विकास राज्यमंत्र्यांनी माहिती मागवावी. "गोरेगांवच्या समुद्र किना-यावर झोपडपट्टी बांधण्याचे काम सुरु आहे" अशी परवाच्या वर्तमानपत्रामध्ये बातमी आली होती. मुंबईतील जी सर्व कर भरणारी जनता आहे, ती तुम्हाला कचरा व्यवस्थापनामध्ये मदत करीत आहे. झोपडपट्टयांमध्ये केवळ 10 ते 15 ठिकाणी कचरा उचलण्याची व्यवस्था आहे. इ ोपडपट्टीमध्ये राहणारे लोक वाटेल तेथे कचरा टाकतात, हे सर्वांना माहीत आहे. सन 2000 पर्यंतच्या झोपडया कायदेशीर करावयाच्या की नाही, हे कोर्ट ठरवेल. परंतु सन 2000 नंतरच्या इ ोपडया का तोडल्या जात नाहीत ? याचे उत्तर तुम्ही देणार नाही. काल मी भायखळयावरुन प्रवास करीत होतो. भायखळयाच्या रस्त्यावर झोपडपट्टी आहे. तेथील झोपडपट्टीमध्ये राहणा-या लोकांचे संसार रस्त्यावर आहेत. तो तीन लेनचा रस्ता आहे. त्यातील दोन लेन त्यांच्याच आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2.......

GRB/ MHM/ SBT/ प्रथम कु.खर्चे ........ 18:25

श्री.दिवाकर रावते .......

तेथून जात असतांना मी ड्रायव्हरला सांगितले की, ओव्हरटेक करु नको, एखाद्या माणसाला धक्का लागला तर झोपडपट्टीतील लोक गाडी जाळून टाकतील. एखाद्या माणसाला चुकून गाडीचा धक्का लागला तर ते लोक तुम्हाला सोडणार नाहीत, अशी प्रवृत्ती मुंबईमध्ये पोसली जात आहे. मुंबईमध्ये प्रचंड प्रमाणावर कचरा आहे. त्याला कोणीही वाली नाही. मुंबईतील प्रत्येक विभागामध्ये रस्त्यावर फुटपाथ आहे. मुंबईमध्ये एवढया मोठया प्रमाणावर कचरा निर्माण होतो की, कचरा टाकण्यासाठी आता मुंबईतील डंपिंग ग्राऊंड संपलेले आहेत. केंद्राने तज्ज्ञांच्या सल्ल्याने निश्चित केलेल्या निकषाप्रमाणे व प्रमाणकानुसार डंपिंग ग्राऊंडची यादी सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांनी वाचून दाखविली. आता मुंबईची परिस्थिती अशी आहे की, मुंबईतील कचरा प्रचंड असतो. मुंबईतील रस्त्यांवर रोज वावरणारी जनसंख्या 48 लाख एवढी आहे.

(यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

मुंबईमध्ये रोज एक कोटी लोक लोकल ट्रेनमध्ये प्रवास करुन विविध कार्यालयात येतात व सायंकाळी आपल्या घरी जातात. मुंबईतील बी.ई.एस.टी. बसमध्ये रोज 48 लाख प्रवासी प्रवास करीत असतात. प्रत्येक जण तिकीट काढत असतो. आपणा सर्वांना माहिती आहे की, तिकीट कोणीही खिशात ठेवत नाही. बसमधून उतरले की तिकीट चुरगळून रस्त्यावर टाकतात. 48 लाख तिकीटे रोज रस्त्यावर टाकली जातात. तसेच रेल्वेमध्ये 60 लाख लोक रोज प्रवास करतात. यातील पासवाले 30-35 लाख लोक आहेत. बाकीचे तिकीट काढून प्रवास करतात. प्रवास संपल्यानंतर ते प्रवासी तिकीटे रेल्वे लाईनवर टाकतात. तालिका सभापती महोदय, आपण नेहमी पुणे ते मुंबई असा प्रवास करीत असता. तेव्हा आपण पाहिले असेल की, रेल्वे लाईनजवळ प्रचंड कचरा असतो, तो कोणी काढत नाही, तो कचरा तेथे तसाच पडून असतो.

सभापती महोदय, मी सध्या मुंबईतील कचऱ्याच्या प्रश्नावरच बोलणार असून नंतर इतर ठिकाणच्या कचऱ्याच्या प्रश्नावर बोलणार आहे. या मुंबईतील कचऱ्याच्या शासनाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करताना कोणती कार्यवाही करणार आहात ? मी झोपडपट्टीच्या विषयावर बोलत होतो, झोपडपट्टीवासियांना दिलेली आश्वासने शासन पाळत नाहीत. 2000 नंतरच्या झ ोपडया शासन पाडीत नाहीत, त्यामुळे मोठया प्रमाणावर कचरा होत असून आपण तो नष्ट कसा करावयाचा याचीच चिंता करत राहायची, अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. म्हणून या शहरामधील कचऱ्याच्या विल्हेवाटीच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला आहे. प्लॅस्टीक पासून निर्माण होणाऱ्या कचऱ्याचा विषय अत्यंत गंभीर आहे, मी मागच्या वेळी सभागृहात हा विषय मांडला होता. त्यांची नोंद घेतली नाही याचा खेद होतो. प्लॅस्टीकवर ताबडतोब बंदी घाला अशी माझी आग्रहाची भूमिका आहे. शासनाने फक्त पातळ प्लॅस्टीक बंद केले आहेत परंतु बाकीच्या जाड पिशव्या बंद केलेल्या नाहीत.

सभापती महोदय, अजूनही एका गोष्टीचे उत्तर मला दिले पाहिजे, मुंबईमध्ये विविध ठिकाणी जे होर्डींग लावले जातात, जाहिरात फलक लावले जातात, वाढदिवसाचे फलक लावले जातात, नंतर त्याची विल्हेवाट कशा प्रकारे लावली जाते ? हा कचरा कोठे जातो ? त्याचे काय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

होते ? रिसायकलींग कोठे होते ? जर हया कचऱ्यावर कोणतीही प्रक्रिया होत नसेल तर पर्यावरणाला फार मोठा धोका निर्माण होईल म्हणून या फलकांवर व होर्डींगवर बंदी आणावी. मुंबई शहरामध्ये सध्या पाच हजार जाहिरात फलक असतील, ते नष्ट करुन टाका अशी मी सूचना करतो.

सभापती महोदय, विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपूर येथे दरवर्षी होत असते. मागच्या वर्षी आम्ही पाहिले आहे की, नागपूरमध्ये होर्डींग लावण्यास बंदी आहे. याप्रमाणे मुंबईच्या बाबतीतही तो निर्णय घेता येईल. नागपूरच्या बाबतीत अधिकाऱ्यांनी होर्डींग बंदीचा जो निर्णय घेतला आहे, त्याचा परिणाम असा झाला की, कोणत्याही पक्षाच्या नेत्याला त्याची छबी पाहण्याकरिता त्याचे होर्डींग शोधावे लागले. नागपूर येथील प्रशासनाने बंदीबाबत जी कठोर भूमिका घेतली व त्या ठिकाणी प्रशासन वाकले नाही त्याप्रमाणे मुंबईमध्येसुध्दा करता येईल.

सभापती महोदय, पुण्यातील वर्तमानपत्रात एक जाहिरात वाचली. वर्तमानपत्रातील मोठी जाहीरात वाचून असे वाटले की, तेथील आण्णा व नानांना आता खूप पुढे जायचे आहे. विविध जाहिरातीच्या माध्यमातून त्यांचे फार कौतुक झाले आहे. होर्डींग लावण्याच्या प्रकारांवर आता बंदी आणली पाहिजे कारण त्यामुळे शहराचे सौंदर्य नष्ट होत आहे. याबाबत माझी अशी सूचना आहे की, जाहिराती व होर्डींग लावण्यासाठी शहरातील एक भाग निश्चित करुन द्यावा व त्याद्वारे शासनाने महसूल मिळवावा.

सभापती महोदय, मी मुंबईतील रस्त्यावरुन जात असताना एका ठिकाणी होर्डींग पाहिले. 21 मार्चला भाऊंचा वाढदिवस साजरा झाला, मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, ते भाऊ तुमच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचेच आहेत, ते भाऊ कोण आहेत हे आपल्याला माहिती आहे.

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

21 मार्चला भाऊंचा वाढदिवस झाला, गुलाबराव गणाचार्य चौकामध्ये त्यांना शुभेच्छा देणारा मोठा बोर्ड लागलेला आहे तो अजूनही तसाच आहे. हौस असते, कार्यकर्त्यांचीही हौस असते. पण त्यासाठी काही नियोजन, नियंत्रण असते की नाही ? दुसरा दिवस गेला की तो बोर्ड काढला गेला पाहिजे अन्यथा दंड भरायला लावले पाहिजे. हजार रूपये दंड झाला तर पुढील वर्षी तो आणि त्याचे कार्यकर्ते अशा प्रकारे वाढदिवस साजरे करणार नाहीत. त्यासाठी लागणारे लाकूड, प्लास्टिकस्, खिळे वगैरेंचे नंतर काय केले जाते ? काही कळत नाही. त्याचे काही नियंत्रण, नियोजन केलेले आहे का ? हा प्रकार केवळ या मुंबई शहरातच होतो आहे असे नाही तर महाराष्ट्रात सगळीकडे आहे. या संदर्भात मी आपल्याला हिंगोली येथील एक कथा सांगतो. मी कोणाचे नाव घेत नाही. पण या गोष्टींना आता लोक इतके कंटाळलेले आहेत की विचारू नका. त्या शहरामध्ये चार वेडे फिरत असतात. काही वेडे ज्याप्रमाणे वाहतूकीमध्ये उभे राहून हात दाखवित असतात त्याप्रमाणे हे चार वेडे त्या शहरात फिरत असतात. शहरातील मोठ्या नेत्यांची मोठमोठी लागलेली होर्डिंग्जने अगादेरच तेथील लोक कंटाळलेले होते. परंतु राजकीय दांडगाई असल्याने ते त्या विरूद्ध काही करू शकत नव्हते. म्हणून मग त्या मंडळींनी एक दिवस शक्कल लढविली. त्यांनी त्या चार वेड्यांचे फोटो काढले आणि त्या नेत्यांच्या होर्डिंग्जच्या शेजारी लावले आणि बाजूला मोठ्या अक्षरामध्ये लिहिले की, केवळ तुम्हालाच शुभेच्छा द्यायच्या का ? आता आम्हालाही शुभेच्छा द्या. ते पाहून नेते मंडळींना आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना त्याची लाज वाटू लागली. मग तेथील आमदार आणि इतर सगळे मागे लागले की, ते फोटो काढून टाका. पण ते काढले गेले नाहीत. आता हा प्रयोग येथे करता येत नाही. पण आता हे फोटो आणि होर्डिंग्ज पाहून लोक किती चिडतात, किती कंटाळलेले आहेत हे मी आपल्याला सांगितले. सभापती महोदय, यामुळे किती टनाचा कचरा होतो आणि त्याची विल्हेवाट कोठे आणि कशी लावली जाते याची माहिती या निमित्ताने दिली तर बरे होईल. आता या संदर्भात मला असे म्हणावयाचे नाही की, कोणी असे प्रदर्शन करू नये वा करीत नाही. निदान या निमित्ताने तर ही नेते मंडळी मग कोट वगैरे घालून उभी राहतात आणि आपले फोटो काढून घेतात. माझ्या त्यांना शुभेच्छा जरूर आहेत. असो. सभापती महोदय, हायकोर्टाने या बाबतीत आपल्याला स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. वाढदिवसाच्या आदल्या आणि नंतरच्या दुसऱ्या दिवशी पर्यंत हे बोर्ड-होर्डिंग्ज ठीक आहेत. त्यानंतर लगेचच ते काढले गेले पाहिजेत. पण तसे

...... 3ओ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

होत नाही. मोठ्या नेत्यांच्या बाबतीत मी हे समजू शकतो. जनमानसामध्ये त्यांची काही एक प्रतिमा आहे. परंतु घरामध्ये लहान मूल जन्माला आले तर त्याचाही अशा प्रकारे फोटो लावून 'मुन्नाच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा' असे मोठाले बोर्ड लावले जातात. काय देणे-घेणे आहे त्यांचे ? पण लोक आता हेही करू लागले आहेत. त्याला कोठे तरी आवर घातला गेला पाहिजे. ..

श्रीमती मंदा म्हात्रे : या निमित्ताने मी आपल्याला एक माहिती देऊ इच्छिते. काल टीव्ही वर एक बातमी मी पाहिली. त्यामध्ये एका भिकाऱ्याने स्वत:चे पोस्टर लावून मी सुद्धा माझे पोस्टर लावू शकतो म्हणून दाखवून दिले आहे. ही गोष्ट पुण्यातील आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी माझ्या ज्ञानात भर घातल्याबद्दल त्यांना धन्यवाद. पण पुण्यामध्ये हे घडले आहे. पुण्यात अशा अनेक गमती जमती केल्या जातात. पण मला या संदर्भात या निमित्ताने सांगावयाचे आहे की, आपल्याला असे बोर्ड, होर्डिंग्ज लावण्याची परवानगी द्यावयाची असेल तर जरूर द्या, पण त्यासाठी काही जागा आपण ठरवून द्या. त्यातून मग महापालिकेला देखील महसूल मिळेल. परंतु त्यातून एवढ्या मोठ्या प्रमाणात जो कचरा निर्माण होतो तो कोठे जातो ? त्याचे काय केले जाते ? सभापती महोदय, मी महापालिकेच्या स्टँडींग कमिटीचा चेअरमन असताना या संदर्भात तेथे श्री.तिनईकर आयुक्त म्हणून होते. हॉटेल्समधून रोज रात्री बाहेर फेकला जाणारा कचरा, त्यावर उंदीर, कुत्री, कावळे यांचा होत असलेला मोठ्या प्रमाणातील वावर या गोष्टी मी त्यावेळी त्यांना दाखवून दिल्या. त्यांनाही ते पटले आणि त्यांनी प्रशासक म्हणून त्यावर चांगल्या प्रकारे कारवाई केली. रात्री 12 वाजल्यानंतर हॉटेलांतील वेस्टेज जमा करण्यासाठी एक व्हॅन बाहेर फिरू लागली. ...

( यानंतर श्री. सरफरे .... 3पी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

त्यावेळी अशाप्रकारचे नियोजन केले होते. त्यावेळी दोन घटना अशा घडल्या होत्या की, कचरा पेटीमधील कचरा गोळा करीत असतांना त्यामध्ये ॲबॉर्शन झालेले मूल मिळाले. दहा-बारा वर्षापूर्वीचा माझा अनुभव मी याठिकाणी सांगत आहे. हे मूल सापडल्यानंतर प्रचंड गदारोळ निर्माण झाला. या सदनामध्ये हा विषय उपस्थित करण्यात आला असता तर माननीय गृहमंत्र्यांना सांगावे लागले असते की, हे मूल कुणाचे होते, ते कसे आले कोठून आले? त्याची डी.एन.ए. चाचणी करु असे सभागृहामध्ये सांगावे लागते. अशाप्रकारे एखादा जीव नष्ट करण्याची पध्दत थांबली पाहिजे. हा विषय महानगरपालिकेपुरता मर्यादीत होता. त्यावेळी माननीय समाजकल्याण मंत्री श्री. चंद्रकांत हंडारे साहेब महानगरपालिकेमध्ये होते. त्यानंतर हॉस्पिटल वेस्ट मॅनेजमेंट निर्माण झाले. के.ई.एम. हॉस्पिटलमधील वेस्ट मटेरिअल बायो मेडिकल पध्दतीने जाळून टाकण्यात येते. हॉस्पिटलमध्ये जमा होणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण मुंबईच्या मानाने जास्त आहे. मी नेहमी अकोला व नांदेड या जिल्हयांमध्ये जातो. नांदेडमध्ये जेवढी हॉस्पिटल्स आहेत तेवढी घरेसुध्दा नाहीत. बाजूच्या हैद्राबादमधील लोक त्याठिकाणी उपचाराकरिता येतात. त्या शहरातील हॉस्पिटल्समध्ये छोटे छोटे ऑपरेशन होतात. त्याठिकाणी जमा होणाऱ्या वेस्ट मटेरिअलमुळे रोगराई निर्माण होण्याची शक्यता जास्त असते. सभापती महोदय, हे सॉलिड वेस्ट मटेरिअल आहे, याची नुसता कचरा म्हणून विल्हेवाट लावून चालणार नाही. माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी याठिकाणी व्यापक विषय मांडला आहे. तो मांडीत असतांना त्यांनी त्याच्या पाठीमागच्या व्यवस्थापनासंबंधी चर्चा केली. त्यामुळे हा विषय खूप गंभीर स्वरुपाचा वाटतो. या कचऱ्याच्या व्यवस्थापनाकरिता आपण काय करणार आहात याचे उत्तर शासनाला द्यावे लागेल.

सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये जमा होणारा रोजचा कचरा टाकण्याकरिता असलेले डंम्पिंग ग्राऊंड संपलेले आहेत. तेव्हा या जमा होणाऱ्या कचऱ्याचे आपण काय करणार आहात? मागे एकदा मी या डंम्पिंग ग्राऊंडच्या संदर्भात उल्लेख केला होता. राजकारणी जर द्रष्टे असतील तर अनेक चांगल्या योजना निर्माण होतात. ब्रिटीशांच्या काळात महालक्ष्मीच्या डंम्पिंग ग्राऊंडवर जमा होणारा कचरा कॉम्पॅक्ट करुन त्याचे पिरॅमिडसारखे प्लेट तयार करुन ते वॅगनमधून घेऊन जाण्याकरिता एक यंत्रणा निर्माण करण्यात आली होती. ती यंत्रणा अजून तशीच पडली आहे, ती वापरली जात नाही. मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये मच्छीबाजार आहेत, भाजीबाजार आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MHM/ SBT/

श्री. दिवाकर रावते...

मी पणन मंत्री असतांना बाजार समितीच्या अधिपत्याखाली एक एक्सपर्ट कमिटी नेमली होती. भाजी बाजारमध्ये जमा होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट कशी लावायची? हा संपूर्ण महाराष्ट्रातील प्रश्न आहे. सभापती महोदय, आपण कुठल्याही देवस्थानामध्ये जा. त्याठिकाणी रोज दोन ते तीन हजार टन फुले, हार वाहिले जातात त्याला आपण निर्माल्य म्हणतो. ते नाशिवंत असल्यामुळे ते कुठे टाकले जाते? ते नष्ट करण्याचे नियोजन काय आहे? या देवस्थानामध्ये रोज लाखो, करोडो रुपये जमा होतात. त्यामुळे त्या देवस्थानामध्ये जमा होणाऱ्या निर्माल्याचे नियंत्रण, नियोजन व विल्हेवाट लावण्याचे काम देवस्थानाकडे सोपवून हा विषय मार्गी लावला पाहिजे. त्याकरिता मी प्रयत्न केला होता परंतु मला त्यामध्ये यश आले नाही. देवस्थान तुळजापूरचे असो किंवा परळीचे असो. त्याठिकाण्ी ट्रक भरतील एवढा बेल-भंडारा रोज जमा होतो. या जमा होणाऱ्या कचऱ्यामधून पाच मुलांना रोजगार निर्माण करण्याची क्षमता आहे. आणि ही संकल्पना राबविण्याची क्षमता आपण दाखविली पाहिजे. त्याकरिता आपण भूखंड द्या. आमच्यासारखे कार्यकर्ते त्या पाच मुलांना बरोबर घेऊन गांडूळ खत तयार करण्याकरिता त्या निर्माल्याचा वापर करतील. त्या त्या भागामध्ये गांडूळ खत निर्माण करुन त्या खताचा शेतीसाठी चांगला उपयोग होऊ शकेल. इतक्या मोठया प्रमाणावर खत निर्माण होईल. तशाप्रकारची संकल्पना निर्माण झाली नाही.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरू...

कलेक्टरनी जमीन द्यावी, पाच मुलांची सोसायटी निर्माण करा, त्यांनी निर्माल्य रोजच्या रोज जमा केले तर किती तरी टन निर्माल्य जमा होईल आणि त्यापासून गांडूळ खत निर्माण होऊ शकते. कचऱ्याची विल्हेवाट लागेल आणि रोजगारही निर्माण होईल. सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांनी शेवटी महत्वाचा मुद्दा मांडण्याचा प्रयत्न केला, परंतु तो अर्धवट सोडला. मुंबईमध्ये मोठयाप्रमाणावर कचरा निर्माण हातो. मुंबईमध्ये कचऱ्याची विल्हवाट कशी लावण्याची हा प्रश्न आहे. कलकत्ता, चेन्नई शहरामध्येही कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. सन्माननीय सदस्यांनी केंद्रीय तज्ज्ञांचे मंडळ वाचून दाखविले. त्यांनी कचऱ्यापासून काय निर्मिती करायची, या संदर्भात निकष दिलेले आहेत. कचरा डम्प करायचा नाही,ओला कचरा, सुका कचरा वेगळा करून त्यापासून खत निर्मिती करायची. या संदर्भात लेटेस्ट टेक्नॉलॉजी इंटर नॅशनल लेवलवर उपलब्ध झालेली आहे. त्या संदभातील खरेदीदार जागतिक पातळीवर आहेत. या संदर्भात नियोजन करण्याच्याबाबतीत आपण मागे राहिलेलो आहोत. श्रीलंका, जर्मन, अमेरिका या ठिकाणी महापालिकेचे तज्ज्ञ अधिकारी अभ्यास करण्यासाठी गेलेले होते, त्याचा काय उपयोग झाला ? त्यांनी कोणते नियोजन केलेले आहे ? हे समजले पाहिजे. आपण राज्यात सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट सेल निर्माण केलेला आहे. ते काय करतात ? मी ग्रामपंचायती पर्यन्त जाणार नाही. परंतु महानगरपालिका, नगरपालिका या ठिकाणी त्यांनी काय नियोजन केले ? मघाशी सन्मानीय सदस्यांनी अकोटच्या संदर्भाने सांगितले. पण कोणत्याही शहरामध्ये जाताना त्या ठिकाचा कचरा एक ते दोन कि.मी.च्या परिसरामध्ये आजूबाजूला टाकलेला दिसतो. त्यामुळे शहरात जाताना फार मोठा गंभीर प्रश्न निर्माण होतो. इतकी दुर्गंधी येते. ग्रामीण भागामध्ये मेलेली जनावरे कोठेतरी टाकतात. कचऱ्याच्या संदर्भात अनेक ठिकाणी समस्या निर्माण झालेली आहे. मुंबईमध्ये आणखी एक फार मोठी डोकेदुखी निर्माण करणारी बाब निर्माण झालेली आहे. ती म्हणजे बांधकाम साहित्यातून निर्माण होणारा कचरा. आपल्या धरामध्ये दुरुस्ती करतो, त्यावेळी ट्रक भरेल एवढा कचरा निघतो तो कचरा कोणाच्या तरी ताब्यात देतो, त्यासाठी आपण पैसे देतो. तो कचरा ते कोठे नेवून टाकतात याची माहिती नसते. तो कचरा हायवेच्या बाजूला टाकलेला दिसतो. त्यांनी पैसे घेतलेले असतात. महानगरपालिकेच्या किंवा सरकारच्या जागेवर सगळीकडे उतरवून तो तसाच टाकलेला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरू....

असतो. त्याची विल्हेवाट लागत नाही, त्याचे काय करायचे ? हा प्रश्न निर्माण झालेला आहे. स्टॉर्म वॉटर ड्रेनेज सोर्सेस ब्लॉक होत असतात, त्याच्यावर नियंत्रण काय करणार आहात ? त्याचप्रमाणे नाल्याचा प्रश्न आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी कायद्यातील अधिकाऱ्यांवरील कारवाईच्या संदर्भातील तरतूद वाचून दाखविली. परंतु त्यांच्यावर कारवाई केली असल्याचे मला अजूनपर्यन्त आठवत नाही. गेल्यावेळेस मुंबई शहरामध्ये नाले कचऱ्यांनी भरल्यामुळे 244 लोक बळी गेले, परंतु कोणत्याही अधिकाऱ्यांवर कारवाई केलेली नाही. माझ्या माहितीप्रमाणे मुंबई शहरात घनकचरा व्यवस्थापनाकरिता 730 कोटी रुपये दरवर्षी वापरले जातात. ही रक्कम काही कमी नाही. मुंबई स्वच्छ करण्यासाठी रोज दोन कोटी रुपये खर्च होतात. जवळजवळ 22 हजार कर्मचारी त्यावर काम करतात. 4 हजार गाडया मुंबई शहरातील कचरा उचलण्याचे काम करतात. मुलुंड, देवनार, गोराई हे डम्पींग ग्राऊंड पूर्ण झालेले आहेत. 450 हजार टन कचरा उचलला जातो आणि कचरा वाहतुकीचा खर्च 120 कोटी रुपये आहे. लोकसंख्येचा विचार करता, 600 माणसांमागे एक सफाई कामगार आहे, अशी परिस्थिती आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागातील कचऱ्याचा प्रश्न आहे. नवीन नवीन टेक्नॉलॉजी आलेली आहे. डम्पींग ग्राऊंड वापरायचे नसेल तर त्याचा त्या ठिकाणचा वापर करावा. या संदर्भात सहा महिन्यामध्ये विचार करावा. आता सर्वच गोष्टी मी वाचल्या परंतु मला प्रत्यक्ष जाऊन पहाता आलेले नाही, त्यासाठी त्या ठिकाणी जावे लागेल.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

या डम्पींग ग्राऊडमध्ये खाली तयार झालेला गॅस तसाच आहे. तो गॅस बाहेर जात नाही. या डम्पींग ग्राऊंडमध्ये बोअरवेल मार्फत पाईप लाईन टाकून तो गॅस बाहेर काढला पाहिजे. मघाशी याबाबत उल्लेख केला. या गॅसच्या माध्यमातून वीज निर्मिती करण्याचे प्रकल्प जगामध्ये आलेले आहेत. जसजसा तो गॅस वापरला जाईल तसतसे डम्पींग ग्राऊंड खाली बसत जाईल आणि डम्पींग ग्राऊंडसाठी नवीन जागा तयार होईल. खालचा गॅस बाहेर निघून नवीन पोकळी तयार झाली तर त्यामध्ये कचरा जाऊन बसेल. या गॅसपासून वीज निर्मिती करण्याचे प्रकल्प राबवावेत. ही वीज किती रुपयाला पडेल या पेक्षा निर्माण होणारा कचरा, त्याची विल्हेवाट लावणे आणि त्यासाठी येणारा खर्च या सर्व गोष्टी यामध्ये आहेत. मुंबई शहरामध्ये निर्माण होणाऱ्या कचऱ्याच्या संदर्भात बोलत असताना झोपडपट्टीच्या संदर्भात आपले जे काही चालू आहे त्याबाबत विचार करावा लागेल. कचरा काढा किंवा नका काढू, हा विषय महत्वाचा नाही. कारण राहणाऱ्याला घर आहे. त्याला त्या घराचा आधार आहे. आपण कचरा नष्ट करण्यासाठी काही करणार की नाही ? सगळ्या खाड्यांची तोंडे मोकळी केली पाहिजे. खाड्यांच्या तोंडाच्या टोकाला कचरा भरलेला आहे. त्याला कोणी वाली नाही. महानगरपालिकेपासून नगरपालिकेपर्यंत यासाठी कर्मचारीवर्ग नाही. तो कचरा समुद्राच्या तोंडावर येऊन बसलेला आहे. हे सर्व आपल्याला करावे लागेल. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण हे याबाबतीत चांगले सांगतील. त्यांनी महानगरपालिकेमध्ये काम केलेले आहे.

सभापती महोदय, आणखी एक शेवटचा चांगला मुद्दा मांडतो. तो किती सुगंधित आहे, हे आपल्याला कळेल. मुंबईमध्ये 30 लाख लोकांना संडास नाही. ते उघड्यावर शौचाला बसतात. ते मुंबई शहराला सुगंध निर्माण करुन देतात. कारण ते सगळे उघड्यावर आहे. तसे बघावयास गेलो तर त्यातून चांगले सोनखत निर्माण करण्याची ताकद आहे. परंतु ती ताकद कोठे आहे ? हगणदारीमुक्त गाव करण्याचे काम आपण करीत आहोत परंतु मुंबईमध्ये जी हगणदारीची परिस्थिती निर्माण होते त्याकडे कोण लक्ष देणार ? हे कोण पाहणार ? मुंबईतील वातावरण कसे आहे ? सकाळी 6.00 वाजता समुद्र किनाऱ्यावर गेलो तर सगळे लोक किनाऱ्यावर शौचाला बसलेले असतात. हायवेच्या बाजूला सगळे लोक शौचाला बसलेले असतात. हायवेवर आता त्याचे कोणाला काही वाटत नाही. या मुंबईमध्ये सुलभ शौचालयाची योजना मी आणली. मुंबईतील लोक

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. दिवाकर रावते ....

लोक रस्त्यावर शौचाला बसत असतील तसेच त्यामध्ये महिलावर्ग असेल तर त्याकरिता शौचालयाची गरज आहे. त्या सुलभ शौचालयाची मागणी जिकडे तिकडे यावयास लागली. झ ोपडपट्टीतील लोक म्हणावयास लागले की, आम्हाला ते परवडत नाही. त्यामुळे प्रत्येक झोपडीमागे 5 रुपये घेऊन त्यांना सुलभ शौचालयामध्ये जाण्याची व्यवस्था केली. त्यानंतर अनेक योजना आल्या. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण, सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. चंद्रकांत हंडोरे आमच्या बरोबर होते. मुंबईतील स्वच्छता हा महत्वाचा भाग आहे. त्याचबरोबर छोट्या शहरांची स्वच्छता हाही महत्वाचा भाग आहे. सकाळी परभणी येथील भुयारी गटार योजनेच्या संदर्भात प्रश्न उपस्थित झाला होता. ज्या शहरामध्ये भूयारी गटारे आहेत त्या ठिकाणी कचऱ्याची गंभीर समस्या आहे. हे सगळे प्रश्न यामध्ये आहेत. त्यादृष्टीने मला स्पेसिफिक मागणी करावयाची आहे. सन्माननीय सदस्यांनी मागणी केली नाही. कायद्यामध्ये तरतूद असेल तर त्याप्रमाणे अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे. ज्या नगरपालिका आहे त्या कोणत्या परिस्थितीमध्ये आहेत ? त्या ठिकाणी डम्पींग ग्राऊंडच्या स्वरुपामध्ये कचरा जमा केला जात नाही. त्या ठिकाणी सगळ्या गावात रस्त्याच्या दोन्ही बाजूला कचरा टाकला जातो. त्यावर निर्बंध आणले पाहिजे. या कामासाठी त्यांना निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे. केंद्र सरकारच्या सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट खात्याकडून याकरिता निधी उपलब्ध करुन घ्यावा. जर छोट्याछोट्या नगरपालिकांना गाड्या देऊ शकलो तसेच कर्मचाऱ्यांसाठी अनुदान देऊ शकलो तर तेथील कचऱ्याचे नियोजन होईल. या कचऱ्याच्या व्यवस्थापनाची बाब अत्यंत गांभीर्याने घ्यावी. ज्या ठिकाणी माणसे आहेत, ज्या ठिकाणी जनावरे आहेत त्या ठिकाणी कचरा होणारच आहे. त्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची गरज आहे. नाही तर रोगराईला निमंत्रण देण्यासारखी परिस्थिती निर्माण होईल. मी सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांना मनापासून धन्यवाद देतो. त्यांनी एका चांगल्या विषयावर सरकारला जागे करणारी चर्चा या सदनामध्ये उपस्थित केलेली आहे. शासनाने याबाबत नोंद घ्यावी. नागपूर, पुणे या सारख्या शहरांच्या ठिकाणी होर्डिंग्नच्या माध्यमातून प्रचंड प्रमाणात निर्माण होणाऱ्या प्लास्टीकच्या कचऱ्यावर कसे नियंत्रण आणावयाचे याकडे शासनाने लक्ष द्यावे. सभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी वेळ दिला त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

-----

यानंतर श्री.शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: खामगांव (जि. बुलढाणा) येथे नगरसेवकांना झालेली मारहाण

**मु.शी.**: खामगांव (जि. बुलढाणा) येथे नगरसेवकांना झालेली मारहाण या संदर्भात माननीय गृह राज्यमंत्र्यांचे निवेदन

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

दिनांक 8.4.2007 चे दुपारी 14.00 चे सुमारास खामगांव येथील शिवसेना पक्षाचे कार्यकर्त्यांनी भारनियमनाच्या कारणावरुन वीज वितरण कंपनीच्या केंद्रात जावून, नियंत्रण कक्षामध्ये बेकायदा प्रवेश करुन तेथील कर्मचा-यांना अश्लील शिविगाळ करुन, धमक्या देवून शासकीय मालमत्तेची नासधूस करुन शासकीय सामानाचे नुकसान केले. सदर प्रकाराबाबत पोलीस स्टेशन खामगांव येथे गुन्हा क्रमांक 82/07 कलम 143, 147, 149, 448, 452, 294, 504, 323 भादविसह कलम 135 मु.पो. कायदासह कलम 3 डॅमेज टू पब्लिक प्रॉपर्टी ॲक्ट अन्वये दिनांक 8.4.07 चे 15.30 वाजता गुन्हा दाखल करण्यात आला.

तसेच त्याच दिवशी वरील गुन्हा घडल्यानंतर वरील नमूद आरोपी हे श्री. शरद रींके, कार्यकारी अभियंता, वीज वितरण कंपनी यांच्या निवासस्थानी जावून भारनियमन करता आणि आरामात घरी बसून राहता, असे म्हणून त्यांचे घरात घुसून शिविगाळ करुन त्यांना मारहाण केली. तसेच त्या ठिकाणी हजर त्यांचे कुटुंबियांना सुध्दा धमकाविले व त्यांचे घरांचे नुकसान केले. श्री. रींके यांचे फिर्यादिवरुन पोलीस ठाणे शिवाजीनगर, खामगांव येथे गुन्हा क्रमांक 22/07 कलम 143, 147, 452, 294, 427, 506, 323 भादविसह 135 मु.पो.कायदा अन्वये दिनांक 8.4.07 चे 15.30 वाजता गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर वरील दोन्ही गुन्ह्यात आरोपींना अटक करुन न्यायालयात हजर करण्यात आले.

वरील प्रकरणाबाबत खामगांव शहरात वरील गुन्हा झाल्यापासून कॉंग्रेस व शिवसेना/भाजप कार्यकर्त्यांमध्ये एकमेकांबद्दल असंतोष निर्माण झालेला आहे. दोन्हीही पक्षाकडून एकमेकांविरुध्दचे वक्तव्य स्थानिक वर्तमानपत्रात छापून आले होते.....

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय गृह राज्यमंत्री हे चुकीचे निवेदन करीत आहेत. त्यांनी घडलेल्या प्रकाराची नीट माहिती घेतलेली नाही. आपण कॅबिनेट मिनिस्टरला बोलवावे. हे चुकीचे निवेदन रेकॉर्डवर राहील. आधी शिवसेनेच्या नगरासेवकाला मारहाण झाली. आम्ही येथे चुकीचे निवेदन ऐकायला बसलो नाहीत. जो घटनाक्रम आहे तो नीट सांगितला पाहिजे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : मी माहिती घेऊनच निवेदन करीत आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : माननीय राज्यमंत्री महोदय, आपण चुकीची माहिती देत आहात. रेकॉर्डवर चुकीची माहिती येता कामा नये.

श्री. दिवाकर रावते : पोलिसांनी दिलेली माहिती सत्य असो अथवा असत्य असो, आपण ती या ठिकाणी देता.... आम्ही त्यांच्या सगळया चुका पोटात घालतो म्हणून प्रत्येक वेळेस पोलीस असत्य माहिती द्यावयास लागले आहेत.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, आज आपण सकाळी या घडलेल्या घटनेबाबत निवेदन करण्याचे निदेश दिले होते. त्यानुसार मी निवेदन करीत आहे. चुकीची माहिती दिली असेल तर संबंधित अधिका-यांवर कारवाई करण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : आपण भाजपचे नाव कशासाठी घेता ? भाजपचा एकही कार्यकर्ता त्यामध्ये नाही. असेल तर त्याचे नाव सांगावे..

**तालिका सभापती** : माननीय राज्यमंत्री महोदयांचे निवेदन पूर्ण होऊ द्यावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : कालच्या प्रकरणामध्ये भाजपचा एकही कार्यकर्ता नव्हता. या निवेदनामध्ये जाणूनबुजून भाजपच्या नावाचा उल्लेख केला जात आहे.

**तालिका सभापती** : माननीय राज्यमंत्री महोदयांनी कोणत्याही पक्षाच्या कार्यकर्त्याचे नाव घेतलेले नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : निवेदनामध्ये भाजप असा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यामुळे भाजप कार्यकर्त्याचे नाव मंत्री महोदयांनी सांगावे अन्यथा मी हक्कभंगाचा प्रस्ताव आणीन .

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : निवेदन झाल्यानंतर त्यावर सविस्तर चर्चा होईल. मला निवेदन पूर्ण करु द्यावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : निवेदनावर चर्चा होत नाही.

...नंतर श्री. भोगले...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : एकाही नावाचा उल्लेख आलेला नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : भारतीय जनता पक्षाचे नाव का घेण्यात आले? या पक्षाचा एक तरी कार्यकर्ता असल्यास त्याचे नाव मंत्रीमहोदयांनी सांगावे.

**तालिका सभापती** : मंत्रीमहोदयांचे निवेदन पूर्ण होऊ द्यावे. आपल्याला पुराव्यासहित दुरुस्ती करावयाची असल्यास करता येईल.

श्री.दिवाकर रावते : पुराव्यासहित दुरुस्ती कसली करणार आहात? आम्ही सी.डी.चा पुरावा देऊनही मंत्र्यांना अटक होत नाही. कसला पुरावा घेऊन बसला आहात? पुरावा बघण्याची ही पध्दत आहे का?

श्री.पांडुरंग फुंडकर : ज्याअर्थी आमच्या पक्षाचे नाव घेतले जाते त्याअर्थी मंत्रीमहोदयांनी आमच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांचे नाव सांगावे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, काल दिनांक 10.04.07 रोजी रात्री 22.00 ते 22.30 चे दरम्यान गांधी चौक, खामगांव येथे दोन्ही पक्षाचे कार्यकर्ते समोरासमोर येऊन, त्यांची आपसात बाचाबाची होऊन मारामारी करायला सुरुवात केली. तसेच लाठ्या, काठ्या व पाईपने मारहाण करुन एकमेकांवर दगडफेक केली. दोन्ही पक्षाचे कार्यकर्त्यांनी समोरासमोर येऊन दगडफेक, मारामारी इ.करुन सदर भागात दहशत माजविली. सदर ठिकाणी लागलीच पोलीस अधिकारी, कर्मचारी पोहोचून दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांना पांगविण्यात आले. घटनास्थळी लागलीच पोलीस अधीक्षक, बुलडाणा व अपर पोलीस अधीक्षक, खामगांव यांनी भेट देऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. वरील घटनेच्या अनुषंगाने पोलीस ठाणे, खामगांव शहर येथे फिर्यादी सलीम मकवाना (काँग्रेस) यांचे फिर्यादीवरुन गुन्हा क्रमांक 84/07 कलम 117, 143, 452, 147, 148, 149, 326, 324, 504, 506, भादंविसह 135 मुं.पो.कायदा अन्वये दाखल करण्यात आला असून शिवसेना नगरसेवक मुन्ना पुरवार व 11 लोकांचे नावे तसेच 10 ते 12 अज्ञात लोकांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच संजय पुरवार (शिवसेना) यांचे फिर्यादीवरुन पो.स्टे.खामगांव, गुन्हा क्रमांक 85/07 कलम 117, 452, 143, 147, 148, 326, 324, 504, 506 भादंविसह 135 मुं.पो.कायदा अन्वये अशोक सानंदा व इतर 5 लोकांविरुध्द व 50 ते 60 अज्ञात लोकांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच शासनातर्फे पोउपनि बी.आर.राठोड, पो.स्टे.खामगांव शहर यांचे फिर्यादीवरुन दोन्ही पक्षातील कार्यकर्त्यांविरुध्द गुन्हा क्र.86/07 कलम

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे.............

143, 147, 148, 149, 353, 332, 333, 336, 337 भादंविसह 135 मुं.पो.कायदा अन्वये दोन्ही पक्षातील लोकांनी पोलीस जमाव पांगवत असताना, पोलिसांवर दगडफेक करुन, जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करुन एकमेकांसोबत लाठ्या, काठ्या, पाईप घेऊन मारहाण केल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उपरोक्त घटनेत कॉंग्रेस पक्षाचे 4 तर शिवसेना पक्षाचे 2 कार्यकर्ते किरकोळ जखमी झाले असून, 3 पोलीस कर्मचाऱ्यांना सुध्दा मार लागलेला असून एक कर्मचारी सामान्य रुग्णालय, अकोला येथे भरती करण्यात आला आहे.

वरील तिन्हीही गुन्हे दाखल केल्यानंतर आतापर्यंत 6 आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. उर्वरित सर्व आरोपी फरार झाले असून अपर पोलीस अधीक्षक, खामगांव यांचे नेतृत्वाखाली सदर आरोपींचा शोध घेऊन त्यांना अटक करण्यात येत आहे. सध्या खामगांव शहरात शांतता असून तेथे योग्य तो पोलीस बंदोबस्त लावण्यात आलेला आहे. एकूणच वरील प्रकारात दिनांक 08.04.07 रोजी वीज वितरण कंपनी येथे भारनियमनाच्या कारणावरुन केंद्रात व कार्यकारी अभियंता यांच्या घरावर हल्ला झाल्यानंतर पोलिसांनी कायदेशीर कार्यवाही केली असता दोन राजकीय पक्षाचे लोकांनी एकमेकाविरुध्द बयाणबाजी करुन त्यांचा एकमेकाविरुध्द असंतोष निर्माण होऊन काल दिनांक 10.04.07 चे रात्री समोरासमोर येऊन मारामारी केलेली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : मुन्ना पुरवार यांनी जी तक्रार केली त्या तक्रारीमध्ये त्यांनी कोणाकोणाची नावे नमूद केली आहेत?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : नावे सध्या माझ्याकडे उपलब्ध नाहीत. पटलावर ठेवण्यात येतील.

श्री.पांडुरंग फुंडकर : नावे का उपलब्ध नाहीत? अशोक सानंदा यांचे नाव सांगण्यात आले. मग इतर आरोपींची नावे का उपलब्ध नाहीत? मुन्ना पुरवार यांनी जी तक्रार दाखल केली त्यामध्ये गोकूळ सानंदा यांच्या नावाचाही उल्लेख आहे. अशोक सानंदा यांना अटक केली. याठिकाणी काटोलच्या घटनेच्या संदर्भात काल सभागृहात गृहमंत्र्यांनी सांगितले की, तक्रार दाखल झाल्याप्रमाणे सर्व नावांविरुध्द एफआयआर दाखल केला जाईल व चौकशीअंती कारवाई केली जाईल. या तक्रारीमध्ये गोकूळ सानंदा यांच्या नावाचा उल्लेख असताना पोलिसांनी एफआयआरमध्ये

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.............

त्यांचे नाव गाळले आहे. त्या नावाचा समावेश करणार आहात का? करणार नसाल तर का नाही? तक्रारीमध्ये त्यांचे नाव घेण्यात आलेले आहे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : तक्रारीमध्ये नाव असेल तर कारवाई करण्यात येईल.

---------

(नंतर श्री.जुन्नरे....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: वाढत्या शहरीकरणामुळे कच-याची विल्हेवाट करण्याचा उग्र होत असलेला प्रश्न.

**मु.शी.**: वाढत्या शहरीकरणामुळे कच-याची विल्हेवाट करण्याचा उग्र होत असलेला प्रश्न या विषयावर सर्वश्री मुझफ्फर हुसेन, सुधीर सावंत, भास्कर जाधव, राजन तेली, सर्वश्रीमती सुधा जोशा, मंदा म्हात्रे, श्री. संजय दत्त यांचा प्रस्ताव.

( चर्चा पुढे सुरु.....)

श्रीमती सुधा जोशी (नामनियुक्त ) : माननीय सभापती महोदय, या प्रस्तावाच्या अनुषंगाने अतिशय अभ्यासपूर्ण पध्दतीने सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी विचार मांडलेले असल्यामुळे मी त्यांचे मनापासून अभिनंदन करते. अनेक प्रकारचा कचरा असतो. ओला कचरा, सुका कचरा, रुग्णालयातील मेडिकल कचरा, जैविक कचरा, इलेक्ट्रॉनिक कचरा असा किती तरी प्रकारचा कचरा असतो.

सभापती महोदय, घरातून ओला-सुका कचरा गोळा होत असतो. शहरामध्ये प्रचंड लोकवस्ती असते त्यामुळे कचराही प्रचंड गोळा होतो. मेडिकल कच-याची विल्हेवाट प्रदूषण नियंत्रण नियमानुसार लावण्यासाठी सहा महिन्यात यंत्रणा उभारण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. राज्यात 366 सरकारी हॉस्पिटल्स असून त्यापैकी 162 हॉस्पिटल मध्ये मेडिकल कचरा विल्हेवाट लावण्याची यंत्रणाच उपलब्ध नाही. 219 हॉस्पिटल्स मधील मेडिकल कचरा विल्हेवाट लावण्याची यंत्रणा नादुरुस्त आहे. सरकारी हॉस्पिटल्स आणि इतर हॉस्पिटल्स यांचा प्रचंड जैविक कचरा निर्माण होतो. सार्वजनिक आरोग्य विभागातील 11.88 कोटी रुपये कचरा व्यवस्थापनावर खर्च होत असतो. यांसदर्भात आरोग्य विभागामार्फत न्यायालयात प्रतिज्ञापत्रही सादर करण्यात आलेले आहे. परंतु तरीदेखील कचरा विल्हेवाटीत ज्या त्रुटी आहेत त्या त्वरित दूर होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, राज्यात 4,571 औद्योगिक कारखाने घातक कचरा निर्माण करतात किंवा हाताळतात. हे कारखाने 14.3 लाख टन औद्योगिक घातक कचरा प्रतितवर्षी निर्माण करीत

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी.....

असतात. अशा उद्योगांना किंवा संस्थेला पर्यावरण संरक्षण कायद्याआंतर्गत अहवाल दरवर्षी प्रदूषण मंडळाकडे सादर करणे बंधनकारक असते त्यामुळे यावर कडक नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मुंबईमध्ये दरवर्षी 19,000 टन इलेक्ट्रॉनिक कचरा उत्पन्न होता असतो. ज्यामुळे देशात आरोग्याचा आणि पर्यावरणाचा प्रश्न निर्माण झाला असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. या इलेक्ट्रॉनिक कच-यामुळे मुंबई शहराला फार मोठा धोका निर्माण झालेला आहे.

बोरीवली पश्चिम इथे असलेल्या गोराई ग्राऊंडवर कचरा टाकण्यासाठी 17.7 हेक्टर इतकीच जमीन आहे. या ठिकाणी दररोज सुमारे 2,400 मेट्रीक टनाच्या कच-यामुळे सुमारे 16 मिटर उंचीच्या कच-याचे ढीग निर्माण झालेले आहेत. या ग्राऊंडची कचरा टाकण्याची क्षमता आता संपली आहे. असे असतांनाही या ठिकाणी कचरा टाकण्यात येत आहे. येथील नागरिकांनी येथे कचरा टाकाण्यास तीव्र विरोध केला असून त्यांनी न्यायालयात धाव घेतली आहे. न्यायालयाने या ठिकाणी कचरा टाकण्याचे बंद करण्याचे आदेश दिलेले आहेत. 1 जानेवारी 2008 पासून ही क्षेपणभूमी शास्त्रोक्त पध्दतीने बंद करावी असे न्यायालयाने सांगितले आहे. त्यानुसार मुंबई महापालिकेने डम्पिंग ग्राऊंड बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. शास्त्रोक्त पध्दतीने कचरा व्यवस्थापन करण्यासाठी मेसर्स आय.एल. अँड एस. लिमिटेड या कंपनीने गोराई, देवनार, कांजूरमार्ग आणि मुलुंड येथील डम्पिंग ग्राऊंडचा अभ्यास केला आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ KGS/ MHM/ 19:10

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्रीमती सुधा जोशी........

या कंपनीच्या सल्ल्यानुसार गोराई डम्पींग ग्राऊंडच्या देखभाल आणि व्यवस्थापनाचे काम युनायटेड फॉस्फरस कंपनीला पुढील 15 वर्षांसाठी देण्यात आले आहे. त्यासाठी रुपये 37 कोटी 60 लाख 57 हजार इतका खर्च येणार आहे. मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीने हा विषय पुढे ढकलला आहे. हा सगळा कचरा सर्व नागरिकांच्या गळ्याशी लागला आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईतील घनकचरा रात्रीच्या अंधारात आणून तो नवी मुंबईत टाकला जात आहे, अशी बातमी आहे. वाशी खाडीपूल आणि ऐरोली खाडीपूलावरुन मुंबईतील डेब्रीज घेऊन डंपर्स नवी मुंबईत येतात. या वाहतूक व्यवसायामध्ये पालिकेचे काही कर्मचारी आणि राजकीय पक्षांचे पदाधिकारी सामील आहेत असे म्हणतात. या प्रकारामुळे आता नवी मुंबई महानगरपालिका खडबडून जागी झाली आहे. मुंबईच्या घनकचऱ्याची पंचाईत होणार यात शंकाच नाही. पण आपली घाण दुसऱ्याच्या दारात टाकणे हेही उचित नाही.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापनाची "डोअर टू डोअर" योजना अंमलात आणण्याचे ठरविले आहे. काही ठिकाणी ही योजना सुरु करण्यात आली आहे. सोसायटया, उच्चभ्रू वस्त्या यामुळे स्वच्छ होतील,परंतु ज्याठिक्राणी झोपडपट्टया आहेत, ज्याठिकाणी कचऱ्याच्या गाड्या पोहचू शकत नाहीत तिथे काय करणार आहात ? तेव्हा त्याठिकाणी पर्यायी व्यवस्था करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, या प्रचंड कचऱ्याचा उपयोग वीज निर्मितीसाठी करुन घेणे आवश्यक आहे. 1997 साली तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, "परदेशी कंपनीकडून कचऱ्यापासून वीज बनविण्याचा प्रस्ताव आला आहे. मुंबईतील कचऱ्यापासून 300 मे.वॅ.वीज निर्माण होईल." या प्रस्तावाचे पुढे काय झाले ते माहीत नाही. मी याठिक्राणी सांगू इच्छिते की, 1997 सालापेक्षा कितीतरी मोठ्या प्रमाणावर मुंबईत कचरा साठत आहे. त्या कचऱ्यापासून वीज बनविण्याचा प्रकल्प सुरु केला तर आजच्याघडीला अत्यंत मौल्यवान अशा विजेचे उत्पादन राज्याला मिळू शकेल आणि राज्यातील वीज टंचाईचा प्रश्न काही प्रमाणात सुटू शकेल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ KGS/ MHM/ 19:10

श्रीमती सुधा जोशी........

सभापती महोदय, कचऱ्यामधील न कुजणाऱ्या वस्तू बाजूला काढून उरलेल्या कचऱ्यातून खत बनू शकते. ग्रामीण भागात शेतीला लागणारे खत 3500 रुपये ट्रक या भावाने विकले जाते. आता त्याचाही तुटवडा आहे. तेव्हा शासन, महानगरपालिकांनी खताचे वेगवेगळे प्रकल्प राबवावेत. यासाठी खाजगी संस्थानाही सामील करुन घ्यावे.

सभापती महोदय, राज्यातील शहरे स्वच्छ, सुंदर,सुशोभित करण्यासाठी शहरात वाटेल तेथे कचरा टाकणाऱ्याला किंवा घाण करणाऱ्याला तिथल्या तिथे दंड ठोठावणे आवश्यक आहे. सिंगापूरमध्ये अशाप्रकारची तरतूद आहे. प्रत्येक नागरिकाने स्वच्छतेने नियम कोटेकोरपणे पाळले पाहिजेत. यासाठी सामाजिक प्रबोधन, कायद्यात कडक तरतूद करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, शहर दुर्गंधीमुक्त करण्यासाठी कचऱ्याच्या योग्य व्यवस्थापनाबरोबरच शहरातील तबेले देखील मुंबईबाहेर नेणे आवश्यक आहे.

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी...

कचरा न उचलल्यामुळे त्यावर जगणारे प्राणी, भटके कुत्रे यांचा सुळसुळाट झालेला आहे. आज मुंबईत 5 लाख भटके कुत्रे असून त्यांचे निर्बिजीकरण पुरेशा प्रमाणात होत नाही. गेल्या वर्षभरात 44 हजार लोकांना कुत्र्यांनी चावे घेतलेले असून रेबिजची लसही आज पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाही. आसनगांव-वाशिंद येथील 28 वर्षीय श्री.हरिश्चंद्र गुप्ता यांना कुत्रा चावला आणि ते कुत्र्यासारखे भुंकायला लागले आणि माणसाचा कुत्रा झाला. प्राण्यांवर दया करण्याच्या नादात श्वानदंशाने माणसे मरत आहेत. भटक्या कुत्र्यांना स्वत:च्या गल्लीतही नाही पण दुसऱ्यांच्या दारात गल्ल्या भरभरुन आणून अन्न घालण्याचा उद्योग जुहू भागात सुरु आहे, त्यामुळे दुसऱ्यांच्या घराभोवती या खतरनाक भटक्या कुत्र्यांची फौज फिरत आहे. नुकतीच वर्तमानपत्रामध्ये बातमी आली होती की, हैद्राबादमध्ये परीक्षेला जाणाऱ्या 9 मुलींवर कुत्र्यांच्या झुंडीने हल्ला करुन चावे घेतल्यामुळे त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागले आणि परीक्षासुध्दा पुढे ढकलावी लागली. आज असे प्रकार सगळीकडे घडत आहेत. त्यामुळे याबाबतीत अतिशय सिरिअसली विचार करण्याची आवश्यकता आहे, हे शासनाने जाणून घ्यावे, एवढी विनंती करुन मी माझे भाषण पूर्ण करते.

धन्यवाद ! जय हिंद, जय महाराष्ट्र.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार, दिनांक 12 एप्रिल, 2007 रोजी सकाळी 10.30 वाजता पुन: भरेल.

उद्या सकाळी 10.30 ते 11.45 वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन व अन्य सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या नियम 260 च्या प्रस्तावावर चर्चा पुढे सुरु राहील व त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता सुरु होईल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 07 वाजून 18 मिनिटांनी, गुरुवार, दिनांक 12 एप्रिल, 2007 रोजीच्या सकाळी 10.30 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही